प्रकरण ५

Chapter-5

# राजन गवस यांच्या कादंब-यातील रचनातत्त्वे

प्रकरण ५ :

# राजन गवस यांच्या
# कादंब-यातील रचनातत्त्वे

अ) कादंब-यातील वास्तववाद :

आ) कादंब-यातील दु:खसंवेदना :

इ) कादंब-यातील भाषा :

# प्रकरण ५ : राजन गवस यांच्या कादंब-यातील रचनातत्त्वे

राजन गवस यांनी आपले कादंबरीलेखन १९८० नंतरच्या कालखंडात सुरू केलेले आहे. १९६० नंतर मराठी कादंबरीच्या अंत: आणि बाह्य स्वरूपात अनेक प्रकारचे बदल झाले. त्यामुळे कादंबरीच्या रचनेचा विचार करताना केवळ कथानक पात्र-निर्मिती, भाषा, संवाद, वातावरण निर्मिती इतके घटक पुरेसे ठरत नाहीत. विशेषत: १९६० नंतरच्या कादंबरी वाङ्मय प्रकारात नेमाडे यांच्या कादंब-यांनी पारंपरिक कथानक कल्पनेला छेद देत, जो एक खुला अवकाश निर्माण केला, कादंबरीतील भाषे-संबंधीची नवी प्रयोगशील जाणीव निर्माण केली, काळ आणि अवकाश या घटकांना सर्जनशीलतेचे स्वरूप दिले. त्या सर्वांचा मराठी कादंबरीवर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही.

राजन गवस यांचे कादंबरीलेखन ही त्याला अपवाद नाही. त्यांची 'चौंडकं' ही कादंबरी एका विशिष्ट घटनेकडून परिणत होणा-या एका विशिष्ट घटनेपर्यंत येते. किंबहुना 'भंडारभोग' या कादंबरीतही तायाप्पाला जोगतीणीकडे घेऊन जाण्यापासून कादंबरीची सुरूवात होते आणि तायाप्पाचे जगणे चित्रित होत होत तायाप्पा पुन्हा जोगत्यांच्याच विश्वाकडे वळतो, अशा शेवटपर्यंत येते. त्यामानाने 'धिंगाणा', 'कळप' आणि 'तणकट' या कादंब-यांच्या बाह्यरूपात बदल दिसतो. परंतु या सर्व कादंब-यांच्या अंत:रंगात मात्र फारसा बदल आढळत नाही.

नेमाडेंच्या नैतिकवादी दृष्टिकोनाचा प्रभाव गवस यांच्या कादंब-यांच्यावर असलेला जाणवतो. 'कळप' कादंबरीतील रघू आणि दिलावरच्या संवादात रघू नेमाडेंविषयी बोलतो. "तुझं हे सगळं म्हणणं ठीक. पण बेबी मला जशी दिसली तशीच कथेत मांडली. यात नेमकं चुकलं कुठं ? उलट नेमाडयांनी बिढारमध्ये का कुठं तरी म्हणून ठेवलंय माणसं जशीच्या

तशी साहित्यात आणता आली तर फार थोर होईल. मला तर त्यांचं ते म्हणणं महत्वाचं वाटतं. हे बघ नेमाडयांच्या नावावर काहीही खपवू नको. ही सवय वाईट. नेमाडयांनी काय म्हटलंय हे कळायला तुला अजून बरीच वर्षे जातील. भल्याभल्यांना नाही समजत नेमाडयांना काय म्हणायचं ते. पांढरपेश्याना तर श्याट कळत नाही – नेमाडे. ते त्यांनी मांडलेलं नसतं. ते वाचणा–यावर सोपवतात. नेमाडयांची ही एक फार मोठी चुक झालीय. त्यांनी आपला वाचक भयंकर समंजस, जाणता मानलाय. तसं मानण्यापेक्षा वास्तवातलं दारिद्र स्वीकारायला हवं होतं. म्हणजे असे घोटाळे झाले नसते." (पृ. १८८) रघूच्या या निवेदनातून त्यातील 'गर्भित लेखकाची' भूमिका आपल्याला जाणवत राहते. नेमाडयांच्या वास्तववादी भूमिकेचा, त्यातील जीवनाच्या समग्र आकलनाच्या, भानाच्या जाणिवेचा तत्कालीन तरूण पिढीवर पडलेला प्रभाव त्यातून जाणवतो. गवस यांच्यावरही नेमाडे यांचा प्रभाव अनेक अंगांनी दिसतो. वास्तवाभिमुखता, व्यक्ती आणि समाज यांच्या परस्पर संबंधातून कादंबरीतून व्यक्त होणारे सामाजिक द्रव्य, नैतिक दृष्टी आणि देशी मूल्यांची जाणीव, भाषेचे संप्रेषणरूप या अनेक परिणामातून तो आपल्याला पाहता येतो. 'चौंडकं' ते 'तणकट' पर्यंतच्या कादंब–यांच्या रचनेत विकास पावणारी जीवन जाणीव, वास्तवाचे भरीव तपशील दिसत असले तरी कादंब–यातील मूलद्रव्यात मात्र सारखेपणा आहे. राजन गवस यांच्या यासर्व कादंब–यांबद्दल अशोक बाबर लिहितात, "..... या सर्व कादंब–या म्हणजे एकच कळप कादंबरी आहे. एवढी एकरूपता ह्या कलाकृतींमध्ये आहे." (१)

गवस यांच्या कादंब–यातील संरचना, घटकांचा शोध घेताना कथानक, पात्ररचना, संवाद, भाषा, शैली, वास्तव–द्रव्य निवेदन, मानवेतर प्राणी विचार इ. अनेक घटकांचा आपल्याला समावेश करता येतो; यापैकी अनेक घटकांचा इतर प्रकरणात ठिकठिकाणी विचार करण्यात आलेला आहे. त्यापैकी काही इतर महत्त्वाच्या घटकांचा येथे विचार करण्यात आलेला आहे.

## अ) कादंब-यातील वास्तववाद –

मराठी कादंबरीत वास्तववादाचा एक प्रवाह आपल्याला बाबा पद्मनजी – ह.ना.आपटे – विभावरी शिरूरकर ते नेमाडे पर्यंत दिसून येतो. नेमाडे यांनी कादंबरी या वाङ्मय प्रकारासंबंधात आपली भूमिका स्पष्टपणाने मांडलेली दिसते. "आपल्या शिवायही सृष्टीचे अस्तित्व असू शकते हे सत्य (वास्तव) वस्तुनिष्ठतेने जाणणे म्हणजे वास्तववाद. ह्यातून व्यक्ती आणि समाज यांचे संबंध मानणे हे साहित्यातील वास्तववादाचे प्रमुख लक्षण आहे. कादंबरीकार आपल्या आशयाचे जे जे तपशील संरचनेसाठी निवडतो, ते सर्व व्यक्ती व समाज यांच्याशी संलग्न अशा विविध प्रांतातून झिरपत असतात. साहित्यकृती ज्या माध्यमातून व्यक्त होते ते भाषा हे माध्यम स्थलकाल सीमित असल्याने व सामाजिक संस्था म्हणूनच, भाषा व्यक्तीला उपलब्ध होत असल्याने, व्यक्तीच्या आकलनशक्तीवर तिचा ताबा असतो. त्यात समाजाने ठरवून दिलेल्या संकल्पनासंस्था लेखकाला बंधनकारक असतात." (२)

यातून नेमाडे व्यक्ती आणि समाजाचे संबंध मानत सामाजिक वास्तव हेच कादंबरीचे आशय द्रव्य मानतात व जीवन आणि साहित्य यातील अंतराची सीमारेषा दूर करण्याचा प्रयत्न करतात. वास्तवाची ही संकल्पना मांडताना युरोप मधील रोमँटिसिझम ची प्रतिक्रिया म्हणून युरोपमध्ये आलेल्या वास्तववादाच्या व्यक्तित्ववादी प्रवृत्तीला ते नकार देतात. आशय आणि रूप या दोन्ही बाबतीत वास्तववादी साहित्याने आपला खास ठसा उमटवला आहे. सरंजामी साहित्यामुळे (court-literature) विषयवस्तूवर पडणारी बंधनें वास्तववादी साहित्याने मोडून टाकली. राजे-रजवाडे आणि समाजातील सत्ताधारी वर्गातील व्यक्तींच्या जीवनाचे, त्यांच्या मूल्यव्यवस्थेचे चित्रण ही प्रवृत्ती टाकून देऊन तत्कालीन खालच्या वर्गातील लोकजीवनाचे चित्रण करण्याची नवी पद्धत वास्तववाद्यांनी रूढ केली.

...अभिजात वाङ्मयात केवळ मनोरंजनासाठी वापरण्यात येणा-या तळाच्या वर्गातील व्यक्तींना स्वत:चे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व या साहित्यातून प्राप्त होऊ लागले. विविध

मानसिक आंदोलनापासून ते लैंगिक अनुभवांचे चित्रण करण्यापर्यंत विषयवस्तूंची व्याप्ती वाढली. वस्तुमय जगाच्या भरगच्च वातावरणातील व्यक्तींच्या चित्रणाबरोबर समूहांचे स्वतंत्र अस्तित्वही मांडण्यात येऊ लागले. हिरॉइक नायकाच्या जागी आता गुंतागुंतीचे व्यक्तिमत्त्व असणारा, समाजाच्या नियमांनी बांधला गेलेला, तो नियम स्वीकारणारा, सर्वसामान्य जनतेचा प्रतिनिधी नायक बनला. थोडक्यात, सरंजामी व्यवस्थेच्या साहित्यापासून फारकत घेऊन भांडवली लोकशाही समाजांचे, भौतिकवादी जाणिवांचे साहित्य वास्तववादाच्या रूपाने निर्माण झाले." (३)

गवस यांच्या कादंब-यांचा विचार करताना त्यामधुन प्रकट होणारी वास्तवाला सामोरे जाण्याची आणि वास्तवाला प्रामाणिक राहण्याची वृत्ती स्पष्ट होते. गवस यांच्या कादंब-यांची रचना वास्तवाभिमुख असल्यामुळे या कादंब-यात जाणिवपूर्वक् कथानकाची जडणघडण करणे, वाचकांची उत्सुकता वाढविणे अथवा वाचकाला विस्मयाचा धक्का देणे, कथानक रोचक व्हावे म्हणून संघर्ष निर्माण करणे इ. अनेक घटक निर्माण केलेले दिसत नाहीत. 'चौंडकं' मध्ये कथानकाचे सूत्र प्रामुख्याने सुलीच्या जीवनगतीशी निगडीत झालेले असले तरी सभोवतालच्या अनेक व्यक्ती बारीकसारीक घटना वास्तवाचे वेगवेगळे संदर्भ यांच्या तपशीलातूनच कादंबरीचे आशयसूत्र विकसित होत जाते. देवदासींच्या जीवनाचे वास्तवचित्रण करत असताना नायिकेचे सुंदर असणे, बबन्याशी तिची भेट होणे याला किंचितसा प्रेमकथेचा रोमॅंटिक रंग येत असतानाच शेवंताच्या शब्दातून तिला छेद दिला जातो. "खुळी हाईस लेकी. आसं नसतंय. आपुण देवाच्या रांडाऽऽ आपल्या बरबर संसार कोण करील ? आसलं खूळ काय धरू नगस. सरळ मोकळ हो जाऽऽ" शेवंताक्का कळकळून बोलली. (पृ.१४४)

'भंडारभोग', 'धिंगाणा', 'कळप' आणि 'तणकट' या कादंब-यांचे प्रधान आशयसूत्र कादंब-यातील नायकाच्या आंतरिक संवेदनेशी आणि बाह्य जगण्याशीच जोडले गेलेले आहे. व त्यामधून व्यक्तीचा आणि तो ज्या समाजात, परिसरात, वातावरणात, प्रदेशात, जातिधर्मात वावरतो त्या सर्वांचा विचार एकरूपतेने येतो. नेमाडेंचे निव्वळ

अंधानुकरण न करता हा प्रभाव पचवून एक लेखक म्हणून ते आपली ओळख प्रकट करतात. त्यातील व्यक्ती ग्रामीण, अर्धनागर आणि काही प्रमाणात नागर अशा स्तरातून जगत असतात. त्यांच्या कादंब–यातील पात्रे प्रामुख्याने ग्रामीण असली तरी त्याच्या अनुभव घेण्याला ग्रामीणतेच्या मर्यादा पडलेल्या नाहीत. त्यामध्ये ते ग्रामीण आणि नागर संस्कृतीच्या परस्पर संक्रमणाची आणि संबंधाची विविध रूपे दाखवितात.

'कळप' मधील सुरेशला "आपण खेडयात जन्माला आलो हे फारच वाईट !" असे वाटत राहते..... "हे सगळे शहराचे फायदे तुला काय नाहीत कळायचे !" आजच्या जीवनातील राजकारण, सत्ताकारण, शिक्षण, समाजकारण, धर्म अशा विविध अंगांनी माणूस आणि समाज यांना घडविणा–या विविध व्यवस्थांचा, त्यांचे शोषक व्यवस्थेमध्ये रूपांतर करणा–या प्रदूषणाचा मूलभूत असा वेध घेतात.

त्यांच्या कादंब–यातील वास्तवचित्रण, बारीकसारीक तपशील, सामान्य वाटणा–या घटना, निरीक्षणे, ऑफिस, महाविद्यालये, निरनिराळ्या वस्त्या, शेतीकामाचे तपशील, देवधर्म विषयक विधी आणि रूढी, लोकाचार, भूप्रदेशांचे आकार, पर्यावरण, माणसाच्या कृतीउक्ती, बोलीभाषा, व्यक्तिभाषा अशा वास्तवाच्या अनेक अंगांनी केलेले आहे. 'चौंडकं' मधील गल्ल्यांची वर्णने – (पृ.६९), 'धिंगाणा' मधील माळ्याच्या शेताचे बारीकसारीक तपशील – (पृ.६३) कळप मधील प्रकाशक काका मालपाणी आणि त्यांच्या ऑफिसचे चित्रण – (पृ.२४९) साहित्य परिषदाच्या तालुका पातळीवर होणा–या संमेलनातील लेखकांचे वागणे, बोलणे आणि त्यातील दांभिकता, हंबीरराव महागावकरांच्या वाडयाचे चित्रण, 'भंडारभोग' मधील देवळ्याच्या वरातीचे, नवरानवरीचे, गॅसबत्ती धरणा–या पोरांचे, सनईवाल्या, ताशेवाल्यांच्या हालचालीचे (पृ.१२४) शैक्षणिक तपशिल, गाव आणि घराच्या रचनेचे आराखडे (पृ.१७०) मेळ्यासाठी जमलेल्या जोगत्यांच्या जागेचे सूक्ष्मचित्रण (पृ.१७३), 'तणकट' मधील पोलिसांच्या गाडयांचे येणे, गवत्याचा तुच्छभाव चावडीवर जमलेल्या झुंडीचे बारीकसारीक तपशील, शेडबाळेच्या तारीचे शिव्याशाप आणि तिचे आकांताने ओरडणे, तळ्याच्या घाटावर बायकांच्या धुणे धुण्याच्या हालचाली,

महारांच्या तक्यातले ढोल, बुलबुल खुळखुळ आणि झांज यांचे आवाज पोरांची बँजो पार्टी, नसलापुरेची ब्राह्मण जमातीविषयी व्याख्यान, प्राचार्यांचे मोठमोठे गुरगुरणे या सर्वातून समाज जीवनाचा आवाक वास्तवाच्या सर्व बारीकसारीक तपशीलासह आलेला आहे. अर्थात येथे वास्तव म्हणजे केवळ वास्तवाचा दृश्य तपशील असा नसून त्यामधून जगण्याचे आकलन आणि वास्तवाची खोलवरची जाणीव प्रकट होते. व्यक्ती आणि व्यक्ती ज्या समाजात भूपरिसरात, वातावरणात वावरते यांचा परस्परसंबंध त्यात अपरिहार्यपणे आणि अनिवार्यपणे एकात्म स्वरूपामध्ये प्रकट होत असतो. सुलीचे अथवा तायाप्पाचे जगणे, सुरेश, दिलावर, कबीर यांचे जगणे, भोवतालच्या समाजवास्तवाशी निगडीत आहे. त्यांच्या आंतरिक संवेदनेशी त्याच्या क्रियाप्रतिक्रिया होत ती संवेदना आकार घेत असते.

गवस यांच्या कादंब-यातील पात्रे विशेषत: नायक हे समूहातीलच एक आहेत. या समूहातील एकाच्या मानसिकतेचे वास्तवचित्रण गवसयांच्या कादंब-यात येते. 'भंडारभोग' मधील तायाप्पा आपल्यावर लादलेल्या बाईपणाच्या भारातून, देवाधर्माच्या जोखडातून सुटण्याच्या मनोदशेतून जातही असतो. आणि पुन्हा पुन्हा त्यात अडकत, गुंततही राहतो. पुरूषपणातून बाईपणात होणारे त्याचे रूपांतरण शरीर हालचालीतून प्रतिमात्मतेने सूक्ष्म अशा मानसिक चलनवलनाला सूचित करते. "तायाप्पाची पापणी ताणली. डोळ्यांत पाणी जमा झालं. अंगातनं कायतरी उतरून गेल्यागत व्हायाला लागलं. पेंढ-या गळाटल्यागत झाल्या. त्यानं गच्च डोळं झाकलं. डोळ्यांतनं पाणी भाईर पडलं. डोळ्यांसमोर अंधाराचं पोतं फुटलं........... त्याच्या डोक्यात कायतरी तडतडलं. पाय वळवळले आणि तोल सुटल्यागत तायाप्पा ताशेव्ल्यासमोर जावून नाचू लागला. ताशेव्ल्याच्या हातातील कुणगी लाह्या उडाल्यागत उडाय लागली. सगळ्या पोरांनी आरडून वरडून शिव्या घालून वरात डोक्यावर घेतली. आया बाया उपडी पडून बघू लागल्या. कुणी तरी माणसास्नी सरकून गोल उभा केलं. पिपाणीवाल्यात वारं संचारलं. तायाप्पा ताशाच्या तालावर नाचाय लागला. त्याला पदराचंबी भान राहिलं नाही. सनईवाल्यानं तायाप्पाबरोबर नाचतच ठेवणीतलं गाणं काढलं......... तायाप्पाचा पाय कसला त्यो भुईला थरंना .......... पदर खांद्यावर

ठरंना...... त्याचं हात गाण्याच्या तालावर हालाय लागलं........." (पृ.१२५) वास्तवतेचा समग्र आलकनाचा अर्थ तायाप्पाच्या पात्रचित्रणातून गवस फार समर्थपणे उभा करतात.

गवस यांच्या कादंब-यातील पात्रे आणि विशेषत: नायक अशा काही जागा सोडल्यास वास्तवतेच्या कक्षेत प्रकट होतात. समाज निरीक्षण करीत त्यावर भेदक भाष्य करीत ते आपली नैतिक भूमिका प्रकट करतात. त्यांच्या वास्तवतेच्या या कक्षेत अतिवास्तवाचे अतींद्रिय स्वरूपाचे अनुभव फार क्वचितच प्रकट झालेले आहेत. 'तणकट' मधील कबीर हा समाजाविषयी सतत विचार, चिंतन करणारा तरूण, विचारांच्या या तंद्रीत अनेकदा तो विचारातीत अशा अवस्थेला जाऊन पोहचतो. महारवाडयातल्या पोरांच्या भविष्याचा विचार करीत चालत असताना सभोवतालच्या वातावरणाशी एकरूप होत "त्याचे पाय आपोआप गावच्या वरच्या बाजूला असणा-या तळ्याकडं वळले. हे त्यांचं खास आवडीचं ठिकाण. म्हारोडयालगतच्या वडराच्या घरापाठीमागून एकवाट चढणीला लागते. वाटेशेजारीच खोल दरी सारखा खोलगट भाग. त्या भागात प्रचंड मोठे काळेभोर दगड. ह्या दगडाचा आडोसा घेऊन वडराच्या आणि म्हारवाडयातल्या बायका आपले नित्यक्रम उरकतात. त्यामुळे ती जागा तशी बायकांच्याच मालकीची. तिकडं सहसा कोण वळत नाही. तो चढणीनं मराठी शाळेजवळ पोहोचला. शाळेची लांबलचक इमारत. भोवती निलगिरीची दाट झाडी. मैदानात बरोबर शाळेसमोर उंच झेंडयाचा खांब आणि दगडी कठडा. शाळा तळ्यालच्या काठाला. एका बाजूला उंचावर तो शाळेकडं न वळता तळ्याच्या काठानं गेला. पाण्यावर हळूहळू अंधार उतरत होता. पाण्यावर मंद उजेडाची तकतक. हळुवार उठणा-या लाटा. तो नेहमीच्या उंच दगडावर जाऊन टेकला. या दगडावर बसलं की सगळं शिवार आणि सगळं गाव नजरेच्या टप्प्यात येतं. दिसत नाही फक्त म्हारवाडा. तो लांबवर नजर खतवून बसला. लांबवर कडगाव, लिंगनूर अशा गावाचे लाईटचे दिवे लुकलुकत होते. आकाशात ढगांनी घातलेली अंडी काळपट अंधुक होत चालली होती. अंधाराचे हळूहळू गडद होत जाणे, त्यात झाडांना अंधाराच्या ढिगाचे हळूहळू येत जाणारे रूप आणि समोरच्या शिवारातील उसांच्या मळ्यावर हिरवट काळपट अंधार. एक विचित्र रंग रसायन

त्याच्या डोळ्यात तयार होऊ लागलं. मग त्याच्या कानावर गावातल्या चित्रविचित्र आवाजांचं आदळणं सुरू झालं. त्यानं पुन्हा नजर तळ्यातल्या पाण्याकडं वळवली. आता पाणी आणि अंधार एकत्र. समोरच्या दगडावरचा पांढरटपणा तेवढाच जाणवत होता. बाकी भोवती फक्त अंधार........... हळूहळू त्याचं डोकं शांत होत गेलं आणि मग तो तसाच बसून राहिला....." (पृ.४७-४८) तो हळूहळू मनातील अवस्था क्षणभर का होईना तो अनुभवतो. रूढार्थाने त्याला अतींद्रिय अनुभव अथवा आध्यात्मिक अनुभव म्हणता येणार नाही. संवेदनाशील मनुष्यमात्राला अनुभवास येणा-या या अवस्था आहेत. 'तणकट' मध्ये अशा मनातील अवस्थांना स्पर्श करीत गवस यांनी वास्तवाचे एक नवे परिमाण आपल्या कादंब-यातील अनुभवांना दिले आहे.

या दृष्टीने पाहताही 'चौंडकं' ते 'तणकट' हा वास्तवचित्रणाचा गवस यांचा प्रवास लक्षणीय म्हणता येईल.

## आ) कादंब-यातील दु:ख संवेदना:

गवस यांच्या कादंब-यात दु:ख संवेदनाही सर्व ठिकाणी व्यापून राहिलेली दिसते. त्यानेच कादंब-यातील दु:खानुभव हा त्यांच्या कादंब-याचे मुख्य आशयसूत्र बनते. 'चौंडकं' ते 'तणकट' पर्यंतच्या कादंब-यातील नायकांचे (धिंगाणा मध्ये ते उपरोधिकपणाने येते.) आणि सभोवतालचे जीवन दु:खाच्या अनेकविध जाणिवांनी संपृक्त झालेले दिसते. या दु:खात माणसांनीच माणसांचे शोषण करीत केलेल्या दु:खाच्या नानाविध असंख्यपरी चित्रित झालेल्या आहेत. 'चौंडकं' मधील सुली, बायजा, शेवंताक्का, फुला, यांची दु:खे धर्माच्या अंधश्रद्धेतून विशिष्ट जातीच्या स्त्रियांचे शोषण करीत निर्माण झालेले आहे आणि दु:खाची गोष्ट ही अधिक त्यातील अनेक स्त्रियांना त्याची जाणीवही नाही. गवस बायजा सुली आणि इतर देवदासी यांच्या चित्रणातून दु:खाच्या या सभानतेचे आणि जाणीवविहीनतेचे दोन्ही पदर आपल्या समोर सूक्ष्मपणाने उलगडून दाखवतात. तायाप्पाचे तर पुरूष जाणिवेतून स्त्री जाणिवेत हळूहळू होणारे रूपांतरण आणि त्याच्या लैंगिकतेची होणारी घुसमट, त्याच्यावर होणारे अत्याचार आणि या सर्वात होणारी त्याची सैरभैर दु:खदता संपूर्ण

कादंबरीला व्यापून टाकते. 'तणकट' मध्ये "समोर फक्त अंधारच अंधार. तळ्यातल्या पाण्यावर किरमिजी झालेला अंधार. झाडातून उभा पाझरणारा अंधार. दगडांच्या गर्दीत लदबदलेला अंधार. आकाशात फक्त अंधारच अंधार. गडद काळा. फक्त त्याच्यावर निळसर छटा. मध्येच कुठंतरी लुकलुक करणारी एखादी अस्पष्ट चांदणी पणतीही अंधाराच्या विळख्यात निस्तेज बनल्यासारखी" (पृ.७७). 'कळप' मध्ये "बच्याच्या झाडावर काय तरी तडफडलं. अंधार हालला. मग लिवलिव. डोळे मिटून घेतले. तर अंगातून अंधाराच्या लहरी. खोलखोल. मग माझं विरघळणं सुरू. बराच वेळ शांत. पुन्हा तडफड. कशी सुरू होते. ही मध्येच तडफड. कुणाचं ही तडफडणं पिळवटून टाकणारंच. मग अंधाराचं काय आणि माणसाचं काय. उठलो. चालाय लागलो. तर डोळ्यात गावचे दिवे भगभगत होते." (पृ.३८८) 'तणकट' आणि 'कळप' मध्ये अंधाराच्या प्रतिमा वारंवार येतात. आणि दु:ख संवेदनेला अधिक अर्थवान करीत तिला मानवी मनाच्या तळाशी जाऊन जोडतात. त्यामुळे कबीरचे दु:ख आले आहे ते सभोवतालच्या अस्वस्थ करणा-या परिस्थितीतून, अंधाराच्या या प्रतिमेने ते व्यक्तिगत संवेदनेच्या नाळेशी जोडले जाते. गवस यांच्या नायकाचे हे जगणे दु:ख जाणिवेचा भाग बनते, एकाचवेळी ते त्यांचे स्वत:चेही होते आणि समाजाचेही असते ; गवस यांच्या कादंबरीत सुखमय जीवनानुभूतीचे चित्रण त्यामानाने अल्पसे आले आहे. सुली आणि बबन्यातील प्रेमप्रसंग अथवा तायाप्पा आणि रत्नव्वाचे एकत्र येणे असे काही तुरळक प्रसंगच फक्त त्यात येतात. पण या सा-याची परिणती होते ती दु:खात्म अनुभवातच !

दु:खाच्या या परित मृत्यूचे दु:ख हेही दु:खाचे एक मूलभूत कंदरूप गवस यांच्या कादंब-यात मृत्यूच्या या दु:खाचेही - दु:खाच्या मूळभूत रूपाचे चित्रणही अनेकवेळा येते. सुलीच्या आईचा कणाकणानं होणारा मृत्यू आणि त्यातींल मुलीच्या नैतिक घसरणीची खोलवरची खंत, तानव्वाच्या सत्पणाचा मृत्यू, म्हादू जोगी आणि यमन्याचा मृत्यू हे मानवी जीवनातील मृत्यूचे दर्शन गवस आपल्या कादंब-यातून घडवितात. कादंबरीत मृत्यूविषयीचे लेखकाचे चिंतन अथवा भाष्य येत नाही. पण मृत्यू हाच तेथे साक्षात अनुभवरूपातून सामोरा

येतो. या मृत्यूच्या भोवताली असणारे सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ इतके विदारक आहेत की त्यावर कोणतेही भाष्य जड ठरू शकले असते.

त्यांच्या कादंब-यातील दु:ख संवेदनेत स्त्रियांच्या दु:ख संवेदनेचेही अनेक स्तर आहेत. विशेषत: ग्रामीण पातळीवरील स्त्रियांच्या दु:खाची अनेकरूपता त्यात वारंवार येते. घरातलं जोंधळे धान्य संपल्याने हवालदिल झालेली बायना, नव-याने टाकलेली बायनावहिनी आणि तिची कोंडी, अवघड वाटेवरून पाणी भरणारी आई, नव-यानं दुसरी बाई ठेवल्यानं घराची 'उपासमार' भोगणारी तारा, वासना आणि लग्न भावना कोंडावी लागणारी सुली, बांधावर कामाला जाता न येणा-या मजूर स्त्रिया या त-हेने समूहचित्रणाच्या अवकाशात दाटीवाटीत गर्दी करून आलेल्या स्त्रियांच्या दु:खाचे अनेक कण न कण त्यात व्यक्त होतात. दु:खाच्या या जाणिवांनी गवस यांच्या कादंबरीतील अवकाश व्यापून गेला आहे. नायकांची नैतिक भूमिका, त्यांच्या संबंधात येणारी माणसे, समाजव्यवस्थेतील शोषणव्यवस्था आणि भ्रष्टता, कलह, हेवेदावे, राजकारण, अनैतिकता व त्यातून येणारी मूल्य-हासाची दु:खद संवेदना, स्त्रियांची दु:खे आणि मृत्यूची अनुभवरूप दर्शने यातून अनेकविध दु:खसंवेदनांनी गवस यांच्या कादंब-यातील अवकाश गडद झालेला आहे.

### इ) कादंब-यातील भाषा –

भाषा ही सामाजिक संदेशवहनाची खास मनुष्याने निर्माण केलेली व्यवस्था आहे. त्यामुळेच भाषेतून समाजाचे अनेक स्तरीय रूप व्यक्त होत असते. त्या त्या भाषेचा समाज, त्या समाजाची जीवनशैली, भाषेची परंपरा आणि वर्तमान यांचे असणारे नाते, तिच्या मागील राजकीय, सांस्कृतिक संदर्भविश्व भाषेतून व्यक्त होत असते. अर्थातच व्यवहारातील भाषेपेक्षा साहित्याच्या भाषेला सहेतुकता अभिप्रायदर्शकता, अर्थविस्तार, चिरंतन संदर्भ दिले जात असल्याने तिला सर्जनशील रूप प्राप्त होते. जड झालेल्या भाषेला सजीव, चैतन्यरूप देण्यासाठी प्रतिभावंताला, कलावंताला भाषिक मोडतोड करून सतत नवा संदर्भ देण्याचा प्रयत्न करावा लागतो. सततच वाहत्या असणा-या बोलीभाषेच्या वापरातून तिची

अभिव्यक्ती क्षमता विकसित करत, सर्जनाच्या पातळीवर आणावी लागते. भाषेचे सर्वच भेद सहज मानून एका भाषिक समूहातील व्यवसाय, वय, लिंग, शिक्षण, प्रसंग, पेशा, जीवनशैली यानुसार वापरली जाणारी अनेकरूपे भाषेच्या सर्जनशीलतेत मौलिक मानली जातात. तेथे शुद्ध आणि अशुद्ध हा भेद मानणे अयोग्य ठरते. आपल्या अनुभवविश्वानुसार यासारख्या अनेक भाषिक संदर्भांचा वापर कलावंत आपल्या कृतींमध्ये करत असतो.

गवस यांनी आपल्या कादंब-यातून भाषेकडे या संदेशवहनाच्या दृष्टिकोनातून पहात तिचा वापर केलेला आहे. भाषा आणि संस्कृती, भाषा आणि भौगोलिकता, भाषा आणि जाती, भाषा आणि पोटजाती, भाषा आणि मूल्यविचार अशा विविध घटकांचा प्रत्यय आपल्याला त्यांच्या साहित्यातून येत राहतो. त्यासाठी त्यांनी ग्रामीण, अर्धनागर, नागर, व्यवहार भाषा, बोलीभाषा, प्रादेशिक भाषा अशा अनेक भाषिक पातळ्या एकत्र करीत आपल्या कादंबरीतील अनुभवविश्व निर्माण केलेले आहे.

गवस यांचा 'कळप' मधील रघू चिलमी आणि 'तणकट' मधील कबीर हे भाषेचा विचार सभानतेने करतात. बोलीभाषा बोलणं आणि त्यामधील उच्चार यांचे शहरीकरणात होणारे अवमूल्यन ते सतत जागरूकतेने मांडतात. शुद्ध बोलण्याला ब्राह्मणीकरण असे संबोधत असताना आपल्या संस्कृतीवर असणारा विशिष्ट जातिनिविष्ट वृत्तीचा प्रभाव आणि उतरंडीतील अनेक जातिवर्गांना भाषारूपातून ही उर्ध्वपातळीवर जाण्याची झालेली घाई त्यातून प्रकटते. उदा. 'कळप' मध्ये साने आणि रघूचा संवाद.

साने कविता ऐकून म्हणाला," तुला अजून शुद्ध उच्चार करता येत नाहीत. गावंढळच बोलतोस. "

"म्हटलं, शुद्ध उच्चार म्हणजे तरी काय ?"

"असं कसं ? ते तुला काय मी सांगितलं पाहिजे ? उच्चार थोडे ब्राह्मणासारखे शिकलेच पाहिजेत तुला. नाही तरी तू साहित्यात मागं पडशील. तिथं बामणांची मक्तेदारी आहे. पण मला बामण व्हायचं नाही त्यांच काय ?" ( पृ.१७६) यामधून गवस यांच्या कादंब-यातील नायक भाषेबद्दल कसा विचार करतात ते लक्षात येते.

प्रकरण ३ :

# राजन गवस यांच्या कादंब-यातील समाजचित्रण

अ) कादंबरीतील भूभागाचे सांस्कृतिक विशेष :

आ) ग्रामीण आणि गावपातळीवरील शहरीकरण :

इ) कुटुंब व्यवस्था :

ई) तरूण वर्गाची स्थिती :

उ) कादंब-यातील जातीयवादाचे चित्रण

# प्रकरण ३ : राजन गवस यांच्या कादंब-यातील समाजचित्रण

या प्रकरणात राजन गवस यांच्या कादंब-यातील समाजचित्रणाचा विविध पातळीवर विचार केला आहे

## अ) कादंबरीतील भूभागाचे सांस्कृतिक विशेष :

राजन गवस यांचा 'चौंडकं' ते 'तणकट' या कादंबरीमधील भूभाग हा प्रामुख्याने महाराष्ट्र आणि कर्नाटकाच्या सीमावर्ती भागातील आहे त्यात काही भाग कर्नाटकाचा ही येतो. राजन गवस यांच्या कादंब-यांतील बहुतांशी कथानक या ग्रामीण भागात घडत राहते. त्याचे नायक आणि त्यातील काही पात्रे ग्रामीण भागाकडून तालुक्याकडे जाताना आपल्याला दिसतात. या कादंबरीतील भूभाग हिटणी, वेळगुंदी, गिजवणं, हिग्लाज, संकेश्वर, व्हलेल्या, वडरगे, उत्तूर धामण, घटप्रभा, गोकाक कारव, जोगळभावी, नायकी, म्हागाव, कोट, ऐनपुरा, इंचनाळ, इचलकरंजी, कडगाव, गडहिंग्लज निगनूर, गजरंगी, हनिमनाळ, आळत्या, हारळी, करंबली, सडगाव, शेणगाव, फयाला, बेडकीहाळ, मिणच, गौनाळ, पिंपळी, हारंगाल, तारळ, तासगाव, आदमापूर, गजागांव असा महाराष्ट्र कर्नाटकचा सीमावर्ती प्रदेश आहे.

'चौंडक' या कादंबरीत महाराष्ट्र कर्नाटकाच्या सीमावर्ती भागाचा परिसर आपल्यासमोर येतो. या परिसरातील ग्रामीण जीवन गवस यांनी या कादंबरीतून आपल्या समोर उभे केले आहे. हा भाग म्हणजे हिटणी, वेळगुंदी, गिजवणं, हिग्लज संकेश्वर, हुक्केरी, घटप्रभा, गोकाक, कारव, जोगळ-भावी नायकी, म्हागाव, कोट हा आहे. 'चौंडक' या कादंबरीतील सुली, बायजा, सुबाना या सर्वाचे जे काही बरेवाईट घडते, ते या परिसरात. महाराष्ट्र कर्नाटकाच्या सीमावर्ती भूभागात असलेले यल्लमा देवीचे महात्म्य,

तिचा जनमानसावर असलेला पगडा, त्यांच्या मनातले तिचे खोलवरचे महात्म्य. हे सर्व या परिसराशी निगडित आहे. विशिष्ट भौगोलिक परिसर आणि त्या परिसरात असलेली सांस्कृतिक वैशिष्ट्ये आणि त्यांचा माणसांच्या जगण्यावर होणारा परिणाम यात दिसतो. उदा. सुबान्याच्या, घरात देवी आणायचे ठरते आणि सुलीचे 'कारण' सौंदत्तीला केले जाते. तेव्हा डोंगरावर जाताना व्हळेव्वा ही नदी लागते. या डोंगरावर जाण्याच्या यात्रेमध्ये अडथळे येऊ नये म्हणून या नदीत नैवेद्य टाकतात. तसेच या यात्रेतच मनोळी नदी लागते काहीजण या नदीची पूजा करतात, तर काहीजण अंग धुवून लिंब नेसतात आणि तेथून पायी चालत डोंगरावर येतात. त्याचप्रमाणे जोगळभावी येथे यात्रेतील लोक आपापल्या परडया पुजतात आणि त्या परडीत कोणी वाळला निवद, कुणी पोळीचा निवद टाकतात. असा या कादंबरीत उल्लेख आहे तसेच या सौंदत्तीच्या डोंगरावर यात्रेच्यावेळी असणा-या गर्दीचे वर्णन, "डोंगरावर सगळ्या बैलगाडयाच गाडया! बैलाचा तवंग डोंगरावर पसरलाता. देवळाकंडच्या बाजूला माणसांची थप्पीच्या थप्पी. ह्यात आपल्या गाडया कुठशा सोडायच्या हेचं कोडं. तुका शिंद्याला सतवायला लागलंतं!"(पृ.४६) अशाप्रकारे आलेले आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या वृत्ती प्रवृत्तींना मिळणारे विविध आकार, घडणा-या क्रिया प्रतिक्रिया या सर्वांचे अनेक नमुने राजन गवस यांनी आपल्या कादंब-यातून मांडून दाखविले आहेत. बायजाचा हात दुखायला लागल्यावर म्हातारीला वाटायला लागलं. "अवघडतच कुठलं... हे देवा धरमाचंच कायतरी असाय पायजे. न्हाईतर असा एकाएकी बावटा कसा दुखावंल. तोबी सुलीचे केसं इचरतानं...? हेच्यात कायतरी आसंलच. त्या एवढया देवरश्यांनी सांगितलं ते काय खोट आसंल... दुखतोय तो दुखतो, तेबी रात्रीचंच कसं....ऽऽ" (पृ.५) बायजा, म्हातारी, आक्कू जोगतीण शेवंताक्का, तानू आजी, गंगू जोगतीण, खरंदाळची बायको, घोरपडयाची बायको हे सर्वजण या विशिष्ट भूभागातील सांस्कृतिक वातावरणाचे प्रतिनिधित्व करताना दिसतात. त्यामध्ये आप्पा खरंदाळची बायको. घोरपडेची बायको या भागातील उच्च वर्गाच्या असून या परिसरात होणा-या आंबील घुग-याची जत्रा, डोंगरावरुन देवीला घरात आणण्याची विधी त्या गावतील निम्न वर्गाच्या देवदासींना घरी बोलावून

करून घेतात. या सर्वांचे वर्णन कादंबरीत येते. राजन गवस यांनी आपल्या खेडयाचा भूभागही अत्यंत संवेदनाक्षम पातळीवर उभा केला आहे. उदा."रस्त्याला साठ-सत्तर गाडयांची माळ तयार झाली. चाकांचे आवाज एकमेकात मिसळत गेले. रानभर ऊन गडद व्हायला लागलत. सगळं रान काळ्याशाप सापागत निपचिप तापीला पडलंत. मदीचं कुठंतरी एखादं बाभळीचं झाड तेवढं काजळाच्या डबीत उभ्या केलेल्या काडीगत दिसत व्हतं. सगळीभर मंद वा-याचं फुसफुसणं भरून गेलतं. गाडया आता स्वत:च्या तालात पुढं पुढे सरकत होत्या."(पृ.३८) असे खेडेगावातील रस्त्यांचे वर्णन केलेले आहे. त्याचप्रमाणे या परिसराचे वर्णन,"तळं शांत होतं. कुठंच कशाची हालचाल नव्हती. आभाळाचं दिसणारं पाण्यातलं रूप ख-या आभाळापेक्षा भलतंच गोड वाटलतं. काठावरच्या बाभळीच्या झाडांच्या सावल्या पाण्यात हळुवार वा-यानंसुध्दा हेलकावाय लागल्यात्या. आख्या तळ्यातलं पाणी संथ वलयांकित होऊन सुलीला निरखत बसलतं. सुलीला कशाचीच जाणीव नव्हती. कव्वा एकदा हयो ढीग आटपतोय असं तिला झालंतं. पायाला ढसणाच्या चिंगळ्या मासळयासुद्धा तिला जाणवेनाशा झालत्या. ती तिच्याच तालात एक एक मळका पिळा पिळून काढालती. मळींचा पाट दगडाभोत्यानं पाण्यात मिसळलाता." (पृ.१००) असे आलेले आहे. या वर्णनातून सुलीच्या मानसिक स्थितीचे चित्रण दिसते.

या कादंबरीमधील परिसराचे, तेथील भौगोलिक परिस्थितीचे जसे वर्णन येते, तसेच तेथे असलेल्या कृषी संस्कृती आधारित जीवन पध्दतीचेही चित्रण आलेले आहे. पावसाळ्यात तेथे असलेल्या धावपळीचे वर्णन,"गावात कामाला माणसाला माणूस मिळत नव्हता. सगळ्यांची धांदल उडालती. गेल्या वरसापेक्षा ह्या वर्षी पावसाला लवकरच सुरूवात झालती. शेतीची कामं आजून आटपाय नव्हती. पेरणी तरी आटपायची सगळ्यास्नी घाई लागलीती. प्रत्येकजण नुस्ता धावपळीत गुतपाळाता. सगळी नुस्ती हिकडनं तिकडनं पळापळ करालती... न्हाई म्हटलं तरी भाताची पेरणी तरी आटपायची सगळ्यास्नीच घाई लागलीती."(पृ.५८-५९) असे आहे इतकेच नाही तर या परिसरात साजरे होणारे सण, उत्सव यांचे ही वर्णन या कादंबरीत राजन गवस यांनी केलेले आहे. सणापूर्वी चालणा-या

तयारीचे वर्णन," सुलीनं ताटलीत चुन्याचं पाणी केलं. गायीचं पाय उठवायला ती उजदाराला गेली. दोन्ही हातांच्या मुठी केल्या. आणि मुठीचं तळवं उठवत बाहेरच्या उंब-याला आली. हळूहळू मुठींच्या तळव्याचा चुना जमिनीवर वाळंल तसं घर पांढरं शिबूर दिसाय लागलं."(पृ.७६-७७) असे आलेले आहे तर सणाच्या दिवशी असणा-या पद्धती, चालीरीतीचे वर्णन आलेले आहे. उदा."सुलीनं आरती पेटवली. वाडा ओवाळला. गोठा ओवाळून घेतला. ती देव्हा-याकडं आरती घिऊन गेली."(पृ.७७)

'भंडारभोग' या कादंबरीमध्ये तायप्पाच्या वाटयाला जे काही भोग आले, ते ही महाराष्ट्र कर्नाटकाच्या सीमावर्ती भूप्रदेशातच. जोगती-जोगते यांची प्रथा ही प्रामुख्याने याच भागात अधिक रूढ आहे. "जोगता म्हणजे यल्लम्माला वाहिलेला मुलगा. त्याला 'जोग्या' असे ही दुसरे नांव आहे. जोग्या देवीशी लग्न झाल्यानंतर तिच्याच वेषात म्हणजे साडीचोळी नेसून वावरतो. जोगतिणीला यल्लुमाचे तर जोग्याला परशुरामाचे रूप मानले जाते. या दोघाचे संबंध आई मुलासारखे मानतात. त्यांनी पति-पत्नी सारखे राहणे, मुलाला जन्म देणे, धर्मबाह्य मानले जाते, परंतु आज तरी अनेक जोगतिणी व जोगे लग्न न करताच राहतात. 'ताफा' ही चालवतात, देवदासीच्या विवाहविधीत या जोग्यांना महत्त्व असते. नव्या देवदासी होणा-या मुलीला 'मनोळीतील' स्नानानंतर किंवा 'जोगुळभावी' स्नानानंतर लिंब नेसवण्याचे महत्त्कार्य यांच्याच कडे असते. आजारी असलेल्या मुलाला किंवा मूल व्हावे म्हणून 'पहिले अपत्य देवाला वाहीन' या नवसामुळे पहिला मुलगा झाला तरी त्याला धर्मश्रद्धेमुळे देवाला वाहिले जाते... खंडोबाचा वाध्या मात्र देवाला अर्पण केलेला असूनही पुरुष वेषातच असतो. गुजरात मध्ये ही प्रथा आहे. बहुचरा देवीच्या नावाने सोडलेले पुरुष वा काही भक्त सुध्दा काही काळानंतर स्त्रीवेष व स्त्रीनाम धारण करतात."(१) असे त्याचे स्पष्टीकरण डॉ. मदन कुलकर्णी यांनी केले आहे.

देवदासींप्रमाणेच रूढीपरंपरेचा जोगता हाही बळी आहे. ही रूढी परंपरा या विशिष्ट भूप्रदेशात, विशिष्ट संस्कृतीच्या पोटातून आकाराला आली, तो भूप्रदेश कादंबरीमध्ये अनेक बारीक सारीक तपशीलासह आकाराला येतो. हा भूप्रदेश म्हणजे

इंचनाळ, ऐनापूर, इचजकरंजी, बेळगुंदी, कडगाव, गडहिंग्लज, गोकाक, जोगळभाव निगनूर, म्हागाव, गजरंगी, हनिमनाळ, हिटणी मनोळी, संकेश्वर, आळत्या, हारळी, करंबळी हा आहे. तायप्पाला जोगते बनविण्यासाठी कारणीभूत असणारी मानसिकता, या भूभागात असलेला यल्लु आईचा लोकमानसावर असलेला पगडा, कलव्वाचे तिला बळी जाणे यातून जाणवते. घरात असलेले आजारपण,दारिद्र्य दूर करण्यासाठी कल्लव्वा तायाप्पाला जोगते करते.

शेवंताक्का ने सांगितल्यामुळे कल्लव्वा तायप्पाला जोगते म्हणून सोडण्याचे ठरवते. त्यासाठी म्हाईच्या पुनवेला तायप्पाला डोंगरावर नेण्याचे ठरविले जाते. तायप्पा, कल्लव्वा, बसप्पा यांच्या बरोबर गावातील शेवंताक्का, पारव्वा, तानू सुतारीण या जोगते करण्याचा विधी करण्यासाठी बरोबर येतात. गाडीतून निघालेले हे सारेजण, 'मनोळी' नदीच्या काठावर येतात. येथे तायप्पाला आंघोळ करून लिंब नेसून डोंगरापर्यंत जाण्याचे शेवंताक्का सांगते. लिंब नेसलेला तायप्पाच्यामागे पारव्वा डोक्यावर जग घेऊन चालत असते. या लिंब नेसलेल्या तायप्पाच्या तोंडात लिंबाची एक काडी दिली जाते आणि ती काडी जोगळभावीला जाऊस्तर तोंडातून काढायची नाही असे सांगितले जाते. जोगळभावी येथे चालत आल्यावर त्याला पाणी पिण्याचे नाही म्हटले जाते, आणि तेथे असलेल्या देवळाजवळच्या घाणेरडया पाण्याच्या भावीवर तायप्पा हातपाय धुऊन गुळनी करून वर येतो, पण तेव्हाही डोक्यावरचा लिंब पडू देत नाही. शेवटी डोंगराच्या रस्त्यावर लागून चालत चालत डोंगरावर जाऊन ते पोहचतात.. तेथे वेणीकुंडाजवळ बसलेल्या तायप्पाच्या पायावर त्याचे पाणी टाकले जाते. त्यानंतर शेवंताक्का त्याला नवीन हिरवे लुगडे नेसवते. तेथे मांडलेल्या चौरंगावर म्हादु जोग्या जाऊन बसतो आणि तायप्पाला बाशिंग बांधायला लावतो. शेवंताक्का कटयार काढून देते. त्याला पटका बांधला जातो. आणि कट्या-ऱ्यावर मंडोळ्या, बाशिंग बांधल जातं. तायप्पालाही मंडोळ्या बांधून हळदीची पाच बोटं लावली जातात. पांढराधोट अंतरपाट म्हणून घेऊन ओल्या हळदीने स्वस्तिक काढले जाते. मूठभर

तांदूळ भंडा-यात घोळवून देतं दोघा चौघांच्या हातात दोन दोन दाणे दिले जातात. त्यानंतर शेवंताक्का तायप्पाच्या हातात चुडा घालते.

शेवंताक्का आलेल्या जोगतिर्णी कडून त्यांच्या परडया चौरंगाजवळ ठेवून घेते. पारव्वा त्याच परडयांची पूजा करते. परडयाच्या जवळ पाच नारळ, पाच कपडे, पांच तांब्ये यांचीही पूजा करते. प्रत्येक तांब्यात एक एक खारीक टाकते. परडीत ओला, सुका नैवेद्य भरते, त्याच्या शेजारी केळीच्या पानावर दही भाताचा नैवेद्य ठेवते.

त्यानंतर तायप्याला उगवतीकडे तोंड करून बसविले जाते. त्याला भंडारा, कुंकू लावून त्याचे डोके म्हादूच्या मांडीवर आणतात, मग समोर कटयार धरून कट्या-्यावर बाशिंग बांधलेला पटका लडबडत होता. अंतरपाटाचं फडकं मध्ये टाकतात. म्हादू जोग्याच्या हातात दुधाची वाटी दिली जाते. त्यानंतर शेवंताक्का कळसाकडे हात जोडून उभी राहते. जवळ असलेल्या पांच जोगतिणी तिच्याजवळ येऊन परडीला हात लावतात. सगळ्याजणी 'उदं ग ऽ आई ऽऽ उदं ऽऽ" म्हणत पाच वेळा परडया हलवतात. हातात असलेले खारिक, खोबरे तायप्पावर टाकतात. त्यानंतर म्हादु जोग्या वाटीतले दूध तायाप्याच्या तोंडाला लावतो. त्यानंतर शेवताक्का तायाप्याला उठवते आणि चौरंगाभोवती फिरवते.

दिवस मावळतीला तायाप्पाचे बाशिंग सोडले जाते. शेवंताक्का त्याच्या हातात दहीभाताचा नैवेद्य देते. बसप्पा व कल्लव्वा यांच्या हातात एक एक लिंबाची काडी देऊन वेणीकुंडाजवळ जाते. तेथे आल्यावर तायाप्पाच्या हातातला दही भाताचा नैवेद्य शेवंताक्का घेते आणि त्याच्या आईबापाच्या मध्ये त्याला उभे करून त्याच्यावरून उतरवून कुंडाच्या दोन्ही बाजूला टाकते. पारव्वा तांब्याभर पाणी आणून तिघांच्या डोक्याला लावते. तायाप्पाच्या तोंडात घालते, त्यानंतर म्हादू जोग्या आपल्या हाताने तायाप्पाच्या तोंडात पाण्याचा थेंब टाकतो. आणि सगळी माणसे देवळाकडे दर्शनाला जातात.

अशा प्रकारचा जोगते करण्याची विधी या परिसरात केला जातो. त्याचप्रमाणे या परिसरात होणा-या यात्रेपैकी सौंदत्तीची यात्रा जी वर्षातून दोनदा होते, त्या म्हणजे एक

'माघी पौर्णिमा' आणि 'चैत्र पौर्णिमा.' माघी पौर्णिमा म्हणजे रांडा पुनव, तर चैत्र पौर्णिमा अहेव पुनम मानली जाते. जोगते जोगतीणींसाठी रांडा पुनव महत्त्वाची असते. त्या दिवशी आळत्याच्या देवळासमोर जोगता जोगतिणी आरध्ये, चौंडकी सगळेजण गोळा होतात. तसेच काही बायका नवस फेडायलाही यावेळी येतात. सगळ्यांची कपाळ भंडा-याने माखून जातात. दुपारच्यावेळी देवळापुढे लाकडाचा ढीग करून पेटवला जातो. सगळीकडे धुराचा लोट पसरतो. तसे जोगते जोगतिणी त्या ढीगाभोवती परशुराम नाचवत जातात आणि म्हणतात,

"नाचवा ऽऽ ग... नाचवा...

परसुराम किचवा...ऽऽ

त्याचा किच जाग वा...ऽऽ

रांडपुनाव भोगव...ऽऽ"

या बरोबर जोगते नाचू लागतात. जोगत्यांचा एक एक ताफा या खचाकडे येऊन बसतो. टाळ्या वाजवून रडू लागतो. जोगतिणी त्यांच्या कंकण बांगडया वाढवू लागतात. त्या कंकणाचे तुकडे त्या ढिगात टाकू लागतात आणि ऊर बडवून धाय टाकून एकमेकींच्या गळ्यात पडून मोकळ्या रडू लागतात. जोगतेही याचप्रमाणे करत असतात. त्यानंतर सगळेजण गळयातल्या जुन्या दर्शनाच्या माळा तोडतात आणि ढिगात टाकतात. त्यानंतर प्रत्येकाच्या गळ्यात नवे दर्शन चढवले जाते. त्यानंतर निघणा-या पालखीवर खारेकखोबरे उधळून जत्रा पूर्ण होते.

तसेच या परिसरात राहणा-या जोगत्यांच्या मृत्यूनंतरचा विधी सुद्धा 'भंडारभोग' कादंबरीत आलेला आहे. कादंबरीत राघू जोग्या मृत्यू पावतो तेव्हा म्हादुमाला बाजूला घेतच तायप्पाचा घोगरा आवाज भाईर पडला -- "कुठं न्हायचं ऽऽ."

"आगं, आपल्याला गोठणाशिवाय दुसरी जागा नसती. गावाची जनावरं आणि आमी एका जाग्यालाच."

म्हादुमा कसाबसा पुटपुटला.

"पुढं कोण माणस गेल्यात ?"

भाऊ तुक्या आणि दादू कुणाकुणाला घिऊन गेल्यात. त्यास्नी गावातली पुरूषमाणसं मिळाली आसली तर बरं ऽऽ.

"आता हितलं काय आवरायचं न्हाई... रात व्हयाची वाट बघायची. अंधाराशिवाय जोग्याला माती न्हाई. आटपलं का हालावायचंच...." (पृ.२०३)

त्यानंतर त्याला खांदा देण्यासाठी गावातले कोणी माणूस येत नाही. आसपासचे सगळे जोगते जोगतिणी आलेले असतात. काही चौंडके आलेले असतात. तेव्हा ते आलेले तीन चौंडके आणि चौथा मायप्पा जोग्या खांदा देऊन राघू जोग्याला उचलतात. तसे सगळे जोगते मोठयाने रडू लागतात. राघू जोग्याला गावाच्या गोठणावर आणून डब-या जवळ आणतात. प्रत्येकजण तुळशीचा पानाने राघूच्या तोंडात शेवटचे पाणी घालतात. त्यानंतर राघूला डब-यात झोपवतात. तसे जमलेले सगळेजण रडत रडत मूठभर माती त्या खडयात टाकतात. तो खाडा भरून जातो. तसे सगळे जोगते ऊर बडवून हाणून घेतात. जोगतिणी रडू लागतात त्यानंतर सगळेजण गोल वर्तुळ करून उभी राहतात. त्यांच्यामध्ये म्हादूजोग्या पुढे येऊन त्या डब-यावरची मूठभर माती उचलतो आणि देवीच्या नावाचा उदं म्हणून खाली टाकतो. जवळ असलेल्या भंडा-याच्या पिशवीतून भंडारा काढून सगळीकडे टाकतो, नंतर पूर्वेकडे तोडं करून उभा राहतो तसे सगळे रडायचे थांबून म्हादूकडे पाहू लागतात. म्हादू पायातले पायताण काढून एकदा पूर्वेकडे वर नेतो, मग खाली आणतो. आणि मोठयाने बोलू लागतो,

"जगलीस तेवढं मातीत गेलं.
चिंदी कुंदी झाडून नेलं... हितन पुढं जलम घे
बाई बापय व्हवून ये..." (पृ.२०५)

त्यानंतर तो हातातले पायताण डब-याच्या मातीवर जोरजोराने आपटत राहतो. तसे सगळे जोगते तळव्यावर तळवा बडवू जागतात. त्यामुळे सगळ्या गोठणावर त्यांच्या "पि ऽऽ चिक ऽऽ पि ऽऽचिकऽऽ" टाळांचा आवाज घुमू लागतो. व जोगतिणी मोठयाने हुंदका देऊन रडू

लागतात. कादंबरीतून जोगते म्हणून जन्म घेणे आणि जोगते म्हणून मरणे असे जगण्याचे एक वर्तुळ त्याच्या अनेक रीतिरिवाजासह,विधिक्रियेसह व्यक्ती व समूह पातळीवर जिवंत होते. या त-हेने अनेक अंगाने कादंबरीतील अनुभव भूसांस्कृतिक अंगाने जिवंत होतो.

राजन गवस यांच्या कादंब-यांमध्ये येणारा विशिष्ट भूभाग स्थितिशील अथवा एका विशिष्ट भूतकाळाच्या प्रभावाखाली अशा स्वरूपात फक्त येत नाही तर त्यात वर्तमानाशी घडणारी गतिशील अशी प्रक्रियाही आपल्या समोर येते. तायप्पा हळूहळू मास्तरांच्या संघटनेमध्ये येतो आणि आपल्या जगण्याची अवकळा जी त्याला मानसिक पातळीवर जाणवली होती. ती अधिक तीव्र जाणीवेच्या पातळीवर लक्षात येऊ लागते. तशी तर ती तानाप्पालाही जाणवली आहे "संबाळ ग ऽ बाई ऽऽ भंडा-याची वाट जेवढी पिवळी तेवढीच कडू ज्यार हाय!"(पृ.१०७) पण हे जाणवणे तितकेच राहते. रूढी परंपरेच्या ओझ्याखाली ते देवशरण वृत्तीने स्वीकारले जाते. नकळत त्याची काही एक कारणमीमांसा ही त्याला जाणवू लागते. मास्तर म्हणतात,

"आणि तू मला सांग - ह्या सगळ्या जोगतिणी तुमच्या आमच्या खालच्या जातीतच का? वाण्या बामणाच्या का न्हाईत? त्यांच्या पोरी देवीला चालत नाहीत ? देवी आमच्या गरिबाच्याच मागं का लागती?"(पृ.२०७) जेव्हा तायप्पा त्यांना देवाच काम रिवाज म्हणून समजावू लागतो. तेव्हा मास्तर म्हणतात,

"मग रिवाज वरच्या लोकात बी पडाय नको ? बरं रिवाज हाय तो हाय. आमच्या ह्या जोगतिणीस्नी कोण जवळ घेतंय? सगळी कामापुरतीच वापरत्यात. मुंबई पुण्याला विकत्यात. हेबी देवीनंच सांगितलंय?"(पृ.२०७)

'चौंडकं' या कादंबरीमध्ये सुली आणि इतर जोगतिणी मंगव्वा, शेवंताक्का, रंगव्वा या सगळ्याच्या जगण्याला नव्या वर्तमानाचे परिमाण लाभत नाही. सुलीला ही देवीच्या नावावर होणा-या आपल्या आयुष्याची परवड जाणवत आहे. "कुटला घीऊन बसली देव आणि म्हातम? मला सगळं उकिरडयागतच वाटाया लागलंय?"(पृ.१३५) असे सुली म्हणते पण त्यांचे हे जाणवणे काही काळापुरत्या आलेल्या भावनेच्या उद्रेकातून निर्माण

होते. ही माणसे पुन्हा पुन्हा पूर्वापार रूढी परंपरेला शरण जातात. कारण सुली पुढे म्हणते. "सांगून तरी काय उपेग ऽऽ डोंगरावर बसतीया निस्तरणारी."(पृ.१३५) इतकेच नाहीतर सुली नव्या बाळजोगतिणी तयार करण्याच्या विधी मध्येही सहभागी होते व शोषणाची ही प्रक्रिया पुढे चालू राहते. असे 'चौंडकं' या कादंबरीत दिसते तर 'भंडारभोग' या कादंबरीमध्ये मात्र राजन गवस यांनी यातील रूढी परंपरेच्या शोषणाविरूद्ध निर्माण झालेल्या नव्या परिवर्तनवादी सामाजिक चळवळींची या समाजातील माणसांच्या जगण्यात झालेली घुसळण, त्यातून निर्माण होणारी होऊ पाहणारे मतांचे राजकारण, प्रसार माध्यमांची वृत्ती, तालुका पातळीवर उगवू पाहत असलेले पुढारीपण या सा-यांचे दर्शन कादंबरीच्या उत्तरार्धात घडवत त्यातील गतिशील अवस्था सूचित केली आहे. जोगत्यांच्या वस्त्या, घरे, त्यांचे गावातील इतर वस्तींशी असलेले नाते, कुटुंबाशी होत जाणारी फारकत अन् तुटलेपण, जोगतेपणाच्या भावनेतून येणारी जोडलेपणाची वृत्ती, लैंगिक नातेसंबंध, भानगडी, लैंगिक अत्याचार असे अनेक आयाम असलेला भूभाग गवस यांनी 'भंडारभोग' मध्ये दाखविला आहे. तायप्पा, तानप्पा, यमन्या, म्हादू जोग्या, आप्पा जोग्या, राघू जोग्या ही सगळी माणसे, जत्रा चौंडकं वाजवण्याचं आमंत्रण, निरनिराळया ठिकाणी होणा-या देवीच्या पूजा म्हणजे आंबील जत्रेच्या वेळची पूजा, कोटाला जाऊन कुंडाची पूजा करणे, आळत्याला रांडा पुनव करणे, म्हादू जोग्याच्या घरी गादीच्या भंडा-याच्यावेळी होणारी पूजा, गजरंगा गावात होणारी देव बसविण्याची पूजा या निमित्ताने ज्या ज्या ठिकाणी जातात त्या त्या ठिकाणाचा गाव कादंबरीत त्यांच्या भू वैशिष्ट्यासह चित्रित होताना दिसतात.

'धिंगाणा' कादंबरीत ही चेअरमन आणि त्याचे मित्र बाबल्या, शंकर, ढोल्या संब्या, जंब्या, किरवाड, शिब्या, धुम्या, बाशा, बाळ्या ज्या परिसरात ज्या गावात आपले हे सारे उद्योग करीत आहे, तो परिसर आणि ती गाव म्हणजे हारगाल, किरगांव, सडगाव, म्हगाव, मिणच वगैरे आहे. हा परिसर राजन गवस यांनी या कादंबरीत जिवंत केला आहे. हा ग्रामीण भागही स्वातंत्र्योत्तर काळातील आहे आणि या काळातील ग्रामीण राजकारण, त्यापायी शाळेमध्ये, डेरीमध्ये होणारा भ्रष्टाचार, जातीजातीचे परस्परसंबंध आणि त्याचा

राजकारणामध्ये होणारा वापर, सोसायटी मधील गडबडी, रेशनच्या दुकानात होणारी बनवाबनवी या सर्वांचे चित्रण करताना हे ज्या परिसरात घडते, तो परिसरही गवस यांनी संवेदनाक्षमरीतीने कादंबरीत जिवंत केला आहे. सडगावातील जकातनाका स्टॅण्ड, पानाची खोकी, शाळेची इमारत, गिरणी, दवाखाना या सगळ्यांचे बारकाईने ते चित्रण करतात. उदा. "स्टॅण्डवर माणसांची चिक्कार गर्दी. रस्त्यावर तर सगळी मुंग्याची रांग. आयलाऽऽ सडगाव बी लई वाढलं. कॉलेजला होतो तेव्हा फक्त बाजार दिवशीच एवढी माणसं. बाकीच्या दिवशी सगळा शुकशुकाट. कधी कॉलेज सुटलं की तेवढंच रस्त्यावर पोरांची गर्दी. आता बारा तास मुंग्याच्या रिवाणागत माणसं. बघावं तो चेहरा नवीन. त्यात इमारतींची भरमसाठ वाढ. पहिलं सडगाव आणि आताच सडगाव, जमीन अस्मानाचा फरक."(पृ.१२८) किरगावात गेल्यावरही केदारलिंगाचे देऊळ, गावाची पानंद, केदारलिंगासमोरची गर्दी, दुकान हे सारे बारकाईने सांगितल्यावर चेअरमनला काय वाटते, हे आपल्या प्रत्ययाला येते. चेअरमन हा आजच्या ग्रामीण भागातील तरूणांची मानसिकता उभी करतो. शहर आणि ग्रामीण या दोन्ही व्यवस्थांशी असलेले त्याचे नाते त्यातून आपल्यासमोर येते. हातात पदवी असूनही शहरी व्यवस्थेमध्ये स्वत:ला तो जोडू शकत नाही, आणि ज्या ग्रामीण भागातून तो आलेला आहे. तिथे ही एक प्रकारचा भकासपणा आहे. त्याची ही संवेदनशीलता गावाच्या परिसरावरून आपल्या समोर येते. उदा. "सरळ म्हशी गोठणावर तिरपटल्या. सगळं गोठण सत्ताड रिकामं. अजून कुणीबी कारटं म्हशी, घेऊन आलेलं दिसत नव्हतं. मनात यवजलेलं सगळंच मातीला मिळालं. आयलाऽऽ आता ह्या म्हशीचं काय करायचं? आणि पांग्याकडं कव्वा जायचं? उगच गावच्या पांदीवर नजर रूतवून बसलो. परसाकडचा एकटा दुसरा तेवढाच गोठणाकड येणारा. सूर्य कासराभर वर आलेला. काय केलं तरी गप्प बसवंना. हातात दगडं घेवून खेळाय सुरवात केली. त्यातही लक्ष लागंना, उगाचच झपाझप पाय उचलत पांढ-या धोंडयापर्यंत चालत गेलो. या दगडावर बसलं की आख्खं शिवार डोळ्या खाली येतं. म्हटलं इथ तरी घटका निघून जाईल. गडबडीने दगडावर चढून बूड टेकला. लांब मो-याच्या मळयापर्यंत नजर रूतवली. भकास भकास."(पृ.१३) त्याचप्रमाणे

यापरिसरातील ग्रामीण समाजात असलेल्या लग्न, बारसं सारख्या प्रसंगी असलेल्या चालीरीतीचा ही उल्लेख केलेला आहे. उदा. निवा-या मो-याच्या घरी मुलगा झाल्यावर झालेल्या बारशाच्या जेवणाचा प्रसंग. तसेच गावातील बोटयाच्या लग्नाच्या वरातीचे वर्णन ही आहे. त्या संबंधी चेअरमन विचार करतो, "कुणाचं लगीननी कुणाचं बारसं. पोराटोरापर्यंत चुकवणार नाहीत. सगळ्यांची हजेरी लागाया पाहिजे. चुलबंद म्हणजे चुलबंद माणसं पेव फुटल्यागत. खरं एखाद्याच्यात जायचं नाही म्हटलं की. एक माणूस फिरकणार नाही. केल्यालं सगळं ढोरास्नीच घालाय पाहिजे. आयला सगळं विचित्रच."(पृ.१०४) तसेच या भूभागाचे सांस्कृतिक वैशिष्टये सणवार, उत्सव यातून ही दिसून येतात. "चैताला जायचा ठराव किरवाडनं मांडला. सगळ्यांनी उचलून धरला. चैताला तालुक्यातनं माणसं जमातात कुस्तीचा जंगी फड, तारळ्याचा जोतिबा आणि मिणच्याचा केदारलिंग. दोघांचे चैत म्हणजे आख्ख्या गावाचा चर्चेचा विषय. सहसा आमचा चैत कधी चुकायचा नाही. दरवर्षी ठरल्यासारखं हजर. कुणाच्यात जेवायला बोलावलं नसलं तरी नुस्त्या कुस्त्या बघायला म्हणून हजर. त्यात त्या गावाला आमचा कोणचा पावणापै नाही. लांबचासुद्धा. निम्मं गाव निंगाडी. उरलेल्यात सगळी."(पृ.१०७) तसे या भागातील घरांचे "मामाच्या घरात सगळीकडं नुस्त्या कणगीच कणगी. मध्ये दोन तट्टे. शेजारीच टेबलावर बरंच कायबाय धुळ खात पडलेलं. लागूनच्या भींतीला भली मोठी गणपतीची दिवळी. त्यात गेल्या वर्षाची गणपतीची बैलं बसलेली. त्याचं अंग धुळीनं शपलेलं. गणपतीच्या दिवळीवर फोटोंची रांगच्या रांगा."(पृ.१०८) असे वर्णन आलेले आहे तर येथे असलेल्या धार्मिक मान्यता, 'पैस्याची देवी'च्या बाबतीत दिसते तसेच तेथील जेवणखाणामध्ये पुरणपोळीचे महत्त्व, येथे होणा-या उत्सवात मनोरंजनासाठी कुस्त्याही लढवल्या जातात. या सा-यांचे उल्लेखही या कादंबरीत आलेले आहेत.

'तणकट' या कादंबरीतही ग्रामीण भागातील दलित जीवनाचे ज्वलंत समकालीन वास्तव चित्रित केले आहे. चळवळींची विपरीतता, त्यातून होणा-या मूल्यांचा -हास आणि माणसाच्या जगण्याला येणारी असहाय्यता यांचे चित्रण करताना होणारा भू-भाग

अनुभवाचा भाग बनून होण्याचे चित्रणकौशल्य गवस यांच्या कादंबरीत अधिकाधिक सूक्ष्म आणि समर्थ होत गेल्याच्या खुणा या कादंबरीत आपल्याला पाहावयास मिळतात. कबीर कांबळेचा म्हारोडा आणि गावाच्या नकाशावर असलेले त्याचे स्थान, त्याचे रंगरूप हे इतके प्रत्ययदर्शीपणाने येते की त्याशिवाय कबीरची मानसिकता आणि संवेदनशीलता यांचे त्याच्याशी असलेले अभिन्न नाते जाणवू शकले नसते. कबीरच्या घराचे, "मृगाचं नक्षत्र निघाल्यापासून कबीरची नुसती धावपळ चालली होती. म्हारकीतल टपणं त्यानं एकटयानं तैयार करून घेतलं होत. पावसाळ्याची जोडणी म्हणून नाही नाही म्हणत गाडीभर जळण गोळा घातलं होत. त्याची बंदिस्ती केली होती. खोपटाची शेकरणी करून घेतली होती. फक्त कुडाला नव्या-जुन्या तुरकटया बसवायच्या होत्या. आता खोपटातही भलतीच दाटण झाली होती. राणे मालकानं आपल्या दाव्याची रेडी आर्दलीनं दिल्यापासून खोपटाच रूपच बदलून गेलं होतं. एका बाजूला चूल भानुशी. शेजारी जळणाचा खोपडा लागून न्हाणी. मध्येच आढयाची मेढ. तिला बांधलेली दांडी. तिच्यावर अंथरूणाचा आणि वाकळांचा ढीग. त्यावरच सगळ्याची कापडं. मध्येच झोपायची मोकळी जागा, कुडाला लागून गाडग्याच्या उतरंडया. शेजारीच गोठा. त्यात रेडी बांधायला मारलेले दोन खुट्टे. गोरणीत चगाल. जवळच शेळी बांधाय रोवलेला खुट्ट. तिच्या लेंडयांची पसरण. कोंबडया झाकायची डालगी. कोंबडयांनी हागून पांढराशीबूर केलेजी जागा. त्यावर ओतलेली राख. मगा खोपटाचं दार. तेही गंजक्या पत्र्याचं. मोकळेपणानं श्वास घेणंही खोपटात अशक्य होऊन जायचं. पुस्तक, वह्या खोपटाच्या पाकाडयात खोचून ठेवण्याशिवाय गत्यंतर नव्हतं."(पृ.१३९) इतके सूक्ष्म आणि तपशीलवार वर्णन केलेले आहे की त्यातूनच भूसांस्कृतिक वैशिष्टयेही दिसू लागतात. त्याचप्रमाणे गावातील म्हारवाडयाचे, "म्हारवाडयाच्या मध्यमागी असलेली तक्क्याची इमारत तेवढीच बंगलोरी कवलं सांभाळत उभी. बाकी सगळी खोपटं. कुठकुठं काळ्याठिक्क ार पडलेल्या खाप-या. तर काही खोपटांवर उसाचा काळपट पडलेला पाला. अशात भिमाबा म्हार आणि गोपाल म्हाराची पक्क्या विटांची घरं. सगळ्यात उठून दिसणारी. त्यांच्या चौकटीला लालभडक रंग लावलेले.

त्यामुळं त्यांचं ठळकपण अधिकच जाणवणारं. एकाच गल्लीचा म्हारोडा. तीस चाळीस घरं. गल्लीत सगळीकडे खडी उठलेली. मध्ये मध्ये मोठाले खड्डे; त्यात पाणी साचलेलं वर घुंगुरठयांचा तवंग."(पृ.७) असे वर्णन आलेले आहे तर गावाची रचना, "म्हारोडयाच्या खालच्या बाजूलाच मांगोडा. त्याच्या थोडया वरच्या बाजूला ढोराची तीन-चार घरं. म्हारोडयालगतच वरच्या बाजूला वडारांची पन्नासाठ घरं. लागूनच गावाला सुरवात होते. चार गल्लयांचे गांव, लागून भली मोठी गावंदर."(पृ.८) अशी तपशीलवार आलेली आहे. तसेच गावातील परिसराचे ही वर्णन पुढीलप्रमाणे चित्रित केलेले आहे. "कबीर नेहमीसारखा शेळी घेऊन वडाराची घरं ओलांडून चावडीजवळ आला आणि त्यानं आपला मोर्चा मरगुबाईच्या देवळाकडं वळवला. लांबलचक काठीला खुरप बांधून तो आज बाहेर पडला होता. मरगुबाईच्या देवळाभोत्यानं तीन-चार बाभळी मोकाट वाढलेल्या होत्या. मध्येच एक उंबराच आणि दोन पिंपळाची झाडं. चांगलीच अंग धरून उभी होती. आज कुणाच्या बांधाला जाण्यापेक्षा सरळ उंबराचा आणि बाभळीचा पाला शेळीला घालायचा या इराद्यानंच तो घरातून बाहेर पडला होता. देवळाच्या पायरीवर खांद्यावरचा टॉवेल ठेवून त्यानं खुरपं बांधलेली काठी उंबराच्या बारक्या फांदीवर टेकवली आणि खसाखस बारक्या बारक्या कवळ्याभर ढाळ्या त्यानं शेळीच्या पुढयात टाकल्या. शेळी त्यावर तुटून पडली आणि कबीर मरगुबाईच्या पायरीवर निवान्त टेकला समोर गावात जाणारा रस्ता मोकळा मोकळाच होता."(पृ.१९)

'चौंडकं', 'भंडारभोग', 'धिंगाणा','कळप' या कादंब-यांप्रमाणे तणकट कादंबरीचा परिसर महाराष्ट्र कर्नाटकाच्या सीमेवरीलच असावा असा आपल्या अंदाज करता होतो. तर त्या परिसरातीलच कबीरचे मित्रमंडळ म्हणजे पितांबर, बल्लाळ, राजा कांबळे, काशिनाथ ऐनापुरे, हिरामण यांचे आहे. कबीरचे गाव, तो कॉलेजमध्ये जात असणा-या तालुक्याचे गाव यांचे चित्रण कबीरच्या संवेदनशीलतेसह साकार होते. उदा. "तो गावच्या रस्त्याला लागला. उन्हाचा चणका वाढला होता. त्यानं कॉलेजच्या समोरून आरा रस्त्याला गेलेल्या पानंदीकडे पाय वळवले. तो झपाझप चालू लागला.

पानंदीभोवतीच्या चिक्क ाचे दाट जंगल भेसूर आणि भलतेच बेकार दिवस होते. मध्येच वाढलली आडोळशाची रोपटी पिवळ्या पडत चाललेल्या पानांना सांभाळत उभी होती. पानंदीत लोकांनी आपले सकाळचे उत्तरकार्य आटोपल्यामुळे एक विचित्र वास सगळीकडे पसरलेला होता. त्या वासाने त्याचे डोके भणाणत चालले तशी त्यानं आणखी गती वाढवली.

तो पांदीतून मुख्य रस्त्याला आला. त्याला रस्ता मरून पडलेल्या सापासारखा निर्जीव आणि भेसूर वाटू लागला. सभोवतालच्या सिमेंट कॉंक्रिटच्या इमारती अंगावर आल्या सारख्या वाटत होत्या. त्या इमारतींच्या ओझ्याखाली आपण चिरडले जातोय असा भास त्याला होऊ लागला. अशातच पाच-सहा गावठी कुत्र्यांचा कळप त्याच्या समोरून त्याच्या पुढेच चालला. त्यातील बरीच कुत्री खंगलेली. पाठीला पोट भिडलेली, भयंकर कृश. एकाला तर लूत भरल्यामुळे त्याचे सगळेच केस गळून गेले होते आणि त्याची फिक्कट कातडी उघडी पडल्यामुळे ते अत्यंत विचित्र दिसत होते. त्याच्या ढुंगणावर कसली तरी जखम झालेली होती आणि त्याभोवती चिलट चिकटून बसली होती. त्या सर्व कुत्र्यात एकच कुत्रा मात्र रूबाबदार, अंग राखलेला दिसत होता. तोच त्या बाकीच्यांना आपल्या भोवती फिरवतोय असे वाटत होते. तो कुत्री चालता चालता मध्येच थांबली, तसा मध्यभागीचा गुबगुबीत कुत्रा एकदम गुरगुरला, तशी बाकीची जीवाच्या भीतीने जवळजवळ पळू लागली. कबीरने चालता चालताच दगड उचलला आणि नेम धरून त्या गुबगुबीत कुत्र्यावर भिरकावला. तर दगड नेमका लूत भरल्या कुत्र्यावर बसला आणी ते जोरान केकाटलं. बाकीची कुत्री पळाली. सर्वात पुढे गुबगुबीत कुत्रा होता. कबीरला पुन्हा स्वत:चाच राग आला आणि पुन्हा त्याने दाण ऽ दाण ऽऽ पाय आपटत चालण्याचा वेग वाढवला."(पृ.३८)

कबीरचे गाव नेमके आपल्याला सापडत नसले तरी बेळगुंदी, इंचनाळ, कडगाव, लिंगनूर, बोरवट्टी यरगट्टी या ग्रामीण भागाच्या "नंदाप्पाच्या तळीजवळ बेळगुंदी आणि इंचनाळकडून येणारी पानंद आणि गावातून जाणारी पानंद या रस्त्याला मिळतात."(पृ.३२-

३३) या उल्लेखातून आपल्याला या परिसराची जाणीव होते आणि कबीरला आपल्या जातीच्या विकासासाठी करावा लागणारा संघर्ष आणि समकालीन राजकारणात त्याला प्राप्त होणारी विपरीतता त्यातून साकार होते. माणसाचा भौगोलिक वातावरणाशी आणि विशिष्ट अशा निसर्गाशी संबंध येतो. तेव्हा त्याचा माणसाच्या मनावर होणारा परिणाम-ही राजन गवस यांच्या कादंब-यातून व्यक्त होतो. उदा. "तो चढणीनं मराठी शाळेजवळ पोहोचला. शाळेची लांबसडक इमारत. भोवती निलगिरीची दाट झाडी. मैदानात बरोबर शाळेसमोर उंच झेंडयाचा खांब आणि दगडी कठडा. शाळा तळ्याच्या काठाला. एका बाजूला उंचावर तो शाळेकडे न वळता तळयाच्या काठानं गेला. पाण्यावर हळूहळू अंधार उतरत होता. पाण्यावर मंद उजेडाची तकतक. हळुवार उठणा-या लाटा. तो नेहमीच्या उंच दगडावर जाऊन टेकला. या दगडावर बसलं की सगळं शिवार आणि सगळ गाव नजरेच्या टप्पयात येतं. दिसत नाही फक्त म्हारवाडा. तो लांबवर नजर रूतवून बसला. लांबवर कडगाव, लिंगनूर अशा गावाचे लाईटचे दिवे लुकलुकत होते. आकाशात ढगांनी घातलेली अंडी काळपट अंधुक होत चालली होती. अंधाराचे हळूहळू गडद होत जाणे, त्यात झाडांना अंधाराच्या ढिगाचे हळूहळू येत जाणारे रूप आणि समोरच्या शिवारातील ऊसाच्या मळ्यावर हिरवट काळपट अंधार. एक विचित्र रंग रसायन त्याच्या डोक्यात तयार होऊ लागलं. मग त्याच्या कानावर गावातल्या चित्रविचित्र आवाजाचं आदळणं सुरू झाल. त्यानं पुन्हा नजर तळयातल्या पाण्याकडं वळवली. आता पाणी आणि अंधार... हळूहळू त्याचं डोकं शांत होत गेलं आणि मग तो तसाच बसून राहिला..."(पृ.४७-४८) अशा प्रकारे भूभागाचे माणसाच्या जीवनावरील मानसिक,भावनिक अशा अनेक स्तरांचे संबंध गवस यांनी आपल्या कादंबरीतून साकार केलेले आहेत.

त्याचप्रमाणे या भागातील धार्मिक रीतिरिवाज, तेथील सणवार, यात्रा यांचे वर्णन ही आलेले आहे. त्यातून येथील सांस्कृतिक वैशिष्टये दिसून येतात. उदा. येथील लक्ष्मीची यात्राचे वर्णन, "आज लग्याच्या लक्ष्मीचा दुसरा दिवस होता. भागातली प्रसिद्ध जत्रा. सात वर्षातून एकदा लग्याची लक्ष्मीयात्रा भरते. सगळ्या गावात घरपती दोनतीन दोनतीन बकरा

पाडायचा नेम होता. पहिल्या दिवशी लक्ष्मीला पोळीचा निवद. दुस-या दिवशी खारकांड. सात वर्षानं जत्रा भरत असल्यामुळे जवळपासच्या दहापंधरा गावातल्या माणसाची रीघ लग्याला लागलेली असायची."(पृ.१२०) असे आलेले आहे तर या गावात साजरा होणारा बेंदूरच्या सणाचे वर्णन, "बेंदूर दोन दिवसावर येऊन ठेपलेला होता. या वर्षाची कर जगदाळ्याच्या घरात म्हटल्यावर सगळी पळापळ. एकटया भरमूनानालाच करावी लागत होती त्यात यावर्षी कुठल्याच म्हाराला बैलाच्या दोरीला हात लावू द्यायचा नाही. असं सगळ्यांच्या मतानंच ठरलेलं होतं. दरवर्षीच्या करीला दोन दो-या म्हारांच्या हातात आणि दोन दो-या मांगाच्या हातात हा रिवाज पडून गेला होता."(पृ.१६१) यातून येथील सणामध्ये विविध जाती जमातींचे महत्त्वही दिसून येते. तर बेंदराच्यां दिवशी, "गावातल्या घरातल्या बेंदराची कणीक वाजायला लागली. घराघरातून बैलाच्या मिरवणुका सुरू झाल्या. चावडी जवळ हळूहळू बघ्यांची गर्दी जमाय लागली. मांगवाडयातली झांज पथकातली पोरं उत्साहानं ढोलाच्या तालावर झांजा वाजवत नाचत होती. बैलांच्या चौ-या, अंगावरचा हुरमेस, फुटणा-या लसव्या आणि वाजणा-या फटाक्याच्या आवाजात गाव तरंगत होत."(पृ.१६४) असा उत्साह असतो. यातून येथील संस्कृतीची वैशिष्टये ठळकपणे दिसतात.

राजन गवस यांच्या 'चौंडकं' ते 'तणकट' या कादंब-यातून महाराष्ट्र आणि कर्नाटकाच्या सीमावर्ती भागातील भूजीवनाचे त्याच्या सर्व सांस्कृतिक संदर्भासह चित्र आलेले आहे. त्यामध्ये महाराष्ट्राचा इतरभाग आलेला नाही. ज्या परिसराशी लेखकाच्या जगण्याची नाळ जोडलेली आहे. तो परिसर कादंबरीत आपल्या अस्सल जिवंतणाने आकार घेतो. लेखकाच्या कादंबरीतील परिसर, या परिसरातील संस्कृती आणि कादंबरीतील व्यक्तींचा, परिसराशी असणारा संबंध त्यामधून जिवंतपणाने साकार होतो. राजन गवस यांच्या कादंब-यांनी हा भूभाग सर्जनशील, पातळीवर कादंबरीत आणला ही एक वैशिष्टयपूर्ण अशी कामगिरी म्हणता येइल.

'तणकट' या कादंबरीला जेव्हा पुरस्कार मिळाला. तेव्हा राजन गवस यांनी काढलेले उद्‌गार अत्यंत बोलके आहेत," 'तणकट' चे यश हे ख-या अर्थाने त्या परिसराचे यश आहे."(२)

## आ ) ग्रामीण आणि गावपातळीवरील शहरीकरण :

'कादंबरी' हा एक बहुआयामी असा वाङ्मय प्रकार असून तो एका अर्थाने सामाजिक दस्ताऐवज आहे. नेमाडे म्हणतात "इतर कोणत्याही साहित्यप्रकारापेक्षा कादंबरीचे अस्तित्व अधिक समाजसापेक्ष असते. अर्थातच समूहाच्या जाणिवा व्यक्त करणे आलेच. "(३) अर्थात हे सामाजिक चित्रण केले जात असताना त्यामध्ये लेखकाची काही एक भूमिका अंतर्भूत असते. लेखकाने भूमिका घ्यावी किंवा घेऊ नये हा प्रश्न कादंबरीच्या संदर्भात उपस्थित होत नाही. ती असतेच वरवर पाहता, "लेखकाची माणूस म्हणून जगताना काही एक भूमिका असते कलावंत म्हणून निर्मितीच्या प्रवासातून जाताना लेखक चिंतनाच्या उजेडात ती उजळून घेत असतो. या उद्योगात त्याची भूमिका ही तावून सुलाखून निघत, कधी कधी अंतर्बाह्य बदलणे शक्य असते."(४) असे रंगनाथ पठारे सांगतात.

राजन गवस यांच्या कादंबरी लेखनातून प्रकट झालेली त्यांची ही भूमिका कादंबरी लेखनातील सामाजिक मूल्यभावाचे स्वरूप स्पष्ट करते. राजन गवस यांच्या कादंब-यातील सामाजिक चित्रणाचा आवाका फार मोठा आहे. त्यात प्रामुख्याने ग्रामीण जीवनाचे वास्तव प्रकट होते. त्याच बरोबर गावपातळीवर होऊ पाहणारा शहरीकरणाचा प्रभाव आणि त्यामधून येणारे एक सांस्कृतिक तरंगतेपण चित्रित होते. ग्रामीण जीवनातील आर्थिक, धार्मिक, जातीय शोषित घटकांच्या जाणिवांचे सूक्ष्म आणि विपुल तपशील आणि इतर घटकांशी होणा-या त्यांच्या आंतर प्रक्रियांना मिळणारे स्थान त्यांच्या कादंब-यात उत्तरोत्तर वाढत गेलेले दिसते. या अर्थाने गवस यांचे सामाजिक जाणिवांचे आकलन अधिकाधिक व्यामिश्र व सूक्ष्म, सभान होत गेलेले दिसते.

गवस यांच्या 'चौंडकं' ते 'तणकट' या कादंब-यांच्यामधून प्रामुख्याने ग्रामीण जीवन चित्रण आलेले आहे. त्यांच्या कादंब-यातून महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागातील

ग्रामीण परिसर, शेतकी संस्कृती, खेडयाची सामाजिक आणि आर्थिक रचना, त्यातील कुटुंब व्यवस्था, माणसामाणसाचे संबंध, समूह जाणीव या सर्वांची स्पष्ट आणि वास्तव चित्रणे आली आहेत. 'चौंडकं' आणि 'भंडारभोग' पेक्षा 'धिंगाणा', 'कळप', 'तणकट' या कादंब-यात स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण भागातील परिवर्तन, राजकारणाचा वाढता प्रभाव व बदलत जाणारी एकंदर सामाजिक व्यवस्था ते व्यक्त करतात. 'चौंडकं' कादंबरीचे आशयकेंद्र 'देवदासी' या प्रथेमधून एका कुटुंबाच्या वाट्याला आलेली अस्वस्थ मानसिकता आणि सुलीच्या वाट्याला आलेले भयावह जीवन हे असल्याने त्यात ग्रामीण जीवनाच्या अनेक रीतीभातींचे संदर्भ येतात. उदा. "सुलीनं ताटलीत चुन्याचं पाणी केलं. गायीचं पाय उठवायला ती उजदाराला गेली. दोन्ही हाताच्या मुठी केल्या. आणि मुदीचं तळवं उठवत बाहेरच्या उंब-याला आली. हळूहळू मुठींच्या तळव्याचा चुना जमिनीवर वाळंल तसं घर पांढरं शिबूर दिसाय लागलं... सुलीनं आरती पेटवली.वाडा ओवाळला. गोठा ओवाळून घेतला. ती देव्हा-याकडं आरती घिऊन गेली."(पृ.७६-७७ )सुबाना आपलं जळकीच रानं सुलीच्या खर्चाच्या तजवीजीसाठी गणपा मिसाळाकडे गहाण टाकतो. यासारख्या घटनेतून लहान शेतक-याची स्थिती आणि त्यातील सांस्कृतिक संदर्भ मिळत असले तरी ते कादंबरीचे आशयकेंद्र नसल्याने फक्त जीवन चित्रणाचे धागेदोरे व्यक्त करण्याइतक्या स्वरूपात येतात. 'भंडारभोग' कादंबरीमध्ये मात्र तायाप्पाचे कुटुंब हे शेतक-याचे कुटुंब आहे. बसप्पा आणि संगप्पा हे दोघं भाऊ. शेतकरी बसप्पाच्या आजारी मुलाला बरे करण्यासाठी डोंगराच्या बाईला जोगते म्हणून सोडण्यात येते. कादंबरीचे केंद्रस्थान रूढीपरंपरेचा बळी असलेला जोगता, जोगत्याचे आयुष्य व त्यांच्या जीवनाची समस्या ही असली तरी ग्रामीण भागातील माणसांच्या मानसिकतेवर या रूढीपरंपरा जगल्या आणि फोफावल्या आहेत. 'चौंडकं' पेक्षा 'भंडारभोग' मध्ये या समस्येचे चित्रण होताना ग्रामीण पार्श्वभूमी अधिक मोठया आणि विस्तृत तपशीलाने आली आहे. तायप्पाच्या वाट्याला आयुष्यात जे काही भोग आले त्याचे सामाजिक आकलन, अनेक घटकांशी त्याची असणारी गुंतागुंत जाणण्याची प्रक्रिया 'भंडारभोग' पासून वाढीला लागलेली दिसते.

तायाप्पाच्या आजारपणाचा खर्च एकाच घरात राहत असल्याने संगप्पावर ही पडतो. तो विचार करतो,... "आमी दोघांनीच किती मरायचं? ह्येनी काय आपलं घरात टेकून खातील सुखात –हातील. पर माझ्या पोरीचं कसं व्हायच? ह्येच्या परास आ–ताच चूल फोडल्याली काय वाईट? म्हणतील शेजारीपाजारी आसं झालं म्हणून आसं केलं. म्हणणात. कोण-काय पोटाला आनून घालणार हाय? काय उसनं पासनं बघणार हाय. ज्यो तो आपला आपला. ह्येंच्यात –हावून हाडं काशीला जातील आणि पोरं माळावर पडतील.... एकदा काय तो कंडका पाडायलाच पायजे..."(पृ.५९) त्यात तायप्पा पुन्हा आजारपणामुळे व जोगतेपणाच्या मानसिक अस्वस्थतेमुळे फारसा कष्टाच्या कामाला उपयोगी पडणारा राहिलेला नाही. जोगत्यांशी असणा–या त्याच्या उठबशीमुळे या कुटुंबात तो विसंगत ठरू लागतो आणि तायाप्पा हळू हळू घरापासून, कुटुंबापासून तुटत जातो. तायाप्पाच्या जगण्याची ही करूणता ज्या ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबात घडते, त्यामध्ये शेती जीवनाचे, शेती कामाचे, चालीरीतींचे अनेक तपशील आल्यामुळे ते वास्तव जिवंत आणि ठसठशीत आले आहे. उदा. "...संगाप्पानं गुडघ्याचं मुटकुळं सोडवलं आणि हाळी मारतच गुरवाला औत सोडाय सांगितलं. दिवस मावळून कवाच गेलता. घराकडं जायाला नाही म्हटलं तरी अंधार पडणार. अजून बैल पाण्याला घालायची. मग खंदडा जुपुन जायाचं, म्हणजे बक्कळ रात व्हईल, म्हणून तो अंग झटकून उठला. शेवटचं तास म्हणत म्हणत गुरवानं आडास मारून घेतलं. आता पुन्हा वरच्या टपण्याला यायला नको म्हणतच त्यानं कुळवाच वालं सोडलं,"(पृ.५७) तसेच शेतीविषयक कामाचे उल्लेख,... "एकाच आठवडयात दोन वळीव पडून गेलतं. माणसाला माणूस मिळाय तयार नव्हतं. जो तो आपल्या कामात अडकलाता. सगळ्यांचीच तारांबळ उडालती. आता चार दिवसांतच रोहिणी निघाली तर पेरणाची घाई उडणार होती. त्यामुळं जो तो आपापल्या शेतात बांध बंदिस्ती येचणी–बोचणी ह्येच्यातच लागलाता. संगाप्पाचा जीवतर सगळ्या कामाच्या राबत्यानं घाईला आलता. गडयाला कसला तो दिवस पुरा पडत नव्हता. थोरला शेताकडं कधी आला कधी नाही असंच चाललंत. आजून वडयाकडं कूप लावून घ्यायचा होता. बांबरात बांधाचा बी पत्ता

नव्हता. गावदर येचायची तशीच पडलीती. गुरवकीला तर अजून कशालाच हात लागाय नव्हता. काय काय करायचं ह्येच संगप्पाला सुचाय तयार नव्हतं... कल्लवा आणि आक्कव्वा गुरवकीतल्या टपण्यात फळ घिऊन बांध घालायला लागल्यात्या. तायप्पाचं आपलं बांबरात येचणं, भरून टाकणं सुरू होतं. उन्हं कलतीला लागल्यावर त्याला शेतात कसलं ते गमंना. त्यानं येचल्यालं तेवढं भरून टाकलं आणि सरळ बुट्टी हातात घेऊन घराचा रस्ता धरला. रानात माणसांची नुस्ती झुंबड दिसालती. बघंल तिकड माणूस. सगळ्याचीच घाई चाललीती. तायाप्पा हिकडं तिकडं नजर फिरवतच बांबरातनं कोयनाईच्या भावीपास्नं वर सरकला. त्यानं नेहमीची वाट बदलली आणि हवालदारच्या गांवदरीने मुरूकटयाच्या घराला बाहेर पडला. गल्लीत औषधाला माणूस नव्हतं. एक दुसरी तेवढीच दारात पाय पसरून बसलेली दिसत होती. तायाप्पाला आपण उगचच एवढया लवकर परतलो असं वाटाय लागलं. आणखी एखादी पात तरी लागली असती. उद्याचा बोजा हलका झाला असता. "आपलं काम बी खुळ्यागतच हाय" तो मनातल्या मनात पुटपुटला, त्याचं त्यालाच हसू आलं. "काय न्हाई बांबरात जरा येचलं..." म्हणतच तो पुढं झाला.(पृ.७३-७४) यातून शेतक-याच्या घरातल्या माणसांच्या दैनंदिन कामकाजाच्या,जगण्याच्या या संदर्भात तायप्पाच्या जगण्याचे हे स्थित्यंतर,रुपांतरण कसे सूक्ष्मत: घडत जाते,याचे प्रत्यंतर आपल्याला येते.

'धिंगाणा', 'कळप', 'तणकट' या कादंब-यातून त्यांचे आशयविश्व बदलले आहे. "स्वातंत्र्यो-तर काळात ग्रामीण भागात शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात जे परिवर्तन झाले. त्यामुळे सत्तेची आणि अर्थव्यवस्थेची केंद्रे झपाटयाने बदलली. आर्थिक विकासाचा जवळचा मार्ग राजकारण आहे, असे ग्रामीण माणसाला कळून आले. त्यामुळे ग्रामपंचायती पासून तर पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानसभा, लोकसभा ह्या प्रत्येक निवडणुकीत आपल्याला यश मिळावे अशी अभिलाषा तळागाळातला ग्रामीण माणूस बाळगू लागला. त्यातून त्याचे वेगळे रूप अभिव्यक्त होऊ लागले. जसे राजकारण तसेच समाजकारण झाले. शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्र सुद्धा अपवाद राहिले नाही. अशा ह्या संक्रमण अवस्थेत

तेथील तरूण पिढी ही ख-या अर्थाने भांबावून गेलेली आहे. समोर कोणतेही आदर्श नाहीत, मूल्ये नाहीत. तसेच परिश्रम करून ही त्याचे सार्थक नाही. याची झालेली जाणीव. त्यामुळे ही तरूण पिढी ख-या अर्थाने सैरभैर झाली. ह्या शिक्षित पिढीचे चित्रण राजन गवस यांनी आपल्या तीन कादंब-यांमधून अतिशय डोळसपणाने केलेले आहे. 'धिंगाणा', 'कळप', 'तणकट' ह्या कादंब-यातून अशा सैरभैर वृत्तीची तरूण पिढी आपल्याला दिसते. ती ख-या अर्थाने एकुण भारतीय समाज व्यवस्थेचे प्रातिनिधिक चित्रण करते." (५) असे सदानंद देशमुख सांगतात.

'धिंगाणा' ह्या कादंबरीतून चेअरमन आणि त्याच्या बरोबरीची तरूण पोरे यांची मानसिकता, दिशाहीन अवस्था, त्यांच्या जगण्याला आलेली भरकटलेली अवस्था प्रकट होते. ती ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर. चेअरमनचा बाप हा एक लहान शेतकरी. "त्याची अर्धा एकर जमीन विकून आलेला पैसा कुणाजवळ तरी वतला. तर तो नोकरी कुणीही देईन. पण मरेपर्यंत ऐका जमीन विकून तुला नोकरी लावली."(पृ.२)

स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्रातील ग्रामीण व त्यातील परिसरातील वृत्ती प्रवृत्तीचे चित्रण, तरूण पिढीची कुंठितता हेच यामधील प्रमुख आशयकेंद्र असल्याने त्यात शेती जीवन आणि त्यांच्याशी संलग्न इतर अनेक व्यवसाय, आजच्या काळातील डेरी उद्योग, गाव सोसायटी, सरपंच आणि निवडणुका या 'नवीन उद्योगांचे' अनेक बारीक सारीक तपशील कादंबरीतील ग्रामीण जीवन परिसर अर्थपूर्णतेने व्यक्त करत, महाराष्ट्रातील खेडयातील जीवनात बदलत्या सामाजिक मूल्यभावांचे नैतिक अधिष्ठान दिवसें दिवस कसे खालावू लागले आहे; त्याचे मार्मिक चित्रण गवस यांनी आपल्या कादंब-यातून केले आहे. १९६० नंतरची महाराष्ट्रातील ग्रामीण संस्कृती, खेडयातील साधेपणा, नैसर्गिकता, समूह जीवनाच्या संबंधातून येणारी नाते संबंधाचे दृढपण हे चांगले गुण गमावून बसू लागले आहे. "आमच्या गावच्या पंचायतीत यापूर्वी काय काय खाल्लं नाही. वीजेचे खांब खाल्ले. गटारे खाल्ली. गोठण खाल्ला. सगळं सगळं खाल्लं. गावाचा सत्यानाश केला. गावाची इज्जत घालवली. गावाचा पाय मोडला. गाव बरबाद झालं."(पृ.२१८) या सांस्कृतिक व

सामाजिक -हासाला जे घटक कारणीभूत झाले. त्यांच्या कारणाचाही अचूक वेध गवस यांच्या कादंब-यातून घेतला जातो. "धोंडी पाटील व्हता तवा बायका वाड्यावरनं जातानंबी चपल्या हातात घीवून जायच्या. रस्त्याला दिसला तर पाठमो-या व्हयाच्या. गडी शब्दाचा इमानी. गाव शब्दाचं ताबेदार. आनी आता काय रं... हे? हागाय बसलेल्या बायका हालत न्हाईत. त्यें भाडे पुढारी झाल्यात.. मातीत गेलं पुढारीपण!" (पृ.२२५) अशापद्धतीने 'धिंगाणा' कादंबरीतून हे काहीशा तिरकसपणाने आणि उपरोधिकपणाने व्यक्त होते. तर 'कळप' आणि 'तणकट' मध्ये अत्यंत गंभीरपणे त्याचा वेध घेतला जातो. शहरीकरणाची ही प्रक्रिया शहरालागतची गावं, तालुकापातळीवरची गावं, यातून आपल्या समोर येते. शहरीकरण करण्याची वाढीस लागलेली वृत्ती , औद्योगिक संस्कृतीच्या अभावी त्याचे केवळ अनुकरण करण्याची वाढीस लागलेली वृत्ती. त्यातून आलेले, बाजारीपण, सवंगता, चंगळवाद यामुळे कृषि संस्कृतीच्या मूलभूत घटकात झपाटयाने होऊ लागलेले परिवर्तन व मूल्य-हास याचे चित्रण गवस यांनी कादंब-यामधून समर्थपणे केले आहे. उदा. "आरं... आमच्यां सात पिढीत कुणी लोकास्नी लुटायचा धंदा कराय नव्हता. तो ह्या रांडच्यानं सुरू केलाय. म्हणून डोकं फिरतंय. आजून दहा वरसं माझ्या जीवावर फिरून खावू दे. मी घालायला गब्बर हाय. खरं ह्यो, लोकास्नी बुडवायचा धंदा बंद कर म्हणावं. लोकांचा सराप लई वाईट."(पृ.६५-६६)

त्याच प्रमाणे 'तणकट' बद्दल महेंद्र कदम लिहितात, "साठनंतरच्या महाराष्ट्रातील दृश्य स्वरूपातील प्रभावी स्थित्यंतर म्हणजे दलित चळवळ होय. या चळवळीच्या रूपाने आणि घटनेतील तरतुदीच्या फायद्याने दलित वर्ग झपाटयाने जागृत झाला, तसेच खेडयापाडयातील दलित समाजही सुधारू लागला. त्याचवेळी राजकीय सत्ता मराठयांच्या ताब्यात आली. साहजिकच खेडयापाडयातील मराठा वर्ग आणि दलित वर्ग यांच्यातील ताणतणाव वाढत गेले. या ताणतणावास आधुनिकीकरणाच्या विकृतीने अधिकच खतपाणी घातले गेले. त्यामुळे संबंध गावाचा जो सलोखा होता, तो नाहीसा होऊन, प्रत्येकजण स्वतंत्रपणे विचार करू लागला. यातून जातीयता नष्ट होण्याऐवजी ती वाढीस लागल्याचे

आढळू लागले. त्यामुळे खेडयामध्ये सुधारणा होत असतानाच तेथील, 'मानवीयता' या महत्वाच्या स्थायीभावास सुरंग लागला आणि खेडी अधिकच विकृत बनू लागली. या बदलत्या ग्राम व्यवस्थेचे सूक्ष्म-तपशीलांसह परिणामकारी सादरीकरण 'तणकट' मध्ये झालेले आहे." (६) या महेंद्र कदम यांच्या विवेचनातून लक्षात येते की आधुनिकीकरणामुळे खेडेगावात दूध डेअरी, पतसंस्था आल्या असल्या तरी बाळासाहेब शेडबाळेसारख्या स्वार्थी व्यक्तीमुळे गावातील महारवाडा आणि मराठा वर्ग यांच्यात वैमनस्य येते. त्यामुळे गावातील ग्रामव्यवस्था, समाजव्यवस्था यांना तडे जातात. त्यांच्यामध्ये जातीय समस्या उभ्या राहतात. त्यामुळे गावाचा विकास होण्याएवजी जातीय समस्या वाढून गाव अधोगतीकडे जाताना दिसते. ते पाहून थळू आजा कबीरला म्हणतो, "लेकरा, आसं न्हाई. एकदम तोडून नाही जमत गावाला, किती केलं तरी पांढरीतीलच हाईत तीबी. काळीज-एकच हाय. त्यास्नीबी न्हाय दुकवायचं. हळूहळू गावात बी फरोक झालाय. तुज्यासारख्या पोराला मांडीला मांडी लावून घेत्यात. पोरा, नशीबवान हाईसा. आमाला बेलटयाशिवाय मारा नव्हता. आता त्ये गेलं का न्हाय? तसं जाईलं सगळं हळूहळू बाबासाबाची पुण्याई. दुसरं काय?"(पृ.६९) यातून गावगाडा आणि गावातीलं परंपरा यांचे एकमेकांशी असलेले नाते थळू आजाच्या बोलण्यातून दिसते. त्यांच्या मते ही परंपरा आणि आधुनिकीकरण यांच्या समन्वयातूनच गावाची प्रगती होऊ शकते. अशाप्रकारे 'तणकट' मधून भविष्याच्या दिशेतील समाजवास्तव ही दिसून येते. त्याबद्यल महेंद्र सुदाम सांगतात,"परंपरेतील आधुनिकतेमध्ये ग्राम संस्कृतीमधील क्षमाशीलवृत्ती, सहनशीलता, शेती, परंपरेशी संबंधित असलेल्या लोकांची टिकून राहण्याची वृत्ती, समूह प्रधानता, उच्चतर पातळीवरची नैतिकता, कौटुंबिक सलोखा, सामंजस्य, माणुसकीवरील निष्ठा, गावगाडयातील सलोखा, आदी मूल्यांचा समावेश करता येतो." (७) या मध्ये "परंपरेतील आधुनिकतेचा राजन गवस यांनी गांभीर्याने विचार केला आहे," असे महेंद्र सुदाम कदम यांनी म्हटले आहे. (८)

त्याचप्रमाणे जमिनीत वाढलेल्या सगळ्या तणकटांची काढणी झाली तरी कृषीसंस्कृतीतील मूलभूत घटकात "तगणे आणि नव्या रूपात तरारून येणे हा तर आपल्या कृषी संस्कृतीचा अव्दितीय वारसा आहे."(पृ.२३८) असा तगण्याचा आणि तरारून येण्याचा गुणधर्म आहे. आणि तो आक्काबा राणेच्या कृतीतून, कबीर आणि मोहन बल्लाळ यांच्या चिंतनातून व कृतीतून तग धरून आहे. त्यामधूनच परंपरा व आधुनिकता, ग्रामीण संस्कृतीतील देश्य घटक, नवनवे प्रभाव पचवून टिकून राहतील. कृषि संस्कृतीतील, परंपरा व आधुनिकता मधील क्षमाशीलवृत्तीचे उदा. अक्काबा राणे आहे. म्हारवाडयाने शेवटपर्यंत विरोध केलेला असला तरी ते कबीरला सायकल देतात. तर समूहभावाने जगण्याचा गुणधर्मच म्हारवाडा आणि गावातील सवर्णाच्या मधील भिंती पाडणारा ठरू शकतो. याचे उदाहरण. 'तणकट' मध्ये ही दिसते. गोंदबा म्हाराची आक्कव्वा म्हारवाडयाचा विरोध असतानाही गावात धान्य मागायला जाते. तेव्हा तुका खांबल्याची बायको सुरवातीला तिला सुनावते पण नंतर लगेच दोन पसा भात तिला वाढते. त्याच प्रमाणे बाळबाची बायको ही तिला अंबील प्यायला देते आणि सुपभर भात देते. इळक्याची भिवराही भात घालते. या सारखी समूहभावाची नाती गावात असल्याचे चित्रण कादंबरीत येत,ग्रामीण संस्कृतीतील देशीयतेचे घटक अधोरेखित होतात.

## इ ) कुटुंब व्यवस्था :

राजन गवस यांच्या कादंब-यामध्ये ग्रामीण पातळीवरील वेगवेगळ्या जातीस्तरावरील कुटुंबजीवनाची चित्रणे रेखाटली गेली आहे. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर शहराप्रमाणेच ग्रामीण पातळीवरही संयुक्त कुटुंब व्यवस्थेचा झपाटयाने –हास होत गेला. उदा. 'कळप' मध्ये सिकल्या आणि त्याच्या भावंडांत जमिनीवरून भांडणे होतात. जमिनीच्या लहानशा तुकडयासाठी एकमेकांशी मारामारी करतात. त्यात जमीन मिळवायची असली तरी त्यांच्या आईला सांभाळायलाही कुणी तयार नसतात. आईला सांभाळण्यासाठी तयार होतात, त्याच्यामागे जमिनीचा मोहच असतो. अशाप्रकारे संपत्ती, शेती, घरदार यावरून सुरू झालेल्या कलहामुळे माणसामाणसात वैरभाव निर्माण होऊ लागला व संयुक्त

कुटुंबांची विभक्त कुटुंबे होऊ लागली. 'भंडारभोग' मध्ये संगाप्पा हा तायप्पाच्या आजारपणाचा व जोगते होण्याच्या खर्चामुळे कंटाळून वेगळे घर करण्याचा विचार करू लागतो.

'चौडकं' मधील म्हातारी, बायजा, सुली आणि सुबाना यांचे कुटुंब एकमेकांच्या मायेने बांधलेले आहे. बायजाच्या हात दुखण्याने व आजारपणाने म्हातारीच्या जीवाला घोर लागतो आणि त्यातूनच 'डोंगराच्या देवीचं म्हतव' घरात शिरतं. देवदासी सुली तरूण झाल्यावर नैसर्गिकपणे बबन्याच्या सहवासात येते. बायजाच्या मनातील कुटुंबाची कल्पना इतकी दृढमूल आहे की देवदासी सुलूच्या नैसर्गिक भावभावनांचे काय यांचा प्रश्नही जाणिवेत उमटत नाही अथवा कुटुंबासंबंधाच्या त्यातील माणसांच्या मूल्य कल्पना इतक्या खोलवरच्या आहेत की सुलूचे बदलते वागणे न सहन झाल्याने ती हाय खाते. तिथून आई आणि मुलीमध्ये कटुतेचे नाते सुरू होते आणि बायजेच्या मृत्युनेच ते संपते.

कुटुंब व्यवस्थेतील नात्यांची पडझड 'भंडारभोग' मध्ये ही संपत्ती, शेती, कष्ट, घरदार, कर्ज यावरून सुरू होते आणि तायप्पा व संगप्पा यांच्या मनात भिंती वाढू लागतात. 'भंडारभोग' मध्ये गवस यांनी ग्रामीण कुटूंब व्यवस्थेच्या –हासाचा बारकाईने वेध घेतला आहे. या कुटुंब व्यवस्थेत मुलाचे स्थान वरचढ असले तरी न कमाविणा–या मुलाला त्यात त्याला काही महत्व नाही. तायाप्पामुळे होणारे कर्ज आणि त्याचे न कमावतेपण त्याला कुटुंबापासून दूर नेते. त्यामधूनच ग्रामीण कुटुंब व्यवस्थेतही असलेली वास्तवता गवस आपल्या समोर मांडतात. जोगत्यांचे रूढीपरंपरेने होणारे विदारक जीवन 'भंडारभोग' मांडत असताना, गवस यांनी कुटुंबव्यवस्थेच्या आपल्या सर्व कल्पनांनाही एक अर्थाने प्रश्नार्थक छेद दिला आहे. तायप्पा आणि रत्नव्वाचे बरोबर राहणे, देवदासींच्या मुलांचा प्रश्न, देवदासींनी अनेकाबरोबर संबंध ठेवणे, समलिंगी संबंध या सगळ्यामधून कुटूंबव्यवस्थेतील लैंगिक संबंध, त्याला कायद्याची चौकट, वारसाहक्क, मुलांचे संगोपन, एकनिष्ठता इ. तथाकथित रूढ कल्पनांना हादरे बसत मानवीय संबंधाना येणारी अवकळा आपल्याला या

संबंधाचा व धार्मिकतेने त्यावर केलेल्या अत्याचाराचा पुन्हा नव्याने विचार करावयास लावते. उदा. या संबंधी तायप्पा आणि मास्तर यांच्यात झालेला संवाद. तायप्पा म्हणतो,

"मास्तर, चौंडक्याला कोण पोरगी देणार? ह्यास्नी जात काय गोत? कुठल्यातरी जोगतीला झालेलं वावरं पॉर."

तायप्पाने सांगून टाकलं.

"मग ह्यो असाय राहायाचा? " मास्तर आश्चर्य चकित झाला.

"तसंच म्हाणाकी खरं ह्येच जरा वायलं हाय. ह्येनं सिद्यु जोग्याला ठेवून घेतलंय." तायप्पा पुटपुटला आणि मास्तरला काय बी समजलं नाही. तो नुस्ताच दोघांच्याकडं बघत बसला. त्याला कोडं सुटंना. तसा मास्तर बोलता झाला,

"म्हणजे मला काय समजलं नाही?"(पृ.२११)

तायप्पाच्या करूणजीवनाला कुटुंबाचा एखादा घटकं जसा कारणीभूत ठरतो, तसेच तायप्पाला कुटुंबच उरलेले नाही, (रूढ अर्थाने) संपत्ती, वारसा, मुलेबाळे आणि गोतावळा यापैकी काहीच नाही. यातही त्याच्या करूणार्त जीवनाचे एक टोक गुंतलेते आहे. आई कल्लवा त्याच्यासाठी शेवटपर्यंत जीव टाकते, एका शोषकाने दुस-या शोषकाला कुठली कसली मदत करावी! इतकेच ते आहे.

'भंडारभोग' मधील कल्लवा, आक्कव्वा किंबहुना सगळ्या स्त्रिया या शोषित अवस्थेत जगताना दिसतात. 'चौंडकं' मधील सुली, बायजा असो की पुढे 'तणकट', 'धिंगाणा', 'कळप' मधील स्त्रिया असोत. कुटुंबातील स्त्रीचे निकृष्ट स्थान गवस यांनी आपल्या समोर उभे केले आहे. (त्या विषयी स्वतंत्र अशी चर्चा केलेली आहेच) राजन गवस यांनी कुटुंब व्यवस्थेमध्ये होत असलेली पडझड आणि -हास यांचे चित्रण ज्याप्रमाणे केले आहे. त्याप्रमाणे कुटुंबातील जिव्हाळा, माया, ओलावा यांची ही चित्रणे आली आहे. उदा. 'चौंडकं' मध्ये म्हातारी आणि सुली यांचे नाते असेच जिव्हाळ्याचे आहे. म्हातारीला अर्धांगवायूचा झटका येऊन अंथरूणावर झोपून असते. तेव्हा सुली तिचे कापडे बदलणे, तिचे अंथरूण बदलणे आणि ही घाण झालेली कपडे ती तलावावर जाऊन धुऊन टाकते.

नेहमी म्हातारीला स्वच्छ ठेवण्याचे आणि तिला खाऊ घालायचे ही ती काम करत असते. तर 'तणकट' मध्ये कबीर आणि त्याचे कुटुंब चे नाते ही असे मायेच आहे. म्हारवाडयात राहणारा कबीर हा तरूण मुलगा आपल्या कॉलेजच्या स्कॉलरशिप मधून घरात धान्य भरत असतो. तसेच कॉलेज मधून जाऊन आल्यावर शेळीला चरायला नेणे, घरातील इतर कामेही करत असतो. त्याला आपल्या आई वडिलांच्या कष्टाची जाणीव असते. त्यामुळे कधी कधी गावात जाऊन बांधावर ही काम करत असतो. यामुळे सदबा- गंगव्वा यांना आपल्या या मुलाचे कौतुकच असते. त्याचप्रमाणे थळूआजा व कबीरचे नाते असेच आहे. म्हारवाडयातील थळूआजाचा कबीरावर अतिशय जीव असतो. तो नेहमी कबीरजवळ आपल्या म्हारवाडयातील हालचालीची चर्चा करत असतो. त्याला म्हारवाडयातील गौत्या, पांडया यांची नुसती उठाठेव आवडत नसते. इतकेच नाहीतर वेळप्रसंगी कबीरला आपल्या गावातील परंपरा आणि गावगाडा यांचे असलेले नाते समजावून दलितांची ही प्रगती होईलच अशी आशा व्यक्त करत असतो.

राजन गवस यांच्या कादंब-यातून ग्रामीण जीवनातील संयुक्त कुटुंब पद्धतीच्या -हासापासून ते कुटुंबजीवनातील नाते आणि जिव्हाळ्याचे चित्रण करताना कुटुंब व्यवस्थेतील अनेक संवादी आणि विसंवादी स्वर त्यात घडत असलेल्या परिवर्तनासह त्यांनी चित्रित केले आहते. त्याच बरोबर देवदासी, जोगते, जोगतिणी, चौंडके या सर्व विविध जातीजमाती मध्ये रूढी आणि अंधश्रद्धेने ग्रासून टाकलेल्या समाजातील व्यक्तीच्या जगण्यातून तथाकथित कुटुंबाच्या संकल्पनाना छेद देणारे अनेक प्रश्न ही आपल्या समोर अत्यंत दाहकतेने उभे केले आहेत. या अर्थाने गवस यांच्या कादंब-यातून कुटुंब या संकल्पनेचा जातीधर्मनिविष्ट असा वेगळाच स्तर आपल्या समोर मांडलेला आहे.

### ई)तरूण वर्गाची स्थिती :

राजन गवस यांच्या कादंब-यात 'चौंडकं' ते 'तणकट' समाजातील तरूणांची समस्या आजच्या सामाजिक वास्तवात त्याचे स्थान, समाजाची तरूण माणसांकडे पाहण्याची दृष्टी, त्यांची आर्थिक व मानसिक कुचंबणा यातून निर्माण झालेले प्रश्न अशा

अनेक पातळ्यां-वर विचार करण्यात आला आहे. गवस यांच्या कादंब-यात सुली, तायप्पा, चेअरमन, रघू कबीर हे सर्व तरूण आहेत. सुली आणि तायाप्पा ज्या धर्म व्यवस्थेचे बळी आहेत, अशा बळी असलेल्या अनेक करूण स्त्री पुरूषांचे वर्तुळ त्यांच्या भोवती आहे. चेअरमन, रघू आणि कबीर याच्या भोवती असलेल्या बाबल्या, शंकर, पांग्या, ढोल्या, संब्या, जंब्या, किरवाड, धुम्या, बाशा (धिंगाणा), दिलावर, सुरेश, शंकर, तांबट, आप्पय, सिकल्या, एस. डी. बाबल्या (कळप) राजा, पितांबर, मोहन बल्लाळ (तणकट) या मित्रांचे वर्तुळ आहे. ते समाजातील मराठा समाज, बहुजन वर्ग, मुस्लिम वर्ग अशा वर्गातील तरूणांचे आहे. त्यातून तरूणांच्या अनेक सामाजिक समस्यां चित्रित केलेल्या दिसून येतात. उदा. 'धिंगाणा' मध्ये चेअरमन हा तरूण आणि त्यांच्या वडिलांमध्ये असाच विसंवाद झालेला दिसतो. ग्रामीण परिसरात राहणारा चेअरमन तालुक्याच्या ठिकाणी येऊन ग्रॅज्युएट होतो. तरी त्याला आपल्या व्यवस्थेतील भ्रष्टाचारामुळे नोकरी मिळत नसते. परंतु घरात वडिलांना वाटते की ह्यालाच नोकरी करायची नाही आणि घरात बसून फुक्कट खायचे आहे. चेअरमन यावर विचार करतो, "आणि नोकरी मिळायला बापाची प्रतिष्ठा लागतेच की. ती आमच्या बापाला कुठं हाय? गावात चार मानसं मानतात. म्हणजे बापाला प्रतिष्ठा आहे, असंच वाटतं. गाव सोडून ह्याला कोण कुत्र विचारतं? आणि म्हणे प्रतिष्ठित! मिळाली तरी मी करणार नाही. कोण करेल? सारखं सारखं मरेपर्यंत माझ्यामुळं नोकरी लागली, हे ऐकून कोण घेणार? त्याच्या जीवावर नोकरी मिळवायची म्हटली तरी मिळूही शकेल. त्याची अर्धा एकर जमीन विकून आलेला पैसा कुणाजवळ तरी वतला तर नोकरी कुणीही देईल. पण मरेपर्यंत ऐका - जमीन विकून तुला नोकरी लावली. शिंदयाच्या विठयाला बाप सांगत नाही, हे त्याचं मोठेपण. विठयाचे भाऊ म्हणतातच की वीस हजार मोजलं तवा आमच्या विठयाला बेंकेत नोकरी लागली. आता असली नोकरी करण्यात काय अर्थ? सबरू तात्याच्या पक्यानं घरातल्या म्हशी विकून मास्तरकी मिळवली. मास्तरकी काय म्हशीच्या किमतीची नोकरी? करत्यात लेकाचे. करू द्या. मला तशी नोकरी मिळवायंची नाही. हे एकदा बापाला ठणकावून सांगायला हवं. सांगायच खूप ठरवतोय. पण

बाप तोंडाला लागला तर लागाय पाहिजे. मग भडभडा सांगता येईल. त्याच्या तोंडाला लागाय मी घाबरतोय असं नाही. पण समोरा समोर कधी बोलतच नाही. त्याला मी तरी काय करणार? उगच आईच्या पाठीमागनं पिरपिर लावतोय. आता तिच्या पाटीमागं पिरपिर लावून काय उपयोग? कळाय पायजे."(पृ.१-२) असे चेअरमनचे आपल्या वडिलांबद्दल मत असते. याला कारण आपले वडील चेअरमनला समजून घेत नाहीत असे त्याला वाटत असते. त्यांच्या मते चेअरमन हा, रिकाम टेकडेपणा करणारा, गावात उचापती करणारा आहे. नोकरीत्याला मिळत नाही असे ते समजतच नाही, उलट चेअरमन नोकरी करू इच्छित नाही असे त्यांना वाटत असते. यामध्ये चेअरमनला त्याचे वडील समजूनच घेत नसतात. इतकेच नाहीतर त्याला ही काही प्रश्न समस्या असू शकतात. याचा ते विचारही करत नाहीत. वडिलांबद्दलचा हा विरोध म्हणजे एकाअर्थाने प्रस्थापितांबद्दलचा विद्रोह, तरुणवर्गाच्या मानसिकतेत असलेली व्यवस्थेविषयीची बंडखोरी या स्वरुपात प्रकट होते.त्याच प्रमाणे 'भंडारभोग' मध्ये तायप्पाच्या वाटयाला आलेली कुचंबणा, जोगता म्हणून जगण्याची सक्ती घरातून केली जाते. तायप्पाच्या आजारीपणामुळे आईच्या अंधश्रद्धेमुळेच तायप्पाच्या वाटयाला जोगतेपण येते. इतकेच नाहीतर घरातूनही वेळोवेळी त्याच्या पुरूषीपणाचा अपमान करून त्याला जोगता म्हणून जगण्याची सक्ती केली जाते. अशावेळी त्याच्या मानसिक स्थितीचा ही विचार केला जात नाही. त्याच्या मनाची तयारी होण्यास काही काळ लागतो. कारण घराप्रमाणेच समाजातूनही त्याला जोगतेपणाकडे ढकलेले जाते. अशावेळी तो विचार करू लागतो," न्हाई न्हाई म्हटलं तर आजारपणात सात आठ हजार गेलं... घरातल्या कामाचा सगळा इचका झाला त्यो झालाच! उलट दवाखान्यात आनी काय झालंच नाही.

थोरल्या आबाचं म्हयना दोन म्हयने यातच गेलं. काकूला सगळ्या कामाचा ताप... सगळ्यास्नीच दमीवलं. च्या आयला ह्यातच संपलो असतो तर... काय बिघडलं असतं? आता ह्या देवानं बरं केलय खरं, ह्या देवाच्या कामाला आनी किती पैसा लागतोय कुणास धक्कल..."(पृ.२२) अशा प्रकारे तायप्पाला घरात होणाऱ्या खर्चाची कल्पना असतेच तर

जोगते झालेला तायाप्पाशी घराचे संबंध तुटतात. आई म्हणून कल्लव्वाला त्याची माया वाटते परंतु त्याचवेळी ती विचार करते, "तायाप्पानं घरला इवूवने न्हाईतर आल्यावर आनी कलागती वाडायलाच लागतील... चालल्यलं घर मोडून बसलं... ह्येचं काय घसाघसा राबणारा गडी हाय, पोरं हाताखाली येतील. आमचं कसं? न्हाई म्हटलं तरी बबन्या हाताखाली यायला चार-पांच वरसं लागतील. तवर सुमी आताच लग्नाला आल्यागत दिसाय लागलीया. सगळाच ख्योळ मोडंल. खरं ह्येचं एवढं त्येनं काय घोडं मारलंय....? त्या दिसी भांडला तेवढाच की मग माझी रोज झंणपण व्हतीया. आनी बोलतोय मग त्येचंच एवढं तिक का लागाय लागलंय..."(पृ.१५३) अशाप्रकारे तायाप्पाशी संबंध ठेवण्यातही माया आणि घर यातील द्वंद्व तिच्या मनात कसे चालले आहे ते दिसून येते.

'चौंडकं' मध्ये जोगतीण झालेल्या सुलीला जोगतिणीच्या धर्माप्रमाणे वागावे लागते. तरूण सुलीच्या मनात येणा-या सहज तरूण सुलभ भावनांचा विचार बायजा, सुबान्या करीत नाही. त्यांच्या मते घराण्याची अब्रू महत्त्वाची असते. बायजा विचार करते, "ह्येच्या आगोदर घरला कदी काळं लागाय न्हाई... आता ही बया काय करती कुणास घक्कल... हिचाच पाय चुकला बिकला तर आदीच चाक निसटलेल्या गाडयाचं बावकडंबी मोडून पडलं.... गावात-हायचं कठीण व्हईल... सुलीला सगळं एकदा समजून सांगाय पायजे.. खरं सांगायचं तरी कसं? आता का लहान वय? पदर होऊन चार वरसं झाली तिचं तिला कळत बी आसंल."(पृ.१२१) तर सुलीचे बबन्याकडचे आकर्षण वाढून त्याच्यामुळे ती मातृत्व धारण करते. तेव्हा मात्र आईवडिलांच्या रागाचा बळी होते. अशावेळी "कामाचा वकोत झालाता. गावातनं हळूहळू मानसं रानाकडं निघालती. गल्लीतल्या कडंनं घरांच्या खाप-यावरनं उन्हं दाट व्हवून घरंगळाय लागलीती. सुली आपल्यात नादान गल्लीतनं एक एक पाय, उचलायला लागलीती. तिला आता घरातलं आईचं वागणं नको नको वाटाय लागलतं. सारखा सारखा त्योच ठोका ऐकून जीव आंबलाता. आदीमादी बाबानंबी डफरायला सुरवात केलती. त्यामुळ घरात घटका घालवायची म्हणजे तिला मरण आल्यागत वाटाय लागलतं. त्यात बबन्याला घरात यायचं आईनं कव्वाच बंद केलतं. त्येच्या घरात

जावावं म्हटलं तर त्येच्या घरातलाबी टोकवर येऊन बसलीती. सुलीला गल्लीतनं फिरायची सुद्धा चोरी झालती. ती खालमान घालून एकएक पाय उचलाय लागलीती. खरं चौकटी-चौकटीतनं आपल्याबद्दल कोण तरी काय बाय बोलाय लागलंय, असं तिच्या मनाला उगचंच वाटाय लागलंत." ती मनावर दगड ठेवून पुढं सरकालती.(पृ.१३१-१३२) अशा प्रकारे समाजाकडून, घराकडून होणारी तिची कोंडी ती व्यक्त करते.

'तणकट' या कादंबरीमध्ये मात्र कबीरची होणारी कुचंबणा वेगळीच आहे. गावातील सवर्ण आणि दलित यांच्यामध्ये होणा-या संघर्षामुळे परंपरेने चालत होणा-या गावगाडयाला सहन करावे लागते. ग्रामीण संस्कृतीत गावगाडयामध्ये सगळेच महत्त्वाचे असतात. कारण गावगाडा हा एकमेकांवर आधारीत चालत असतो. परंतु शहरी चळवळींप्रमाणे गावात चालणा-या या दलित चळवळीमुळे मात्र या गावगाडयाला धक्का लागतो अशावेळी तो आपल्या समाजातील लोकांना योग्य मार्गाने हक्क मागण्यासाठी समजावतो, परंतु शेडबाळेच्या नादी लागलेले ते लोक मात्र त्याचे ऐकत नाही. त्याउलट त्याला आपल्या समाजातील लोकांची अवेहलनाच सहन करावी लागते. तो विचार करतो, "मनातली सगळी आग उसळी मारून वर आली की आपल्याला आवरताच येत नाही. असं का व्हावं? अशी अस्वस्थता आपण किती काळ सांभाळायची? कोंडून घेणंही आपल्याला जमत नाही. कशासाठी आपण ही अस्वस्थता घेऊन बसतोय? ह्यातून आपल्या पदरात पडणार आहे तरी कायं ? नाहीच पडले पदरात तरी आपण ह्या सगळ्याशी झटंझोबं देण्याचं सामर्थ्य मिळवलं पाहिजे! एक ह्यापुरतं तरी कणखरं होण्याचं ध्येये जमंवलं पाहिजे..."(पृ.१३६) इतकेच नाहीतर आपल्या समाजातील गौत्या, पंढ-या, डेप्युटी गोपाळा यांची चुकीची भूमिका तसेच तालुक्यात राहून दलित चळवळी करणारे प्रा. अवचित भालेराव, फणींद्र कांबळे, बनसोडेसारखे स्वार्थी पाहून कबीर हतप्रभ होऊन तो कुणातच सहभागी होत नाही. त्याला कळते की दलितांच्या संघटित प्रवृत्तिमध्ये त्यांनाच लुबाडयाची प्रवृत्ती सामिल आहे. तेव्हा अशा संघटित प्रवृत्तिना कोणतीही निश्चित दिशा राहिलेली नाही. कारण या प्रवृत्तिमध्ये, चळवळीमध्ये नेते अर्धशिक्षित आणि दलित

समाजही अशिक्षित असल्याने या संघर्षाला विकृत स्वरूप येऊ लागले आहे. कबीरची अस्वस्थता,कोंडी आहे ती ही,एकंदरीतच नव्या रुपात प्रस्थापित होऊ पाहणा–या व्यवस्थेशी निगडितच आहे. त्यातील मूल्य –हासातून ती आलेली आहे.

त्याचप्रमाणे 'कळप' मध्ये रघू चिलमीला शाहीरकीची, कवितांची आवड असते. त्याचा राग रघूचा वडिलांना असतो. त्यामुळे वडिलांचा मारही रघूने खाल्लेला असतो. त्या रागावरच रघू मुद्दाम कविता करू लागतो. पुढे कॉलेजमध्ये जाणा–या रघूवर घरातल्यांचा रागच असतो. त्याचे कारण तो सांगतो, "घरात आल्या आल्या करायचं काय? हा प्रश्नच कधी यायचा नाही. हजार कामं काढून ठेवलेली, त्यातली सगळीच करायला पाहिजेत असं बंधन नव्हत. पण काहीच नाही केलं की संध्याकाळी हजामत. त्यात फार मोठ काही करतोय अशी भावना आमच्या घरात कुणाचीच नाही. पोटापाणचं बघण्यापेक्षा हा शिकायच्याच नादाला लागलाय म्हणजे वाईटच, असं सगळ्यांच मत, दादा मेट्रीक पास झाल्या झाल्या त्यांनं बी. एड. केलं. झकास मास्तर झाला. चुलत्याचा एक पोरगा दहावी झाल्या झाल्या मिल्ट्रीत गेला. एकाला कारखान्यात लावला. एकाला पोलिसात घातलं. त्यांच्या तब्येतीही दणकट. बाबाचं पाहुणे पै दाब जमवून असल्यामुळं सगळं घडत गेल असंच माझ्याकडून काही नोकरीचं व्हावं असी त्यांची अपेक्षा. पण मी लावलं झटकून. त्यामुळ सगळ्यांच्या मतानुसार नी वाया चाललोय. फक्त आई तेवढी माझ्या पार्टीला. एकदम जाम्म ! त्यामुळे मी बिनधास्त."(पृ.३५) पुढे जाता रघूच्या नोकरी बाबतही घरात चर्चा सुरू होते. रघूला नोकरीची जराही इच्छा नसते. त्याला कॉलेजचे शिक्षणच पूर्ण करायचे असते. म्हणून तो म्हणतो, "असली कारकुनाची नोकरी मला करायची नाही. कॉलेज झाल्यावर बघू माझी मी मिळवेन नोकरी. नाहीतर शेती करीन. बाबा एकदम तरपासलाच. म्हणाला, मागनं शेती करण्यापरास आत्ताच सुरू कर, उद्यापास्नं कॉलेज बंद. आणि मग. जोरजोरात शिव्या द्यायला लागला. बसलो खाल मान घालून. म्हटलं, लागेल तेवढया शिव्या द्या. त्यानंतर विषयच थांबला."(पृ.१०४) अशाप्रकारे रघूचा घरातील मंडळीशीं असलेला विसंवाद दिसून येतो. पैसा आणि भौतिकता,त्याने येणारे जगण्यातले

स्थैर्य हेच आपल्या मोठ्या पिढीचे ध्येय कविता करणे हे बिनकामाचे असे म्हणणारे रघूचे वडील हे तथाकथित समाजातील प्रतिष्ठेच्या कल्पनेचे प्रतिनिधी आहेत.

त्याचप्रमाणे राजन गवस यांच्या कादंब–यामध्ये तरूणांची असलेली सांस्कृतिक, आर्थिक कोंडी ही दिसून होते. उदा. 'धिंगाणा' मध्ये चेअरमन हा ग्रॅज्युएट झालेला बेकार तरूण घरातील शेतीची कामे करत असतो. त्याच बरोबर गावात चालणा–या भ्रष्टाचाराच्या विरोधी चळवळीमध्ये भाग घेतो, तेव्हा बेकार असल्यामुळे त्याच्या या कृत्तीला घरातून विरोध केला जातो. चेअरमन सांगतो, "आमचा बाप मला उपकाराखातर जेवाय घालतो. हा त्याचा समज. बापाचा हा समज मी दहावीला असल्या पासूनचा. तेव्हापासून त्याला एक सारखं वाटते. मला खायला घातलेली खाद फुकटच गेली. त्यांचं म्हणणं कदाचित खरंही असेल. पण माझ्या सारखंच पवक्या आणि बाळ्या बाबत मात्र नाही. ते त्याचे लाडके बाळ्या तर आता नोकरी लागल्यापासून बापासारखीच समजूत करून आहे. बोलत नाही. पण त्यालाही वाटतं, आपण मिळवतो. हा वळूसारखा फिरून खातो पण वळूसारखं फिरून खातो, हे काय म्हणणं झालं ?" (पृ.१) तर काहीवेळा खिशात दमडी नसल्यास घरातून लहान सहान चोरी ही करतो. असी कबुली चेअरमन देतो. त्याचप्रमाणे 'कळप' मध्ये रघू, सुरेश, दिलावर सारख्या तरूणांना बेकार म्हणून घरात काही स्थान नसते. कॉलेज शिकत असतानाही रघू घरातील कामे, शेतीची कामे करतच असतो. तरी त्याला शाळेमध्ये क्लार्कची नोकरी करण्यास भाग पाडतात. तसेच रघूचे कविता कारणे, शाहिरकी कारणे, चळवळी मध्ये भाग घेणे घरात पटत नसतेच. खर्चासाठी आईकडून पैसे घेऊन रघू मोकळा होतो तर काहीवेळा कथा, कविताबद्दल मासिकांकडून मिळालेले मानधन वापरत असतो 'तणकट' मध्ये महारवाडयातील कबीर कॉलेजातून मिळणा–या स्कॉलरशीपच्या पैशातून घरात धान्य मधून भरत असतो, शिक्षण चालू असताना ही फावल्या वेळात घरातील कामे करतो रजेच्या वेळात घरातील कामे करतो तर रजेच्या दिवसात गावात कुणाच्याही बांधावर कामाला जाऊन घरात मदतरूप होत असतो. गावात चालणा–या दलित चळवळीमुळे सवर्णाशी झालेल्या संघर्षामुळे कबीरला आपल्या महारवाडयाची काळजी वाटू जागते.

"मात्र गावातल्या ह्या सर्व घडामोडींचा अन्वयार्थ कबीरला लागलेला असतो. त्यामुळे तो ह्या लढयाच्या बाहेर राहतो. शेवटी दलितांची घरे गावातील शेतक-यांच्या शेतीवर अवलंबून आहेत, हे प्रखर वास्तव त्याच्यापुढे असतं आणि गावातील माणसांचा चांगुलपणाही त्याला दिसत असतो. फक्त एक-दोन बिनडोक माणसांच्या कृत्यामुळे सारं गाव होरपळत असतं, हे त्याला समजत असतं." (९) असे सदानंद देशमुख सांगतात. कबीर आपल्या समाजाविषयी विचार करतो आणि म्हणतो, " आपल्याला दिल्या जाणा-या सवलतीत याचं उत्तर आहे. आमच्या माणसांना सगळं फुक्कट पायजे. तेही जलद पाहिजे. फुक्कट काही ही मिळवून घेणं हा आपल्याला फार मोठा आनंद असतो. त्यामुळं जो जो फुक्कट देण्याच्या भरभरून घोषणा करील त्याच्या पाटीमागं जाण्यात आमच्या माणसांना मोटेपणा वाटतो त्यांना सगळं तयार फुक्कट आणि जलद मिळालं की खुश. घेणं वाईट आणि देणारा तो उपकारखातर देतो. त्यातून मिंदेपण येणार, हा विचार करायला आमच्या माणसांना सवड नाही. उलट घेण्याची आपली परंपरा बलुत्यासारखीच की सततच्या अन्यायाचा हक्क म्हणून सवलती ही गोष्ट मला मान्य आहे. पण सवलती मागची भूमिकाच आम्हाला कुणी सांगितले नाही. त्यामुळं मिळेल ते ओरबाडत सुटायचं, ही प्रवृत्ती आमच्या नेत्यात आली आणि नेते आमच्या माणसांनाच ओरबाडून खात सुटले. फक्त आता ते हुशारी कराय लागते. आपल्या सामाजाला ओरबाडून खायचं पण खाण्याआधी, म्हशीला दूध काढण्यापूर्वी भरडा ठेवतात तसं काहीतर ठेवत राहायच हे शहाणपण त्यानी कमावलंय. आणि हे शहाणपण, तुमच्या जवळ नसल्यामुळं माणसं त्याच्याकडं जातात. तुमच्याकडं येत नाहीत."(पृ.२१४) असा विचार कबीर हिरामण आणि राजासमोर मांडतो, आणि त्यात आपल्या समाजातील आजच्या प्रवृत्तीचे कठोर आत्मपरीक्षण आहे.

'चौंडकं' आणि 'भंडारभोग' या कादंब-यातून सुली, तायाप्पा, तानप्पा, यमन्या या रूढीपरंपरच्या बळी असलेल्या तरूणांच्या जीवनातील लैंगिक समस्येचे चित्रण गवस यांनी शारीर आणि मानसिक अंगानी केले आहे. सुलीच्या तारूण्यसुलभ भावना, तिच्या देहमनाला आलेली नवी नैसर्गिक जाग, तिला बबन्याकडे ओढत राहते आणि तिच्या

देवदासीपणाने त्याला समाजमान्यता मिळणार नाही. या वास्तवाचा तिच्या आयुष्यालाच चटका बसतो. बबन्यापासून तिला दिवस राहतात हे शेवताक्काला ती सांगते.

ती म्हणते, "घरातनं भाईर काढतील ! मलाबी आता त्येच पायजे हाय. जीव खराशीला आलाय गऽऽ"

"भाईर आल्यावर जगशील आसं वाटतंय तुला?"

"बबन्या हाय की घर करून देतो म्हणालाय."

"खुळी हाईस लेकी. आसं नसतंय. आपुण देवाच्या रांडा.. आपल्याबरबर संसार कोण करील? आसलं खुळ काय धरू नगस. सरळ मोकळी हो जा..." शेवताक्का कळकळून बोलली.(पृ.१४४) लैंगिकता,परंपरा आणि समाजाच्या स्त्रीपुरुष नातेसंबंधांच्या रुढ चौकटीच यातून विदारकपणे व्यक्त होत,सुलीसारख्या परीघावरच्या स्त्रियांची वेदना प्रकट करतात.

'चौंडकं' या कादंबरीच्या तुलनेने 'भंडारभोग' या कादंबरीचा पट आधिक विशाल आहे. जोगते व्हावे लागलेल्या तायाप्पाचे पुरूषपणाकडून बाईपणाकडे होत जाणारे शारीर आणि मानसिक पातळीवरील रूपांतर, त्याच्या मनातील पुरूषत्व आणि स्त्रीत्त्व यातील द्वंद्व गवस यांनी फार सूक्ष्मपणे चित्रित केले आहे. उदा. "पोर एकदम गप्प झाली. गाणं पुन्हा सुरू झालं. एवढयात कुणीतर तायाप्पाला खुणवलं. तायाप्पान खाल मान घातली. एवढंच बघून जवळ बसलेलं पोरगं सरकत सरकत तायाप्पाला भिडलं. त्यानं तायाप्पाच्या अंगावर हात टाकला. तायाप्पा एकदम बिघडला. जागा सोडून घरात गेला. त्याचं त्यालाच कळंना. मघाशी पोरांच्या बरबर बोलतानं गोड वाटलतं. त्या पोरानं खोपरात हात घातला तवा अंगात काय तरी भिनल्यागत झालतं. आनी एकदम पोराचा राग आला. ह्ये आसं का व्हवावं? त्याचा तो गडबडला. बाहेर चालल्यालं गाणं बी त्याला ऐक येईनासं झालं. त्याचं मन उडत उडत लाबं गेलं...."(पृ.१५७) यामध्ये त्याच्या मनातील द्वंद्व दिसते. तर शारीर आणि मानसिक पातळीवरील रूपांतर पुढील चित्रणात दिसून येते.

"भाताचं गाडगं, सांबा-याच लोटकं त्यानं गडबडीन धुतलं. अंगावरचं लुगडं बदललं. चांगला वावभर लांब पदर काढला. आरसा घेतला. गोण्ण भरून कुंकू लावला. दाडवाणावर सकाळी दोनच केस कसं. चुकुन राहिल याचं त्याला आश्चर्य वाटायं लागलं. पुन्हा एकदा हात सगळ्या लागभर फिरवला. आरशात निरखून बधितलं. मेढीला अडकलेला चिमटा घेतला. आरशात बघून एकएक केस चिमटयात पकडायचा प्रयत्न सुरू केला. दोन केस चिमटयानं काढाय चार घटका जागल्या. त्यांचं त्यालाच हसू आलं. आरशातल्या तोंडावरचं हसू, गालावरच्या हालचाली बधून हातातला आरसा विसरून त्याचा तोच हसत सुटला. हसता हसताच त्यानं तीन-चार गिरक्या घेतल्या. पदर गरर्कन फुगा करून अंगाला डसला. कंबरंला लचका देऊन तो गप्पगार थांबला. अंगावर एकदम काटा आला... त्यांनं दांडीवरनं पोपटी झंपर हुडकून काढलं. हातात धरून झाडलं जरासं गालाला लावून उभा राहीला. एकदम काय तरी आठवलं. अंगावरच्या जंपरची पटापट बटनं काढली. झंपर अंगातन काढता काढता त्याचं त्यालाच कायतरी वाटलं. गळ्यातलं दर्शन हाललं नाकावर बडवलं. त्यानं एकदा उघडया अंगाकडं बधितलं. पोटावरच्या केकावरचा चमडयाची घडी पडल्यागत दिसाय लागली. त्यांन हळूच पोटावरनं हात फिरवला. त्याचा स्पर्श त्यालाच गोड-गोड वाटाय लागला. त्यानं गडबडीन उजव्या हातातलं झंपर दांडीवर टाकलं. दातात घरलेलं अंगात चढवलं. दंडावर सरळ केलं. कांकणांचा आवाज त्याचा त्यालाच हवाहवासा वाटाय लागला ..... तायाप्पा खोपटातनं भाईर पडला."(पृ.१५३-१५४)

जोगता असणे आणि पुरूषी लैंगिक कामभाव, रत्नव्वा बरोबरचे संबंध आणि जोगतिणीचा त्याला असलेला विरोध यामधून तायाप्पा हळूहळू नकळत कुटुंब आणि जोगतेजोगतिणींचा दबाव यामधून बाईपणाकडे वळत जातो. तायाप्पाची ही लैंगिक कुचंबणा हे त्याच्या शोकात्म जीवनाचे अंग आहे. तायाप्पावर होणारा लैंगिक अत्याचार पुढील प्रसंगात दिसतो. गजरगावात तायाप्पाच्या मेळ्याला विडा मिळतो आणि कमळाक्का, सुंदरा, मल्लव्वा, यमन्या, तायाप्पा इ. तेथे जातात. त्यावेळी यमन्या व तायाप्पा रात्रीच्यावेळी दारू

प्यायला एके ठिकाणी जातात. तेथे आलेले इतर दारूबाज यांच्याशी भांडतात. तेव्हा "आयला, लई बरगाळतंय. धर रे ह्येला" म्हणत आतला भाईर आला. यमन्या घडपडाय लागलं. तायाप्पा काकुळतीला येतच मध्ये पडला. यमन्याच्या डोक्यात काय तरी संचारलं, त्यानं सरळ समोरच्याला कडकडून चावलं, आणि सगळाच गोंधळ उडाला. तायाप्पाला काय व्हतय कळायच्या आदीच दोघातिघांनी यरगटलं. चपराकडच्या अंधारात वडलं. तायाप्पानं आरडायसाठी तोंड उघडलं आणि त्याचं तोंड हालायचंच बंद झालं. अंगावरचं लुगडं कुठल्या कुठं उडालं... चपरातल्या माणसाचं हासण तेवढंच वाढत गेलं. हात पाय झिजाडून झिंजाडून तायाप्पा लुळा पडला-तवा त्याला उडपी केलं. चपराच्या पावळणीतनं अंधाराचं लगतं कोसळलं. चपराच्या कुडाचं चिंबल्यालं कांबट त्याच्या अंगारवाली चोळामोळा झालं. चपरातल्या पालीचं कुचकुचनं तेवढंच त्याच्या कानावर आलं.... त्याचं अंग जुधलं झडल्या पीशीगत वळचणीला पडलं..."(पृ.१७४) हा लैंगिक अत्याचार एका अर्थाने तायाप्पा आणि त्याच्या बरोबरचे इतर तरूण यांच्याकडे समाजाची पाहण्याची दृष्टी आणि त्यातून घडणारी हिंस्त्रकृती दर्शविते. रूढी,परंपरा आणि धर्म यांच्या नावाखाली समाजात वावरणारी लैंगिक वासना समलिंगी संबंध हे लैंगिकतेचे अंग. दाबलेल्या समाजमान्य संबंधाना वाव नसल्याने जोगत्यात असणारे समलिंगी संबंध यांची चित्रणे त्यात करूणभावाने येतात. माणसाच्या मूलभूत वासनाना जगण्याच्या ह्या संघर्षात जी विपरितता येते, त्याबद्दलच्या करूण भावाचा स्वर त्याला सतत लाभतो. उदा. देवधर्माच्या या रूढी परंपरेतील भयाणता या प्रसंगात दिसते. कल्लवा तानू सुतारणीला सांगत असते ती म्हणते,

"व्हतंय काय? लाकडीबाईचा भाडया म्हणाला, "पोरगं देवाला सोडलास तेच बरं केलासं न्हाईतर ते पोरगं काय कामाचं व्हतं काय गाऽऽ. आदीच कामातनं गेलतं. तुला देव बाकी कुटला चांगला भेटला. पोराचं कल्याण केलास..."

तसं त्या मिसाळाच्या भाडयान गप्प बसावं का न्हाई. त्येचं वय काय? मालकांच वय का? भाडया म्हणाला, "गावातल्या माणसांची सोय केलास बेस झालं घेऽऽ आणि त्यातनंच ह्येच्या डोस्क्यात काय बिघाड झालाय कुणास ठावं ..." (पृ.६३)

तसेच तायाप्पा आणि मास्तर यांच्या संवादातूनही या लैंगिक संबंधातील भयाणता दिसून येते. तायाप्पा म्हणातो,

"मास्तर, चौंडक्याला कोण पोरगी देणार ? ह्यास्नी, जात काय गोत? कुटल्यातरी जोगतीला झालेलं वावरं पॉर."

तायाप्पानं सांगून टाकलं.

"मग ह्यो असाच रहायाचा? " मास्तर आश्चर्यचकित झाला.

"तसंच म्हणा की, खरं ह्येच जरा वायलं हाय. ह्येन सिद्दु जोग्याला ठेवून घेतलंय-" तायाप्पा पुटपुटला आणि मास्तरला काय बी समजलं नाही. तो नुस्ताच दोघांच्याकडं बघत बसला. त्याला कोड सुटंना तसा मास्तर बोलता झाला,

"म्हणजे मला काय समजलं नाही?"(पृ.२११) इतकेच नाहीतर यातून जोगते, चौंडके याचे असलेले समलिंगी संबंधही दिसून येतात. उदा. भाऊचे असलेले समलिंगी संबंध चौंडक्या निग्याचे सिधु जोग्याशी संबंध यमन्याचे सरख्याशी समलिंगी संबंध तसेच जोगतिणीचे असलेले संबंध, उदा. रत्नव्वाचे म्हारत्याशी, कमळाक्काचे बाळकू चौंडक्याशी, नंतर तानाप्पाशी, आप्पया, पारव्वाचे म्हादू पाटील सरपंचशी, आक्कु जोगतिणी गावाच्या पाटलाशी, रकमी जोगतिण या हानिमळाच्या मांगाच्या गोराशी असलेला संबंध यातूनच जोगते जोगतिणी, चौंडके या सर्वाच्याच आयुष्याची चित्रणे करताना त्यातून निर्माण होणा-या या तरूण माणसांच्या लैंगिक समस्यांचे आणि त्यामधून होणा-या मानसिक आणि भावनिक होरपळीचे चित्र राजन गवस यांनी अत्यंत सूक्ष्म आणि संयत कलात्मक अपरिहार्यतेने केले आहे. लैंगिकतेचे गवस यांनी केलेले चित्रण हे रंजनवादी परंपरेतून स्वत:ला बाजूला ठेवीत समाजवास्तव चित्रणाच्या प्रेरणेने होते.

त्यामानाने 'धिंगाणा', 'कळप', 'तणकट' या कादंब-याच्यामध्ये तरूण माणसाच्या लैंगिक समस्याचे चित्रण आंतरिक स्वरूपातून येत नाही. ते चर्चा, उल्लेख, एखादा संदर्भ या स्वरूपात येते. उदा. 'धिंगाणा' मध्ये बश्या डॉक्टर आणि सुमीचे प्रकरण, झिपरं बश्या आणि कमीचे प्रकरण यांचा उल्लेख तर 'कळप' मध्ये शंक-या आणि गीता, तसेच दिलावर

सुरेशचे प्रकरण बायना वहिनीचे प्रकरण तसेच 'तणकट' मध्ये शेडबाळे सुलीचे प्रकरण यांच्या संदर्भात आलेले आहे. लैंगिकतेशी निगडित भावनिक अंगही चेअरमन रघू, कबीर यांच्या जगण्यातून आलेले दिसत नाही. याचे मुख्य कारण राजन गवस यांच्या कादंब-यातील नायक हे जीवनाच्या सामाजिक निरीक्षणात अधिक गढलेले दिसतात.

राजन गवस यांच्या कादंब-यातील नायक अथवा नायिका हे समाजाच्या अत्यंत सामान्य स्तरातील माणसे आहेत व आपल्या या सामान्य माणूसपणातून ते व्यक्ती आणि समाजाकडे पाहतात समाजातील बरेवाईट चांगले याबद्दल यांच्या नायकांना व निवेदकाला मूल्यभान आहे. कादंबरीतील समाजदर्शन नायकाच्या अथवा निवदेकाच्या मूल्यभानातून घडलेले आहे. 'चौंडकं', 'भंडारभोग' या कादंब-यातील निवेदक सामाजिक समस्या केंद्रस्थानी ठेवत समाजदर्शन घडवितो. तर 'धिंगाणा', 'कळप', 'तणकट' या मध्ये नायक हे जगत असताना सभानतेने आपल्या सभोवतालच्या समाजाचे निरीक्षण करत असताना दिसतात. कादंब-यातीत नायकाने मित्रांशी आणि वेगवेगळ्या लोकांशी समाजातील अनेक घटकांसंबंधी केलेली चर्चा समोर येते. कादंबरीत विशिष्ट हेतूने म्हणजे 'धिंगाणा' मध्ये शाळेतील मुलांना देण्याचे दूध शाळेतील काळू मास्तर गणबा पाटीलांच्या घरी पाठवितो, तर 'तणकट' मध्ये महार जातीचे गुरूजी त्यांची जात लपून राहावी म्हणून दिक्षीत हे आडनांव लावतात. अशी निर्माण केलेली निरनिराळी पात्रे यांच्या आधाराने या सामाजिक समस्या आपल्या समोर मांडल्या जातात. या सर्वांमधून ग्रामीण भागातील समाज अनेक स्तरामधील भ्रष्टता, किडलेपण, नितिहीनता ते आपल्या समोर उभी करतात. राजन गवस यांच्या निवेदकाला आणि नायकाला समाजाच्या आतपर्यंत निरनिराळ्या स्तरावर वावरून त्यामधील सडलेपण दाखविण्यात स्वारस्य वाटते. समाजातील निरनिराळ्या वृत्ती प्रवृत्ती दर्शवित व्यक्तीचे मूल्यमापन आपल्या समोर मांडतात, समाजापासून अलिप्त राहत समाजाकडे पाहण्यापेक्षा समाजात राहून समाजाचे गुणदोष समाजाला दाखविणे हा त्यांच्या नायकाचा स्वभाव आहे.

व्यक्ती आणि समाज यांचे संबंध ही अत्यंत गुंतागुंतीचे असतात. समाज हा व्यक्तींनी बनलेला असतो आणि तो व्यक्तीसाठी ही असतो. प्रत्येक व्यक्तीचे जगणे, त्याच्या मूलभूत वासना प्रवृत्ती हे काही अंशी खाजगी असले तरी संस्कृती, आर्थिक घटक, शिक्षण, राजकीय परंपरा आणि आधुनिकता या सर्वांच्यामध्ये परस्पर संवाद नसेल तर व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधात गुंतागुत निर्माण होते. त्यातून अनेक पातळ्यांवर विसंवाद निर्माण होतो. आणि माणसांच्या जगण्यातील अनैतिकता, परंपरा आणि चालीरीतीचे वर्चस्व, धार्मिकतेचा, अंधश्रध्देचा पगडा यासारख्या काही घटकांमधून तो समोर येतो. उदा. 'चौंडकं' मध्ये सुलीच्या वाटयाला आलेले जोगतिणीचे जीवन, 'भंडारभोग' मध्ये तायाप्पाच्या वाटयाला आलेले जोगतेपण तेथील लोकामध्ये असलेल्या अंधश्रध्देमुळेच येते. तसेच अन्याय शोषण यांचे चित्रण, 'धिंगाणा' मध्ये दलितांच्या वाटयाची रेशनची साखर हरबा घेऊन जातो तर तांदळाची पोती वाण्याच्या दुकानात जाऊन विकली जात, यातून अन्याय शोषण यांचे चित्रण, दिसते, बेकारी, दारिद्रय, शहर आणि खेडे यांच्यातील विसंवाद कळप मध्ये व्यक्त होतो. उदा. सुरेश संकेश्वरीसारखा तरूण शहरात जाऊनच प्रगती होऊ शकते. असे ठाम मत मांडत असतो. कारण खेडयात काही प्रगती करणेच शक्य नाही. त्यासाठी शहरातच वाव आहे. असे तो मानत असतो. या विचारसरणीतून तरुणांचा खेडयातून शहराकडे जाणारा ओघ दिसतो, परंतु हे खेडयातील तरूण शहरातील संस्कृती ही पूर्णपणे स्वीकारू शकत नाही. अशा या अनेक घटकांमुळे माणसामाणसातले नाते दुभंगल्याची जाणीव राजन गवस यांच्या नायकाने आपल्यासमोर उभी केली आहे. 'चौंडकं' ते 'तणकट' पर्यंत कादंबरीत अनेक स्त्री पुरूषांचा वावर नायकाच्या सभोवताली होतो. आपल्या कादंब-यातून अनेक मानवी सुखदु:खाच्या बारीक सारीक छटा त्यांनी (नायकांनी) समजून घेतल्या आहेत. शेतकरी, देवदासी, जोगते, चौंडके, साहित्य शिक्षण इ. क्षेत्रातले अनेक लोक शिक्षक, कवी, लेखक, शाळा, कॉलेजातील मुले, सामाजिक क्षेत्रातील निरंनिराळ्या स्तरावरील पुढारी, कार्यकर्ते शेतावर काम करणा-या मजूर बायका, तसेच सधन शेतकरी, म्हातारे कोतारे, गाव तालुक्यातील

सामान्य माणसे, कुस्ती करणारी पहेलवान माणसे, सोंगी भजन गाणारा शाहीर, डफ तुणतुणे वाजवणारा गोंधळी, पान ठेलेवाले गर्गेचे हॉटेल, त्यातील माणसे, तालुकापातळीवरील डॉक्टर, वकील, समाजसुधारक, मेळावे घेणारे लोक, दारूवाल्याच्या दुकानातील माणसे अशा एका विस्तीर्ण मानवी पर्यावरणात त्यांचे नायक वावरतात व कादंबरीतून एक समकालीन मानवी जिवंत समाज आपल्या समोर साकार होतो.

व्यक्ती आणि समाजाचा परस्पर संबंध व्यक्त होत असताना समाज रचनेतील घटकांचे विसंवादी असे संबंधही गवस यांच्या कादंबरीतून आपल्या समोर येतात. राजन गवस यांनी आपल्या कादंब–यातून व्यापक सामाजिक ग्रामीण आणि तालुकापातळीवरील परिसर उभा केलेला आहे आणि त्यामधून समाज रचनेतील अनेक विसंवादी घटक आपल्यासमोर येतात.

'चौंडकं' मध्ये वडील आणि सुली यांच्या संबंधात घराण्याची पारंपरिक समाजसापेक्ष कल्पना साट नाही आणि अंधश्रध्देचा बळी असलेल्या सुलीच्या माणूसपणाच्या अपेक्षा, 'कळप' मधील कमवत्या बाळूला आणि आईला चेरमनच्या बसून खाण्यात वाटणारा उंडगेपणा, 'भंडारभोग' मध्ये तायाप्पा आणि काका यांच्यातील तणाव, 'चौंडकं' मध्ये शेवंता जोगतीण आणि शेवता जोगतीण यांच्यामध्ये असलेली स्पर्धा आणि अंगात येण्यातील खोटेपणा, तसेच 'भंडारभोग' मध्येही तायाप्पा आणि रत्नव्वाचे संबंध आणि जोगतिणीच्या जगण्यात न बसणा–या अशा उघड संबंधाना असणारा तानाक्का, पारव्वाचा विरोध, 'कळप' मध्ये शंक–या रघू, दादा कोतोलीकर, सनमाडीकर यांची देवदासी चळवळ आणि घोसरवाडकर यांचे संबंध, 'तणकट' मध्ये शेडबाळे आणि महारवाडा यांचे संबंध यातून सामाजिक चळवळीत असलेली शोषण व्यवस्था, या सर्वांतून समाजव्यवस्था व व्यक्ती यातील विसंवाद व व्यक्तिजीवनावरील ताण प्रकट होतो. त्याचप्रमाणे 'चौंडकं' ते 'कळप' पर्यंत, 'तणकट' चा अपवाद वगळता सर्वच कादंब–यातून यातील तरूण त्यांचे आई अथवा वडील यांच्यात ही हा विसंवाद सूत्ररूपाने दिसून येतो. यातील पालक हे जणू या समाजरचनेचे प्रतिनिधित्व करीत आपल्या, रूढ, पारंपरिक,

साचेबंद परिवर्तनास जड अशा आशा अपेक्षाचं ओझे या तरूण मानसिकतेवर लादत आहेत, असे दिसते.

'चौंडकं' ते 'तणकट' यासर्व कादंब-यातून राजन गवस यांनी ग्रामीण आणि तालुकापातळीवरील समाज यांच्यामधील व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधात असलेल्या अनेक ताण्याबाण्यांचा विचार केला आहे. देवदासी आणि जोगते यांच्या जगण्यातील समाजापासून तुटत जाणे, त्यांचे परस्पराशी होणारे अंतर्गत संघर्ष आणि त्यांचा समाजाशी होणारा संघर्ष, स्वातंत्र्योत्तर काळात उदयाला आलेल्या परिवर्तनशील चळवळी आणि शोषित व्यक्तींना आलेले नवे आत्मभान, राजकीय लाभाच्या हव्यासाने पुढारी वर्गाच्या वर्तणुकीने व्यक्तींना आलेली विफलता, त्यामधून प्रगट होते. साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रातील बलुतेदार सारखे सांकेतिक साहित्यमूल्यांनी एस्टॅब्लिश झालेले कवी आणि ग्रामीण भागातील रघू सारखे प्रतिभेचे नवे धुमारे 'तणकट' मधील शहरी भाषा आणि ग्रामीण बोली यांच्याविषयीची चर्चा, कॉलेजमधील सत्यपाल धर्मरक्षीची भडक भाषणे आणि आंबेडकरांचे मूल्यविचार याविषयीचे वैचारिक मतभेद, महाजनसर, गौरी कुलकर्णी, दिलावर तांबट सुरेश यांच्या साहित्य संबंधीच्या चर्चा आणि त्यातून व्यक्त होणा-या साहित्याच्या सामाजिक अंगासंबंधीची मूल्ये, डॉक्टर बशा आणि भू-याची मुलगी सुमीची, गावातल्या पोरापोरींच्या भानगडी आणि लफडी यातून समाजातील स्त्री पुरूषातील लैंगिक संबंधातील चर्चा, 'कळप' मधील शंक-या आणि गीता यातील प्रेमाचा संदर्भ, 'धिंगाणा' मधील मास्तरांच्या भावाच्या मुलीचे आणि मुकुंदाच्या भावाचे 'गोमच्याळ' आणि त्यातील राजकीय संबंधाचा गुंता, 'धिंगाणा', 'कळप', 'तणकट' मधील मित्रमंडळ आणि त्यांची वैचारिक चर्चा त्यातून दिसणारे समाजातील प्रश्न, कबीर आणि आक्कबा राणे, महारवाडयातील माणसे यांचे परस्परसंबंध आणि ग्रामीण जीवनातील परस्परांवर अवलंबित समाजवीण 'कळप' मधील सुरेश, तांबट सारख्या मुलांचा मध्यमवर्गीय पांढरपेशेपणाकडे असलेला ओढा आणि खेडेगावातून शहराकडे चाकरीसाठी होणारे व्यक्तीचे स्थलांतर आणि त्यातून बायनासारख्या स्त्रियांच्या आयुष्यात निर्माण होणारी भावनिक मानसिक

कोडी व त्यांचे प्रश्न या सर्वांमधून ग्रामीण पातळीवरील व्यक्ती आणि समाज यांच्या परस्परसंबंधाचा फार मोठा पट गवस यानी आपल्या कादंब-यातून उभा केला आहे.

राजन गवस यांच्या कादंब-यामधून वास्तवाचे दर्शन घडते. परंतु हे दर्शन घडवणारे नायक हे समाजामधील सर्व घडामोडी चित्रित करत असताना काहीसे तटस्थ वाटत असले तरी पूर्णत: तटस्थ नाहीत समाजाच्या अंत:स्तरावरील आणि बहिस्तरावरील चलनवलनाचे सूक्ष्म निरीक्षण करीत जगत असताना ते निरनिराळ्या परिवर्तनवादी, वैचारिक, साहित्यिक, राजकीय चळवळीच्या प्रवाहाचा भाग बनतात, त्या त्या संबंधीची अत्यंत आवश्यक असेल इतकी का होईना ते कृती करतात. त्याविषयीच्या सततच्या अनेकांगी चिंतनाची घुसळण त्यांच्या मनात चालू असते, त्यातील सहभागी अनेक घटकांचा उलटसुलट पद्धतीने ते विचार करतात, सभोवताली असणा-या मित्रांच्या चर्चा त्याला साहाय्यभूत होतात आणि घडणा-या घटनांचा अन्वयार्थ लावण्याची सूक्ष्मता वाढीस लागते आणि या प्रवाहातील, समाजविन्मुखता, मूल्यभ्रष्टता,वैयक्तिक स्वार्थ, द्वेष राजकीय महत्त्वाकांक्षा, आपल्या मुळापासून तुटत जाणे आणि शहरी पांढरपेशीय चाकोरीबद्ध जीवन शैली स्वीकारणे यांची जाणीव होताच ते प्रवाह पतित होण्याचे नाकारत त्यापासून दूर जातात. परिवर्तनवादी चळवळीने तायाप्पाच्या मनात वैयक्तिक पातळीवर परिवर्तन होते. तानक्काची गादी चालविणारा तायाप्पा आजारी मुलाला देवीचा म्हातमापासून दूर देवत डॉक्टरकडे जाण्याचा सल्ला देतो. मास्तरांच्या बरोबर जोगत्यांसाठी काम करणारा तायाप्पा आणि इतरांचे प्रश्न, मर्तिकाचा विधीही सांभाळायला ही चळवळीतली माणसे सामोरी येत नाहीत. तेव्हा भ्रमनिरास झाल्याने अवस्थेने तो शून्यमनस्क होतो. गावातील किडलेले,घाण,भ्रष्ट,जातीयवादी राजकारण दूर करण्यासाठी चेअरमन आणि त्याचे मित्र निवडणुकीसाठी पुढे होतात. पण एकाचवेळी या सा-यात राहात घडामोडी करणारा चेअरमन त्यापासून विलग होत या सा-याचा विचार करत राहतो. 'म्हणजे झाली काय न्हाई पाटलांची मेजारटी' डोकं एकदम सणकलं, म्हणजे दादा मोरे असल्यानं पडला. बाबल्या

पाटील असल्यानं आला. एकदम केसं ताट झाली, अशातच बाबल्याचा आबा सांगाय लागला,

"आरं... शेवटी गाव आमचं, पाटील लोकांचच-" घोडा' लावला पाटलास्नी. काय बोलावं तर आबा इस्कटनार.(पृ.२५९) असे हे जातीयतेचे दर्शन होताच पुन्हा आपल्या कुंठितावस्थेत जातो. 'कळप' मधील कवी, लेखक असलेला रघू आपल्या कॉलेजातील तरूण मुलामुलीच्या समवेत अनेक चर्चा मंडळात कामात सहभागी होतो पण या समाजकारणाच्या मुखवटयामागील स्वार्थीचे, त्यातील पुढारीपणाचे किळसवाणे दर्शन होताच त्यापासून एकाकी होतो. ते पुढील प्रसंगात दिसते.

"दिलावरला रस्त्यातच सोडलं सायकलवर टांग टाकली. चाललोय कुठं? माझं मलाही कळत नव्हतं. नुस्ती गरगर, महाजनसर, असंही वागू शकतात का वागले असतील असं? दिलावरच्या मतानुसार आयुष्यात जपण्यासारखा माणूस. आपणही तसंच समजत गेलो. शब्दावर जीव टाकला. हाकेला काळजात कोरलं. मनाच्या गाभा-यात जप केला. सगळंच संपत जाताना काही तरी आहे असं वाटत गेलं. त्यातल काहीच खरं नाही. सगळ्याचेच पाय वाळवीनं खाल्लेले. मातीलाच कीड. वाळवी अशी कशी पसरत गेली? वाळवी मनात, वाळवी आत, बाहेर, पेशीपेशीत, आपणही वाळवीचाच कीडा... सरळ लक्ष्मी बारची पायरी गाठली समोर पेला गोल्डमंकची बाटली. बाटलीवर काळसर माकडाचा चेहरा. त्याचाच हळूहळू गांधीनंतरचा महात्मा. भरकन बाटली पेल्यात. तर तिथं तळाला महाजन, सनमाडीकर आणि सुर्शा, गप्पकन डोके मिटले. घटाघटा घोट घेतले. नरड भाजत गेलं, नंतर पुन्हा पुन्हा तेच... बाटली संपली. मेंदूच्या आळ्याच आळ्या च्या आयला, आपण चळवळ बिळवळ, लेखन-बिखन, तात्विकता फितविक्ता असल्या फालतू लफडयात फुक्कट अडकलो. भिकारचोट आपण. उद्योग भिकारचोट, एकदम डोकं और. बाहेर पडल्या पडल्या जोरात सायकल रेटाय सुरवात केली. किर्रऽऽ अंधार."(पृ.३८६) इतकेच नाहीतर पुढे तो विचार करतो,

"महाजन आणि सनमाडीकर एकाच माळेचे मणी ओवले कुणी? सनमाडीकर म्हणजे महाजन. महाजन म्हणजे बलुतेदार. बलुतेदार म्हणजे फडणीस, फडणीस म्हणजे सुर्शा. सुर्शा म्हणजे सान्या. सान्या म्हणजे एस.डी., एस.डी. म्हणजे सनमाडीकर सगळे म्हणजे गांधी नंतरचा महात्मा.

महात्म्याची गौरी. गौरीची गीता गीताचा शंक-या."(पृ.३८७) तसेच महारवाडयातील शिकणारा कबीर हा चिंतनशील तरूण मुलगा कॉलेजातील अनेक मित्रांच्या चर्चात सहभागी होतो पण ग्रामीण समूह जीवन आणि दलित प्रश्न यांचा सूक्ष्म विवेक असणा-या कबीरची कृती वैयक्तिक पातळीवर अस्तित्वात असते, पण सामाजिक 'तथाकथित' कृतिशीलतेला त्याचा नकार आहे. या सर्वच नायकांचा कृतीवर विश्वास अन् त्यानं ते चळवळींच्या प्रवाहात सामील होतात पण भ्रष्टतेचे हे दुष्टचक्र लक्षात येताच ते हळू हळू एकाकी होत जातात अन कळपात राहणे नाकारतात.गवस यांच्या कादंबरीतील नायकांना या परात्मतेचे हे दु:ख भोगावे लागते.

राजन गवस यांच्या कादंब-यातील नायक आणि त्यांच्या बरोबरीची तरूण मुले ग्रामीण पातळीवरील तरूण मुलांच्या मानसिकतेचे दर्शन घडवितात. स्वातंत्र्योत्तर काळातील झपाटयाने बदलत गेलेली ग्रामीण व्यवस्था, खेडोपाडी झालेला शिक्षणाचा प्रसार आणि त्यातील अवमूल्यन साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये शिरलेली गटबाजी आणि गलिच्छता त्यातून दिसणारे एक नव्या असुसंस्कृत तेचे दर्शन, खेडयातील तरूणांना शहराची वाटणारी ओढ आणि ग्रामीण संस्कृतीचे ओझे झटकून टाकीत इतिहासाचा भार नाकारत जातात म्हणजे तांबटसारखे तरूण शहरात आल्यानंतर हळूहळू बदलत जातात. तेव्हा रघू म्हणतो.

"मला तांबटचं हसू यायला लागलं. म्हटलं तांबटया, तुझा भाषा सुधारायचा कार्यक्रम पुढं गेलेला दिसतो. आता बोलता बोलता तू इंग्रजी शब्द बोलाय लागलास.
अरे शहरात आल्यावर सगळं बदलतं हाय. खरं सांगू? तुज्या सारक्या टेलेंट आसणा-या मान्सानं वानापूरात नोकरी करण्यापेक्शा शहरात यावं दणक्यात मोठा व्हशील."(पृ.२३७)

असे तांबट म्हणतो. ही नव्या पांढरपेशा कृतक मध्यमवर्गीय जगण्याच्या स्वीकाराची ओढ, खेडोपाडी आलेल्या नव्या पतसंस्था डेरी उद्योग, सहकारी संस्था यामधून पैसा बनविण्याची निर्माण झालेली महत्वाकांक्षा पुणे, कोल्हापूरया सारख्या शहरामध्ये गर्दी आणि माणसाच्या जगण्याची तात्कालिक उपयुक्तता प्रधानमूल्ये, परिवर्तनवादी चळवळी आणि त्यात होणारे शोषण आणि राजकीय स्वार्थ इ. समाजाच्या अनेक अंगांना राजन गवस यांच्या कादंब–यांनी स्पर्श करीत वास्तवाचा व्यापक अवकाश मांडला आहे.

## उ) कादंब–यातील जातीयवादाचे चित्रण :

भारत २१ व्या शतकामध्ये पोहचलेला आहे आणि त्याच्या समोर अनेक आव्हाने तशीच संकटेही उभी आहेत. अंधश्रद्धा, जातीयवाद, अस्पृश्यता, जाती जातीतील वैर उच्च–नीच भेद धर्मातील मूलतत्त्व वादामधून निर्माण झालेला दहशतवाद हे सर्व अज्ञानातून निर्माण होते. स्वातंत्र्योत्तर काळातील सत्ताकारण,राजकारण यामुळे हे सर्व घटक वाढीस लागून फोफावतात. बेरोजगारी, बेकारी दारिद्रय, चंगळवाद या सर्वांच्यामुळे त्याला खतपाणी मिळते, विज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोण, समानता, अहिंसा, ज्ञान या सर्वांच्यामुळे माणसाच्या जगण्याची किमान पातळी उंचावली जाऊन त्याची सांस्कृतिक पातळीही विकसित झाली पाहिजे.

जातीव्यवस्था आणि जातिभेद हे भारताच्या आणि महाराष्ट्राच्या समाजजीवनाचे अपरिहार्य अंग आहे, इतिहासाच्या प्रदीर्घ पल्यात महाराष्ट्रात अनेक धर्मियांनीही वस्ती केली व त्यांची त्यांची संस्कृती येथे रूजली वाढली आणि फोफावली.

विविध जातिधर्मांमध्ये ऐक्य साधण्याचे कार्य समाज सुधारकांबरोबरच महाराष्ट्रातील विविध संप्रदायांच्या संतांनी केलेले आहे. उदा. महानुभाव संप्रदायाचे चक्रधरस्वामी, गोविंदप्रभू, वारकरी संप्रदायाच्या ज्ञानेश्वर, तुकाराम इ. तसेच महाराष्ट्रातील समाजसुधारक म्हणजे बाबासाहेब आंबेडकर गाडगेबाबा, गोपाळ गणेश आगरकर, ज्योतिबा फुले, विठ्ठल रामजी शिंदे सारख्या अनेक समाजसुधारक यांनी या क्षेत्रात कार्य

केलेले आहे. परंतु स्वातंत्र्योत्तर काळामध्ये जातितत्त्वाचे उच्चाटन फक्त कागदोपत्री राहिले. शहरातील माणूस आर्थिक दृष्टया स्वायत्त असू शकल्याने जातिबंधने सैलावलेली दिसली तरीही, राखीव जागांच्या धोरणाने, घटनेने दिलेल्या सोयीसवलती, विशिष्ट क्रमातील अग्रक्रमाने आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे निवडणुकांच्या राजकारणाने जातिव्यवस्थेला आणि जातियतेला अधिक महत्त्व आले.

ग्रामीण भागातही पुष्कळसे परिवर्तन घडत असले तरी जातिव्यवस्था नष्ट झालेली नाही. शाळा, महाविद्यालये त्याच्या निकट आलेली आहेत. पारंपारिक व्यवसायात बदल होऊ लागले आहेत. वाढती प्रसारमाध्यमे त्याच्या गावात येऊन थडकलेली आहेत. हे सगळे असले तरी या सर्व गोष्टीचा जाती रचनेवर किती परिणाम झाला आहे, याविषयी शंका आहे. जाति रचनेमध्ये शिथिलता आलेली असली तरी ती पुणत: व्यवस्था मोडून पडली नाही. आजही खेडयापाडयातून प्रत्येक जात आपले म्हणून असलेले सांस्कृतिक संचित रूढी परंपरा यांचे ओझे घेऊन जगत असते. हे सगळे घेऊनच ती जात गावगाडयामध्ये समाविष्ट झालेली असते म्हणजे प्रत्येक जातीची स्वत:ची अशी वर्तुळ असतात. ती एकमेकांना स्पर्शत असली तरी त्यांना छेद न देता स्वतंत्र स्वयंपूर्ण गावगाडा तयार होत असे. आज या सा-यात कलह निर्माण होत असला तरी मूलभूत जातिरचना बदललेली आहे, असे मात्र म्हणता येत नाही. पूर्वी या व्यवस्थेला (barter system) (वस्तु विनियम) म्हणत. आज ही व्यवस्था नसली तरी जातीचा हा सांगाडा बदलला नाही. ग्रामीण भागातील व्यक्तीवर कुटुंब, जात आणि गावगाडा हे तीन घटक दबाव टाकणारे असून या सगळ्यांमधून त्याची मनोरचना वेगळी अशी होते. ग्रामीण माणसाच्या व्यवहाराचे, त्याच्या मनोविश्वाचे चित्रण करणारे साहित्य ग्रामीण वास्तव प्रकट करीत असते, आणि त्यात जात हा महत्त्वाचा घटक आहे. राजन गवस यांच्या कादंब-यातील ग्रामीण वास्तव लक्षात घेता त्यामध्ये जात हा घटक किती प्रभावशाली रीतीने चित्रित केला आहे, हे लक्षात येते. स्वातंत्र्योत्तर काळात शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रांचे त्याला मिळालेले संदर्भ आणि त्यासर्वाची व्यामिश्रता आपल्याला त्यांच्या कादंबा-यातून पहावयास मिळते.

राजन गवस यांनी आपल्या कादंब-यांतून महाराष्ट्र कर्नाटक सीमालगतच्या समाजात जातींचे जे ताणेबाणे आहेत त्यांचे अनेकांगी चित्रण केलेले आहे. शहरापेक्षा ग्रामीण भागात जातिव्यवस्था अधिक घट्ट असून स्वातंत्र्योत्तर काळात निवडणुकांच्या राजकारणामुळे तिच्यात असलेले तणाव आपल्या कादंब-यांतून त्यांनी मांडलेले आहे. जातीविषयक प्रश्नाचा विचार करताना राजन गवस यांनी महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमेलगतची पार्श्वभूमी लक्षात घेत जातीशी निगडित पेशा, त्यातील कनिष्ठत्वाचा भाव, त्यात असलेली सूक्ष्म पातळीवरील शोषणव्यवस्था इ. जातीयतेचे विविध स्तर मांडले आहेत. भालचंद्र नेमाडे जातीयतेच्या चित्रणाबद्दल लिहितात, "खरा झगडा एका समूहाचा दुस-याशी, एका जातीचा दुसरीशी नसून एका मूळ संस्कृतीशी पोटसंस्कृतीचा आहे. हा प्रश्न तात्विक-राजकीय पातळीवर आधी – व नंतरच वाङ्मयीन पातळीवर सुटणारा असा होऊन बसल्याने ह्या कादंब-यांचा संबंध सांस्कृतिक पातळीवर होणे आणखीच कठीण होऊन बसले आहे. हे आपल्या वाङ्मयीन संस्कृतीचे मोठेच दुखणे आहे." (१० ) तेथे जातिव्यवस्था व जातीयता यातील फरक सांगून गवस यांनी या दोन्हीचे चित्रण केलेले आहे.

'भंडारभोग' या कादंबरीतील तायाप्पा हा परिवर्तनवादी चळवळीच्या संपर्कात येतो आणि मास्तर त्याला म्हणतात, "आणि तू मला सांग – ह्या सगळ्या जोगतिणी तुमच्या आमच्या खालच्या जातीतच का? वाण्या – बामणाच्या का न्हाईत? त्यांच्या पोरी देवीला चालत नाहीत ? देवी आमच्या गरिबाच्याच मागं का लागती?"

"आसं काय न्हाई? देवाचं काम ते देवाचं त्याबद्दल काय बोलू नगा." तयाप्पा कसाबसा पुटपुटला.

"मी कुठं देवीला शिव्या घालाय लागलोय, मी बी देव पुजतोय, खरं आमच्या आयाबहिणीच देवीच्या सेवेला का? सगळ्यांच्याच बायका देवी का मागत नाहीत ?"

"रिवाज हाय त्येला कोण काय करणार?"

"मग रिवाज वरच्या लोकात बी पडाय नको? बरं रिवाज होय तो हाय आमच्या जोगतीणीस्नी कोण जवळ घेतंय? सगळी कामापुरतीच वापरत्यात मुंबई-पुण्याला विकत्यात. हेबी देवीनंच सांगितलय?" (पृ-२०७) शोषणाची व्यवस्था धर्मश्रध्देचे अंधश्रध्देत रूपांतर करते आणि मजबूत होत शोषकाला त्याच्या अवस्थेची जाणीवही होऊ देत नाही. यातील जोगतिणी महार, मांग जातीतून आलेल्या आहेत. यातील फुला ही महाराची आहे आणि रकमा ही मांगाची आहे. हे कादंबरीत घटनाप्रसंगातून आणि संवादातून कादंबरीकार सहजतेने सूचित करतो,तो प्रसंग म्हणजे तानाक्का भलतीच भारावून बोलत राहिली. तायाप्पा तिच्याकडं घास चावता चावता बघत राहिला. पारव्वा आपल्याच विचारात भाकरी संपवत उठली आणि भावीत उतरली. फुलानं तिला घास गिळतच सांगितलं, "अगं ह्या वाटक्यातनं मलाबी पाणी आण ऽऽ," "हित कोण बघायला ये जा पिऊन तुझं तूऽऽ. आनी बघणा-याला तु म्हाराची हाईस ह्ये कोण सांगणार?" रत्नव्वानं फणकारतच तिला विचारलं आणि फुला पारव्वा वर यायची वाट बघतच बसली. "(पृ.८२) तसेच पुढील प्रसंगात ही रकमा ही मांग जातीची आहे. ते लक्षात येते.

"काकू काय म्हणती रं ऽऽ ?" पारव्वानं आदणात गूळ टाकतच विचारलं.

"म्हणतो काय? राकुंडी घासत बसलीया की."

"ह्या पावसात तर काय करंल?" रत्नव्वान पुन्हा तिडा टाकला.

"आज ही काय सारकीच डाव मारालीया, पाराक्का. काय झालंय म्हणायचं हिला....."

"तूच बघ बाबाऽऽ ." म्हणत पारव्वानं पावडरीचा डबा उघडला."

"कोणीतरी भेटाय मी काय तुला मांगाची रकमी वाटलो व्हय रंऽऽ.. भेटला वाटंत, चालली संग ऽऽ" (पृ.८८)जात आणि वर्तन याविषयीच्या पारंपरिक कल्पना प्रकट करीत गवस त्याचा समाजचित्रणासाठी कसा वापर करतात, ते लक्षात येते.

लोकश्रद्धांचा आणि अंधश्रद्धांचा शोषणासाठी उच्च जातीनी जसा पूर्वी उपयोग केला तसाच आता तो स्वातंत्र्योत्तर काळात नव्या राजकीयतेसाठीही होतो. हे आक्कू जोगतिणीच्या प्रसंगात दिसून येते. गंगव्वा तायाप्पाला सांगते,

“व्हतंय काय, बाबा. ती पयल्यानं तिथल्या पाटलाला लागू व्हती. त्येन ठेवूनच घेतलीती म्हण की, त्येच्याकडनं सगळं यायचं. लईसं जोगव्यालाबी जायाची न्हाई. नुस्ती त्येच्या सेवेवरच आसायची. मागच्या आठवडयात म्हण त्येच्या गावात फसली निवडणूक लागली.”

“मग काय? आता हिचा पाटीलच हूबारलाय म्हटल्यावर कुणाला तरी आयाबायास्नी भंडा-याचा धाक दाखवून म्हणाली आसंल, मत देवा. भंडा-याची शपत हाय. म्हणणारच की त्यात काय? खरं त्येंच्या उलट बाजूच्या माणसास्नी ह्ये समाजलं,आनी घडून त्ये

घडल?”

“मारलं आसंल?” तायाप्पा हात गालावत ठेवून बसला.

“नुस्तं मारलं आसतं तरबी बरं झालं आसतं. रातीला दहा-बाराजनानी वडली. लुगडयाच्या चिंध्या केल्या: सकाळी तोंडावर तांब्याभर पाणीमारलं शेजारनीनी तव्वा सुदीवर आली ! बधतीतर अंगावर कायबी न्हाई. शेळीगत आरडली. गाव गोळा झालं पाटलानं हिंग्लज ठाण्याला फिर्याद केलीया, सगळं इपरीतच झालंय बाबा ऽऽ आता ही जोगतीण. कशाला पायजे व्हाती फिरयाद? गावातच दिवस घालवयाचं म्हणजे आसं करून जमंल?” (पृ.४४/१४६) अशा प्रकारे गावाच्या राजकारणात बळी गेला तो तळागाळातल्या या जोगतिणीचा. जात आणि लिंगही शोषण व्यवस्थेचे मूलभूत पाये कसे आहे. याचे सूक्ष्म दर्शन ‘भंडारभोग’ कादंबरीमध्ये दिसून येते. कादंबरीत शोषणाच्या या प्रक्रियेचे भयावह दर्शन घडते ते कासाराच्या इमलाला जोगतिणी बनविण्याचा विधी होतो तेव्हा. एका बाजूने शोषणाची ही जातिनिविष्ट परंपरा चालू राहते ती रूढी आणि अंधश्रद्धा यांच्या घट्ट बांधलेल्या शोषितांकडूनच, दुस-या बाजूने जोगते जोगतिणी याचे जगणे एका समाज वर्तुळापासून / वर्गापासून तुटत जाणे ही .

लग्न ह्या सामाजिक संस्थेचा आधारच सुटल्याने ते आपल्या कुटुंबापासून तुटत जातात आणि जगण्याच्या ह्या पद्धतीने मानसिक, भावनिक पातळीवर जातीपासूनही दूर होत

जातात. ते पुढील संवादातून लक्षात येते. "मास्तर, चौंडक्याला कोण पोरगी देणार? ह्यास्नी जात काय गोत? कुठल्यातरी जोगतीला झालेलं वावर पॉर."

'भंडारभोग' कादंबरीत विशिष्ट जातीतील शोषित व्यक्तीचे ह्या सामाजिक व्यवस्थेने मानसिक, भावनिक, कौटुंबिक पातळीवर जे भयावह अर्थाने जातीयकरण केले आहे, त्याचे सूक्ष्म विश्लेषण गवस यांनी केले आहे. 'धिंगाणा' एका बेकार सुशिक्षित ग्रामीण तरूणाच्या नजरेतून स्वातंत्र्योत्तर काळातील बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी कादंबरी. महाराष्ट्रातील जातीविषयक प्रश्नाला स्वातंत्र्योत्तर काळातील निवडणुकीच्या राजकारणाने नवे संदर्भ दिले आणि कागदोपत्री घटनेने दिलेल्या समानतेच्या तत्त्वाचे भ्रष्ट अशा जातीयतेत रूपांतर झाले, राजन गवस यानी आपल्या 'धिंगाणा' या कादंबरीतून ग्रामीण व्यवस्थेचा पट त्यामधील जाती जातीमध्ये असणारे संघर्ष आणि निवडणुकीच्या राजकारणाने त्याला मिळालेले नवे पीळ यांचे चित्रण आलेले आहे. घटना प्रसंग आणि संवाद यांच्या अनुषंगाने आलेल्या आहते.

पाटील हा गावाचा मुख्य सत्ताधीश  जातीने श्रेष्ठ, परंपरेने चालत आलेल्या या श्रेष्ठत्वाने त्याच्यातील मानसिकतेचे दर्शन त्याच्या संवादातून आपल्या समोर येते. आबा म्हणतो, "आरऽऽ जातीचा पाटील हाय, तुमच्या सारख्या लिचडयाच्या तिडयाला ह्यो पट्टा बघणार न्हाई. एकेकाला व्हत्याचं न्हवतं करून ठेवीन. घरात रांडच्यास्नी खायला मिळत न्हाई. आनि माझ्याबरबर राजकारण करत्यात, आसला दम तर समोर या रं डड? आसं मागनं मागनं का? काय न्याट हाय बघुया की समोर येऊन लढा की... बायकावानी माघारी का?" (पृ. ३३)

गावात पोलिस पाटलाची जागा भरायची आहे. आबा पाटलाने आपल्या मुलाचा आंद्याचा अर्ज भरून टाकला आहे. नव्या नियमाने महारही अर्ज करू शकतो. हे कळल्यानंतर आबा पाटलाच्या आंद्याला पाटील होऊ द्यायचे नाही म्हणून चेअरमन आणि त्याचे मित्र महारवाडयातून कोणालातरी अर्ज करायला लावण्यासाठी विचार करतात. शेणगावात पोलीस पाटील "महार झालाही आहे पण म्हार गावाचा पाटील? लेका गावची

अब्रूच की. म्हणून चेष्टा केलीती, जात बुडल्यागत वाटालती." असे बाबल्या म्हणतो. तेव्हा चेअरमन उत्तर देतो, "खरं सगळी मागच्या सारखं बोंबालणार. गावचा पाटील म्हार म्हटल्यावर सगळ्यांचे आई बाबा स्वर्गाला जायला अडचण येणार की रंऽऽ?" (पृ.३७) म्हणून गावगाडयात जातीला चिकटलेली परंपरागत कामे. श्रेष्ठ कनिष्ठत्त्वाची कल्पना, त्यातील सत्तेचे दबाव आणि शोषण, राजकारण यांच्यातले नवे गुंते कादंबरीत बाबल्या, चेअरमन आणि गौत्या, सायब्या यांच्या वर्तनातून समोर येतात. ग्रामीण भागातील गावगाडयातील अर्थकारण हे या सबंध शेतक-याच्या, उच्चवर्णियांच्या हातात असल्याने दलित आणि सवर्ण यांचे ग्रामीण भागातील प्रश्न वेगळे आहेत याची जाणीव राजन गवस यांच्या कादंब-यातून आपल्या समोर येते : गौत्या चेअरमनला म्हणतो, "असं चाललंय बाबा ऽऽ मागच्या पंधार दिसांत सरपंच येऊन सगळ्या म्हारोडयाला तंबी देऊन गेलाय. कोण आरजं-बिरजं भरशीला तर बघा. गावात-हावू देणार न्हाई. आता आमच्या म्हारोडयात गावची पाटीलकी करायला सवड कुणाला हाय? आमचं. आमला पुरं झालंय. गांडीचा घाम गळयाला आलाय." (पृ. ४०) पुढे गौत्याला वाटते, "तसं कसं हो ऽऽ आमाला कशाला पायजे तुमचं राजकारण? रोज उठून तुमच्या, न्हाईतर त्यंच्या बांधाला जायचं म्हटल्यावर आमाला तुमी बी तेवढंच आणि त्योबी तेवढाच की..." (पृ.४१) त्याबरोबरच गावातल्या महारवाडयातही ८ वी ९ च्या पुढे शिकलेली पोरे नाहीत, आहेत त्यातली सायब्या सारखी सटरफटर कामे करीत पैसे काढत मार खात जगणारी. नव्या राजकारणात आपल्या जातीची किंमत वसूल करायचे तंत्रही त्यांना अवगत झालेले सायबाच्या चित्रणातून महारवाडयातल्या या नव्या पोरांची ही मानसिकता आणि जगण्याची स्थिती आपल्यासमोर येते. शिक्षण, त्यातून प्राप्त होणारे बदल आणि जुनी महारकी यांच्यातील अंतर्गत कोंडीतून महारवाडयात सायब्यासरखी तरूण मुले दिसतात. मांगोडयाची स्थितीही यापेक्षा वेगळी नाही. ते पुढील चित्रणातून दिसते.

"आमचा मांगोडा म्हणजे अजबच. शिकल्याली मोजून पोरं तीन त्यातलं गावात शिरक्या एकटंच. बाकीची कुठं नोकरीला लागली तिथंच रूतून बसली. उरला सगळा मांगोडा, अजून पायताणाच्या ढिगा-यात आणि कॅंकताच्या वाकातच."( पृ. १३४)

गावच्या निवडणुकीत वॉर्डाचा उमेदवार ठरवताना मतांसाठी सगळ्यांना उमेदवारी द्यायची म्हणून मांगोडयातला शिरपा येतो पण महार आणि मांग यातील परस्पर वैमनस्यातून शिरप्पाचा विचार बाजूला पडतो. "नाहीतरी मांगोडयाला उमेदवारी दिली की म्हरोडा उलटलाच."( पृ.१४४) अशी स्थिती दलित समाजात असते.दलित समाजातील महार व मांग या जातीतील तेढ आणि वैरभावही त्यातून प्रकट होतो.

ग्रामीण भागातील राजकारणात पाटील हे जातीच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे सत्ताकेंद्र. त्यामुळेच गणबा, संगाशी आपले राजकीय विरोधीपण संपवू पाहतो. गणबा म्हणतो, "हे बघ संगा, तसं न्हाई, उगाच डोक्यात राख घालून घीऊ नको. आरं, किती केलं तरी तू पाटील मी पाटील. दोघातलं कोणबी मेलं तर एकमेकांच्या मातीला जायाय पाहीजे. त्यारोग्यामो-याच्या नादाला लागून आपली पिढयानपिढयाची भावकी कशाला नासलास?"( पृ.२१४) त्यातही शहाण्णव कुळी आणि कडू हे स्तर मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवर खोलवर रूजलेले. राजकारणात हे स्तर ही प्रभावशाली ठरत दबावतंत्राचे स्वरूप धारण करते. " 'ड' वॉर्डतल्या मुकुंदाला पाडायच्या वाटाघाटी होतात. कारण कडूचा पंच नको म्हणून. शेवटी दादा मोरे असल्याने निवडणुकीत पडतो आणि बाबल्या पाटील असल्याने निवडून येतो. तेव्हा बाबल्याचा आबा म्हणतो,' आरंऽऽ शेवटी गाव आमचं, पाटिल लोकांचं."( पृ.२४९) स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण पातळीवरील निवडणुकीच्या राजकारणात पैसा आणि जात हेच घटक हुकुमी ठरतात. याचे चित्रण चेअरमनच्या तिरकस शैलीतून आपल्या समोर येते.

'कळप' ही सामाजिक चळवळी आणि वाङ्मयीन व्यवहार यांचे परस्परसंबंध खोलवर जात उलगूडन दाखविणारी कादंबरी. यातील रघू चिलमी हा गावाकडचा तरूण मोठया गावात शिकायला येतो आणि त्यामधून शैक्षणिक व्यवस्था, वाङ्मयीन घडामोडी

यांच्या वर्तुळात प्रवेश करतो. ही वर्तुळे वेगवेगळी वाटली तरी तो एकात एक साखळी सारखी अडकून गेलेली असून रघू चिलमी हा बाहेरून वावरत असताना संवेदनाक्षम तरूण ते मुर्च्छानावस्था आलेला मूकामाणूस असा त्याचा प्रवास होतो. या प्रवासात वाङ्मय, शिक्षण, राजकारण समाज- यासर्व मानवी संस्थामध्ये जगत असलेला माणूस आणि या माणसाच्या व्यवस्थेवर जात आणि धर्म या वास्तवाचा असलेला अविभाज्य पगडा यांचा प्रत्यय त्याला सतत येत राहतो.

भारतीय भूमीतील मूळचे द्रविड, उत्तरेकडून आलेले आर्य आणि तसेच शक, हूण, यांच्या स्वा-यामुळे यासारख्या अनेकविधि वंशीय लोकांची वस्ती निरनिराळ्या कालात झालेली परप्रांतियांची आक्रमणे आणि त्यामुळे आलेले मोगल, ख्रिस्ती इ. सर्वांनी मिळून भारतातील वस्ती हजारो वर्षा पासून तयार झाली असल्याने मुस्लिम समाज हा भारतीय भूमीतील अविभाज्य वास्तव घटक आहे. परंतु राष्ट्राराष्ट्रातील बदलत जाणा-या भूमिकेने वेगवेगळ्या आर्थिक, धार्मिक, राजकीय वादाने युद्धजन्य परिस्थितीने; समकालीन काळात यामधल्या अनेक घटकांत जागतिक पातळीवर संघर्षजन्य तणावाचे वातावरण निर्माण होताच अंतर्गत पातळीवरही आतले आणि बाहेरचे असे तणावपूर्ण स्फोटक, भयग्रस्त, असुरक्षित आणि व्देषमूलक वातावरण तयार होते. इंग्रज प्रेरित नीतीने भारतीय एतद्देशीय आणि मुस्लिम यातील वातावरण हा भारतीय सामाजिक जीवनाचा सदाच नाजूक आणि दुखरा भाग राहिला.

'कळप' या कादंबरीमध्ये रघू चिलमीचा दिलावर हा मित्र. शिवाय तो कथाकार ही आहे. दिलावर विचार करणारा आणि ते स्पष्टपणे मांडणारा निर्भीड आहे. एकंदरच रघू, तांबट, शिरगावकर, दिलावर यातल्या चर्चा ह्या अत्यंत स्वच्छ स्पष्ट आणि अनेक समाज घटकांना स्पर्श करत साहित्य आणि समाज यांच्या संबंधांविषयी आपली स्वत:ची भूमिका मांडणा-या आहेत. दिलावरच्या लेखनामधून दिसणा-या मुस्लिमतेवर हुतात्मा पार्कात चर्चा होते त्यावेळेस मुस्लिम समाज आणि त्याची इतर समाजाशी होणारी आंतरप्रक्रिया यांच्या

विषयी, मुस्लिमतेच्या धर्मा विषयी उलटसुलट चर्चा घडते आणि साहित्याच्या द्वारे मुस्लिम समाजाविषयीचे रघू चिलमीचे चिंतन आपल्या समोर व्यक्त होते.

रघू सांगतो, "ह्या देशातला मुसलमान ही हिंदू-इतकाच जुना वाटतो. ह्या देशावर तुमचा जेवढा अधिकार आहे तेवढाच ह्या देशातल्या मुसलमानाचाही आहे मग त्यांना हाकलण्याची भाषा करण्यात काय अर्थ? आणि मुसलमान जेवढे धर्मांध आहेत तेवढेच हिंदूही आहेत. हे स्वीकारायची तयारी ठेवा. उलट दिलावर सारख्यांनी मी या देशाचा मुसलमान नागरिक आहे, तुमच्या इतकेच या देशावर आमचेही प्रेम आहे. अशी भूमिका घ्यायला पहिजे." (पृ. ८०)

व्यक्ती आणि लेखन यांच्या विचारात जात आणि धर्म हे अनिवार्य घटक असले तरी ते समग्र वास्तवाच्या संदर्भात तपासून पाहता आले पाहिजे याची परिपक्व जाण रघू चिलमी ज्यावेळेस व्यक्त करतो, त्यावेळेस एका अर्थाने तो या समग्रतेचे सगळे घटकच तपासून पहात असतो. म्हणूनच साहित्यात निरनिराळे प्रवाह प्रभुत्व गाजवत कंपूशाही निर्माण होते. तांबट, दिलावर, रघू चिलमी या सगळ्याच्याच चर्चेतून हे सर्व घटक तपासून पाहिले जातात. म्हणून दिलावर म्हणतो, "हे कशातून आलं हे तू लक्षात घेत नाहीस. तुमचे हे प्रत्येक जातीचे कंपू तयार होऊ लागल्यावर आम्हाला जास्त असुरक्षित वाटायला लागलं. तुमच्याशी टक्कर घ्यायची तर मग आम्हाला पर्याय काय? आम्हाला तुम्ही मारून मुटकून जास्त जातीयवादी होणं भाग पाडलंय. तुम्ही सगळेच इतके जातीयवादी झालाय की दुस-याला जातीयवादी व्हायला भाग पाडाय लागलाय." (पृ.३९६)

दिलावरची ही भूमिका त्या समाजाचे मूलतत्त्ववाद्यांचे राजकीय पुढारीपण, धार्मिकतेच्या आत्यंतिक पगडयाखालील वैज्ञानिक दृष्टीपराङ्मुखता, शिक्षणाचा अभाव आणि बेरोजगारीकरण, सतत बदलणारे राजकीय धोरण, आत्यंतिक दारिद्रय यामधून आलेली आहे. या कादंबरीतील दिलावरची जगायची धडपड, दिलावरची मुसलमान म्हणून होणारी वणवण, रिक्षा घेण्यासाठी घ्यावे लागलेले कर्ज हे सारेच एका अर्थाने प्रातिनिधिक म्हणता येईल.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये दलितांची एक पिढी लहानशा प्रमाणात का होईना सक्षम झालेली दिसते. सरकारचे मागासवर्गायांसाठीचे राखीव जागांचे धोरण वास्तवात शिक्षणक्षेत्रात, नोक-यांच्या क्षेत्रात कशाप्रकारे काम करते, याचे चित्रण 'कळप' मध्ये तांबट आणि त्याचे मित्र यांच्या चर्चेतून येते. सवर्ण आणि दलित असा संघर्ष त्यातून दिसत असला तरी दलित संघटनातही, दलित चळवळीतही आपापल्या जातीचे लहान लहान संघटित गट कार्यकारी आहेतच. म्हणजे व्यवस्थेला प्रतिकार करताना पुन्हा दलित संघटनेच्या चळवळीतही त्याची प्रतिरूपे तयार होतात आणि रघू चिलमीच्या भाषेत, "सगळे चळवळवाले भयंकर जातीयवादी वाटाय लागलेत." (पृ. ३५८) अशी अवस्था होते. प्राध्यापक होण्यासाठी धडपडणा-या तांबटला धिसाडी म्हणून कुठेच जागा मिळत नाही. तांबट सांगतो, "तुला फक्त जाहिराती दिसत्यात. त्यामागचे राजकारण नाही दिसत, हे लोक फक्त फार्स म्हणून जाहिराती देत्यात. इंटरव्ह्यूला गेलं की नो सुटेबल कँडिडेट म्हणून शेरा मारून घेतात आणि बामन नाहीतर मराठयाला नेमून घेत्यात. दहा बारा मागासवर्गातली पोरं असली तरी नो सुटेबल कँडिडेट. काय तिच्या आमचा धंदा! परवा फोल्हापूरातल्या कॉलेजात गेलतो. तो आमदार संस्थेचा अध्यक्ष. सरळ म्हनाला, तुझी जात कुटली?" (पृ. ३४०) यातून राखीव जागांच्या राजकारणाचा बुरखा फाडला जात आपल्याला वास्तवाची विदारक जाणीव करुन दिली जाते.

'तणकट' ही कादंबरी स्वातंत्र्योत्तर कालात दलित सवर्ण यांच्या संबंधांमध्ये झालेल्या बदलाचा सामाजिक संदर्भ आपल्याला देते. "गाव आणि गावकुसा-बाहेरील जीवनामध्ये येणारे ताण-तणाव, क्रियाप्रतिक्रिया, साद-प्रतिसाद यांनी साकारलेली ही कादंबरी ग्रामीण साहित्य प्रवाह काय अथवा दलित साहित्य प्रवाह काय यापासून दूरच राहते. या जीवनाकडे येथे नव्या पुरोगामी अन विधायक अशा दृष्टिकोनातून पाहिले जाते." (११) असे पंडित टापरे या कादंबरीबद्दल म्हणतात. ग्रामीण भागात हजारो वर्षापासून अन्याय, छळ सहन करणारा दलित समाज आता जागृत झाल्याने त्याला कायद्याचे संरक्षण

मिळाल्याने तो आता सवर्णाच्या अन्यायाविरूद्ध टोकाची भूमिका घेऊ लागला आहे. तर यामुळे सवर्ण ही अधिक आक्रमक होऊ लागले आहे.

"खेडयातील दलित बाहेर काढण्यासाठी सामंजस्य, सहनशीलता, सबुरीचे धोरण, स्वत:च्या समाजाशी बाधिलकी आदि मूल्यांची येथे गरज आहे, हे ध्यानात येते. त्याचबरोबर 'जातीयता' टाळा म्हणणारा दलितच मांगांना नाकारतो. सवर्णाशी संघर्ष करतो. त्यामुळे जातीयता कमी होण्याऐवजी वाढीस लागलेली आहे, हे सत्य वस्तुनिष्ठपणे गवस यांनी टिपले आहे. कादंबरीकार येथेच थांबत नाही तर संपूर्ण आंबेडकरांचा आज दलितांकडूनच कसा पराभव झाला. हे दाहक सत्यही मांडतो. यावरचे त्याचे भाष्यही अत्यंत महत्वाचे आहे."(१२ ) असे महेंद्र सुदाम कदम यांना वाटते. असेच मत कबीर, बल्लाळ, आक्काबा राणे, सदबा, गंगव्वा, थळू आजासारखी नैतिक भूमिकेतून या कादंबरी मध्ये मांडणारी पात्रे आहेत. कबीर ह्या सुशिक्षित दलित तरूणाच्या शिक्षणामुळे त्याच्या जीवनकक्षा विस्तारलेल्या आहेत. त्याची दलित चळवळीमध्ये भूमिका संबंध गावागाडा समजून घेऊन, स्वत: सुधारून मग जातीयता नाहीशी करण्याची भूमिका आहे. थळू आजा हा शिकलेला नसला तरी त्याची ही जीवन जाणीव अशीच व्यक्त झालेली दिसते.

स्वातंत्र्योत्तर काळात सुरू झालेल्या दलित चळवळीमुळे दलित समाजाला जाग आली होती. त्याकालात राजकीय सत्ता मराठयांच्या हाती आली होती. अशावेळी ग्रामीण भागात दलित आणि मराठा वर्ग यांच्यातील तणाव वाढत गेला. कारण अजूनही सवर्ण वर्ग दलितांना आपल्या पायदळी तुडवून श्रेश्ठत्व गाजवू पहात होता. त्याची उदाहरण या कादंबरीत आपल्याला दिसते ते म्हणजे आप्पुण्या म्हाराची म्हैस आण्णाप्पा पाटीलांच्या मळ्यात घुसली म्हणून आण्णाप्पाने आधी म्हशीला बडवले आणि नंतर आपुण्याला बदडुन काढले. तेव्हा मात्र म्हारवाडयातील सगळे भयंकर संतापतात. दादबा गोपाळ हा डेप्युटीला म्हणतो, "डेप्युटी ऽऽ आता ह्योचा निकाल लावायचाच. आता है लई झालं. मागच्या म्हयन्यात माझ्या बायकोलाबी ह्योच आप्पष्या काय-बाय बोललाता. आसू दे म्हणून सोडू दिलं. तर नाव नाव त्येंच ह्ये वाढतच चाललंय. ही काय मोगलाई लागलीया का काय?

ह्यास्नी म्हारवाडा म्हणजे पयल्यागत आपल्या बापाची वतनदारी वाटती का काय?" (पृ. ७३) तसेच कबीरच्या कॉलेजमध्ये प्रा. गर्जेकर जातीवरून अपमान करतात आणि तेव्हा कबीर त्यांना जाब विचारतो. त्यावेळी प्रा. गर्जेकर म्हणाले,"तुझ्या ते पटकन ध्यानातही येणार नाही. शिक्षणाला एक संस्कृती लागते. ती नसली की असंच होणार. नुस्त्या स्कॉलरशिप, सवलती देऊन शिक्षण पोहचत नाही. त्याला संस्कार असावे लागतात." (पृ.१४) यावरून अजूनही दलितांना खालच्या पातळीवर ठेवून त्याच्यावर अन्याय केला जात असल्याने आता मात्र या दलितांना त्यांचा प्रतिकार करण्याची भूमिका घेऊन त्यांना उत्तर द्यायला सुरूवात केलेली दिसते. ह्या भूमिकेबद्दल दलितांचे नेते सत्यपाल धर्मरक्षी म्हणतात, "आम्ही हक्क सांगाय आलोय. आम्हाला हा देश जर सुखाने जगू देणार नसेल तर आम्ही या देशात कुणाला सुखाने जगू देणार नाही. आज एवढी ताकद आमच्यात आहे. आम्ही आज फक्त रस्त्यावर आलो आहोत; उद्या आम्हाला न्याय मिळाला नाहीतर हा देश पेटवून काढू..."(पृ.५६) तर फणींद्र कांबळेसारखा दलित चळवळीचा नेता कबीरला म्हणतो, "ब-याच वेळा आपण चुकीची कृती करतो; पण तो काळाच्या मोजमापात बरोबर असते. सगळ्या सवर्ण मंडळीना जर शुद्धीवर आणायचं असेल तर आपण मिळेल त्या संधीचा फायदा घेऊन त्यांना धक्का दिला पाहिजे. अशावेळी संधी चांगली का वाईट, हा विचार करत बसण्यात अर्थ नाही. कारण ह्या लोकांच्या डोक्यातली जात कधीच. जाणार नाही. आपण कितीही उच्चशिक्षित झालो तरी आपल्याला ते महार म्हणूनच ओळखणार. आपल्याला कधी बरोबरीने वागवणार नाहीत. त्यांच्या मनातला हा विचार जर घालवायचा असेल तर त्यांना सतत धक्के देत राहिले पाहिजे. प्रत्येक ठिकाणी त्यांची त्यांना जागा दाखवली पाहिजे."(पृ. ११४) तेव्हा 'शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा' या आंबेडकरांच्या तत्त्वाचे वर्तमानकाळात दलितांच्या नेत्यांनी विकृतीकरण करून सामाजिक चळवळीमध्ये विकृतता आणली आहे, ते दिसून येते.

दलित समाज अनेक वर्षापासून विषमतेचे, अन्यायाचे चटके सहन करीत असताना आता त्याला कायद्याचे संरक्षण मिळालेले आहे. तेव्हा आता तो अधिक जोरकसपणे

सवर्णाचा प्रतिकार करू लागला असला तरी सवर्णाच्यामध्ये या संरक्षणामुळे व्देष निर्माण झालेला आहे आणि सवर्णही त्यांचा प्रतिकार करू लागले आहेत. गावातला माणकूचा गज्या म्हणतो,"कायबी म्हणाऽऽ मायला. म्हारडी ती म्हारडीच. कदीबी जातीवरच जायाची. गावात काय सुदानसतानं म्हणं ह्येंच्यावर बहिष्कार टाकला." तेथे कसाळ्याचा पक्या म्हणतो, "आता म्हार त्यास्नी म्हणायचं न्हाई. आमाला म्हणायचं. बघा तुमी. आनी थोडया दिवासान आमाला त्येंच्यात राबायला जायला लागतंय का न्हाई. नोक-या त्यास्नी कसलीबी सवलत आली की पयली त्यास्नी बाकीच्यानी त्याल लावून बोंबलत बसाय पायजे."(पृ.१०४) तेथे गावातील सवर्ण दलिताशी होणा-या संघर्षामुळे दलित गावातील कामाचा बहिष्कार करतात आणि दलितांवर उपासमारीची वेळ येते. तेव्हा माहारवाडयातील लक्ष्मी या दलित चळवळींचा विरोध करून गावात धान्य मागायला येते आणि तेव्हा गावातील मंडळी मात्र काही बाही ऐकवून तिच्या पदरात धान्य मात्र घालतातच.

यामधून दलितांना आता कळू लागलेले आहे की सवर्णांना धडा शिकविण्याच्या विचाराने दलितांच्या चळवळी, संघटना स्थापल्या जात असल्या तरी दलितांचा वापर करून दलित नेते स्वत:च्या तुंबडयाच भरत आहेत. तेव्हा बनसोडेसारखे नेते दलिताच्या विकासाऐवजी स्वत:चा स्वार्थ मात्र साधून घेत आहे. यामुळे मात्र समाज अधोगतीकडे जाऊन गावाविरूद्ध उभा रहात आहे. अशावेळी थळू आजा कबीरला म्हणतो, "लेकरा, आसं न्हाई. एकदम तोडून न्हाई जमत गावाला किती केलं तरी पांढरीतलीच हाईत तीबी. काळीज एकच हाय. त्यास्नीबी न्हाई दुकवायचं. हाळूहाळू गावात बी फरोक झालाय. तुज्यासारक्या पोराला मांडीला मांडी लावून घेत्यात, पोरा, नशीबवान हाईसा. आमाला बेलटयाशिवाय थारा न्हवता, आता त्ये गेलं का न्हाई? तसं जाईलं सगळं हाळूहाळू बाबासाबाची पुण्याई दुसरं काय?" (पृ.६९) यामधून गावगाडा आणि तेथील परंपरा याचा संबंध थळू आजा समजून घेऊन परंपरा आणि आधुनिकतेचा समन्वय साधण्याचे विचार प्रगट करतो. यामुळेच थळू आजा, कबीर मांगानाही वेगळे समजण्याचा विरोध करत असतात. कारण समाजात सवर्ण महारांना दूर ठेवतात तर महार मांगाना दूर करत असतात.

त्याचप्रमाणे आपल्या समाज व्यवस्थेमध्ये कडू या जातीच्या पातळीतील लोकांना ही खालच्या पातळीवरचे समजले जाते. कारण या व्यवस्थेमध्ये प्रत्येक जातीच्या पातळीप्रमाणे त्याचे समाजात स्थान असते. बाळासाहेब शेडबाळे हा कडू जातीचा असल्याने त्याला गावातील पाटील, राणे, जगदाळे स्वत: पासून, कुठल्याही पदापासून लांबच ठेवत असतात. त्याचा राग काढताना बाळासाहेब शेडबाळे म्हणतो, "आमाला त्ये कडूचं समजत्यात. ह्या रांडच्यानीच आमाला कडू केलंय, आनी वर हेच आमाला कडू म्हणत्यात. हेच्याच बापजाद्यांनी रांडा ठेवल्या आनी आमची वंसावळ वाढीवली. तसा तुमच्यात आनी आमच्यात काय फरक?" (पृ. ९४) तेव्हा या जातीमुळे होणारी त्यांची अवहेलना, अपमान पाहून तो व्देषाने गावातील सवर्णाच्या विरूद्ध संपूर्ण दलित समाज उभा करतो. जान्यासारखे आयगारी जातीचा वेळ प्रसंगी बाळासाहेबाला त्याची जागा दाखवून देत म्हणतो, "छयाऽऽ छयाऽऽ आमचं येगळं. आमी लेकावळ्याचं न्हवं, बाबाऽऽ

आमी जातीवंत आयगारी, तुमचं येगळं, आमचं येगळं. तुमच्यात आमाला घालू नगं." (पृ.९४)

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दलित वर्ग हळू हळू जागृत होऊन शिकू लागला. काही काळाने दलित समाजाला कायद्याचे संरक्षण मिळू लागले. त्यातूनच दलित समाजात वेगवेगळ्या आंतर प्रक्रिया घडू लागल्या. दलित समाजातील काहीजण शिकून नोकरी करू लागले आणि आपल्या समाजाशी संबंध तोडू लागले. उदा. म्हारवाडयातील मन्या कबीरला म्हणतो, "काय शेण खात्यात मादरच्योत लेकाचे. ह्यांच्या मैतालासुद्धा फिरकू नये असं वाटतंय. सारखी आपली ह्यांनी घाण करायची आणि आम्ही निस्तरायची. कोण सांगतंय यांना? नाहीत सुधरायची. ह्यांना सोनं दिलं तरी माती करून ठेवतील. ह्यांना लंडनला जरी पाठवली तरी तिथं सुद्धा सगळ्यांना बिघडून टाकून येतील." (पृ.२३४) तसेच दलित समाजात शिकलेले आपली जात लपवू पाहतात. आपण महार आहोत हे कुणाला कळू नहे म्हणून आडनांव बदलून राहणारे दिक्षित गुरूजी सारखेही असतात. दलित चळवळीमुळे

दलित समाजातील काही नेते अशिक्षित दलित मुलांना हाताशी धरून स्वतःचा स्वार्थ साधून घेत असतात. या कादंबरामध्ये जालिंदर बनसोडे, अलताफ सारखे दलित नेते गौत्यासारख्या अशिक्षित मुलांचा उपयोग करून आपला स्वार्थ साधून घेतात. जेथे आंबेडकरानी शिकून, एकता साधून संघर्ष करण्याचा विचार दलित समाजापुढे मांडला. त्याच्या विचारांना बाजूला सारून दलित समाजातील स्वार्थी नेते आंबेडकरांचे फोटो देऊन नवी मूर्तिपूजकता प्रस्थापित करतात, मिरवणुका काढतात आणि जयंतीच्या निमित्ताने दारूची मैफलही आयोजित करतात. येथे आंबेडकरांच्या विचारांचा पराभव दलितांकडूनच झालेला दिसून येतो. कबीर म्हणतो, "आरंऽऽ फोटो लावून नुस्तं काय करायचं? बाबासायबानी काय सांगितलंय त्ये रांडच्यास्नी वाचा म्हणावं. त्येनी समाजासाठी काय काय केलंय बघा म्हणावं. आनी तुमी काय करालाय ते बघा म्हणाव. नुस्तं फोटो वाटून करणार काय? तर फोटोला रोज देव पुजल्यागत पुजत बसणार, आरंऽऽ बाबासायबांनी जन्मभर ज्येला विरोध केला तेच हे करत बसणार, आणि म्हणं समाज सुधारणार कसला समाज सुधारत्यात." (पृ. १३३) दलित समाजातील काही तरूण शिकून नोकरी करून उच्चवर्गातील मुलीशी लग्न करून समाजामध्ये आपले राहणीमान, जीवनमान सवर्णाप्रमाणे ठेवून राहणारे दलित म्हणून प्राप्त होणा-या सवलतीही घेत असतात. या विविध आंतरप्रक्रियांचा विचार येथे केलेला दिसतो.

अशा प्रकारे या कादंबरीमध्ये स्वातंत्र्योत्तर काळात सुरू झालेल्या दलित चळवळीचे स्वरूप शहरात आणि ग्रामीण भागात कशा प्रकारे भिन्न आहे याचे चित्रण आलेले आहे. ग्रामीण संस्कृतीमध्ये गावगाडयाला अतिशय महत्त्व आहे. या गावगाडयामध्ये दलित समाज पुष्कळसा परावलंबी असल्याने या चळवळीमुळे दलित समाजाला त्याची अत्यंत दाहक झळ लागते. कारण यामुळे दलित समाजाच्या पोटापाण्याचा प्रश्न विकट होऊन जातो आणि या संघर्षाचा परिणाम तेथील ग्राम व्यवस्थेवर होतो. त्याचे स्वरूप आर्थिक, सामाजिक तसेच मानसिक ही असते.

म्हणूनच या कादंबरीबद्दल सदानंद देशमुख म्हणतात, "ह्या कादंबरीच्या निमित्ताने दलित आणि दलितेतर यांच्या परस्परांविषयीच्या भावना, ज्या आज सर्वत्र दिसून येत आहेत. त्यांचे जाहीरपणे पहिल्यांदाच प्रकटीकरण अतिशय धाडसाने झाले आहे. त्याचे श्रेय राजन गवस यांना दिलेच पाहिजे. कारण साहित्य म्हणजे जर समाजाचा आरसा आहे तर त्यात समाजाचे प्रतिबिंब हे जोरकसपणे दिसलेच पाहिजे. देवदासीचा प्रश्न गवस यांनी ज्या धाडसाने कादंबरीत मांडला. त्याच धाडसाने हे विचारही आले आहेत." (१३)

## ➤ संदर्भ ग्रंथ टीपा


१) कुलकर्णी मदन-देवदासी:यल्लम्माच्या जोगतिणी-विजय प्रकाशन,नागपूर-आवृत्ती पहिली-१९९४ –पृ.५४

२) देशमुख सदानंद – ललित-फेब्रवारी,२००२ -पृ.२८

३) नेमाडे भालचंद्र- टीकास्वयंवर- साकेत प्रकाशन,औरंगाबाद- पहिली आवृत्ती,१९९०-पृ.१६३

४) पठारे रंगनाथ – सत्त्वाची भाषा- मुलाखत- शब्दालय प्रकाशन,श्रीरामपूर-पहिली आवृत्ती,१९९७–पृ.२२७

५) देशमुख सदानंद – पूर्वोक्त -पृ.२४

६) कदम महेंद्र सुदाम-नवभारत-नोव्हेंबर,डिसेंबर-२००१-पृ.८८

७) कदम महेंद्र सुदाम- पूर्वोक्त -पृ.९१

८) कदम महेंद्र सुदाम- पूर्वोक्त -पृ.९१

९) देशमुख सदानंद – पूर्वोक्त -पृ.२६

१०) नेमाडे भालचंद्र- पूर्वोक्त -पृ.२१५

११) टापरे पंडित-कादंबरीसंवाद-पद्मगंधा प्रकाशन,पुणे -पहिली आवृत्ती,२००५ -पृ.१

१२) कदम महेंद्र सुदाम- पूर्वोक्त -पृ.९१

१३) देशमुख सदानंद – पूर्वोक्त -पृ.२६